नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५० * अंक २९२ * * अमरावती * शुक्रवार, दिनांक १८ एप्रिल २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## बंगालमधील २६ हजार शिक्षकांना दिलासा

■ वृत्तसंस्था, कोलकाता, दि. १७ :
पश्चिम बंगाल शिक्षक भरती घोटाळा प्रकरणात गुरुवारी सर्वोच्च न्यायालयाने सुमारे २६,००० बडतर्फ शिक्षकांना दिलासा दिला. न्यायालयाने म्हटले आहे की ज्या शिक्षकांची नियुक्ती रद्द करण्यात आली आहे ते नवीन निवड प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अध्यापन सुरू ठेवू शकतात. जरी २०१६ च्या घोटाळ्याच्या प्रकरणात त्याचे नाव आले नव्हते.

न्यायालयाने म्हटले की, न्यायालयाच्या निर्णयामुळे मुलांचे शिक्षण बाधित होऊ नये अशी आमची इच्छा आहे. सरन्यायाधीश संजीव खन्ना म्हणाले, बंगाल स्कूल सर्व्हिस कमिशन (एसएससी) ला ३१ मे पर्यंत भरती प्रक्रियेसाठी अधिसूचना जारी करावी लागेल.

अग्रलेख

## खरीखरी..

## न्यायाधीश रोखठोक खन्ना

सर्वोच्च न्यायालय कालपासून वक्फ विधेयकांच्या मुद्द्यांवर वेगवेगळ्या प्रकारे विचार करण्याच्या मनस्थितीत आहे. सर्वोच्च न्यायालयाचे खन्ना साहेब यांनी संविधानाच्या कलमान्वये हे विधेयक मंजूर झालेले नाही, असे स्पष्टपणे नमूद केलेले आहे. लोकशाहीत जनता सर्वोपरी म्हणजेच सर्व काही असते. जनतेने नेमलेले सरकार जनतेलाही बांधील असते आणि संसद हीच या देशाची सर्वोच्च अधिकार शक्ती असलेली संवैधानिक सत्ता आहे. संसदेत हे विधेयक मंजूर केल्यावर त्यावर राष्ट्रपतींची सही झाल्याबरोबर कायद्याचे रूप धारण करते. संसदेने नुकत्याच मंजूर केलेल्या वक्फ विधेयकाविरोधात अनेक मुस्लिम संघटनांनी याचिका दाखल केलेल्या आहेत. सरकारतर्फे सॉलिसिटर जनरल मेहता कालपासून बचावाच्या भूमिकेत दिसले. मग विरोधी पक्षांच्या वकिलांची आणि त्यांच्या भूमिकेची गोष्ट तर सोडाच. खुद्द सरन्यायाधीशच आक्रमक दिसले. आता आज जवळजवळ शंभर याचिका आता सर्वोच्च न्यायालयात युक्तीवादासाठी दाखल झालेल्या आहेत. वक्फ कायद्यात बिगर मुस्लिमांचा समावेश, जुन्या झालेल्या मालमत्तेची नोंदणी तसेच दीर्घ काळापासून धार्मिक किंवा धमार्दाय हेतूसाठी वापरल्या जाणाऱ्या मालमत्ता यावरही चर्चा झाली. अनेक अतिशय जुन्या मालमत्तेसाठी अधिकृत कागदपत्रे नसतात. कारण दीड -200 ते 300 वर्षांपूर्वी नोंदणी वगैरे होत नव्हती. अशा प्रकारे आता सर्वोच्च न्यायालयाने एका कलमाच्या आधारे त्यात असलेल्या अधिकाराचा वापर करून, या विधेयकाने संमत केलेल्या अनेक बाबींवर सध्या तरी तात्पुरता स्थगन आदेश दिलेला आहे. याचा सरळ अर्थ असा आहे की, संसदेने पारित केलेल्या विधेयकावरील अनेक तरतुदी लागू करता येणे अजिबात शक्य नाही. कारण सर्वोच्च न्यायालयाने परिस्थिती 'जैसे थे' ठेवण्याचा आदेश दिलेला आहे. आज माननीय सर्वोच्च न्यायालयाला सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सरकारतर्फे उत्तरे देण्यासाठी सात दिवसांचा कालावधी किंवा वेळ मागितलेला आहे. तो त्या बेंचने मान्य केला. त्यानंतर पाच दिवस याचिकाकर्त्यांना उत्तर देण्यासाठी दिलेले आहेत. म्हणजे उत्तर येईपर्यंत एप्रिल महिना निघून जाईल. न्यायालयाने पुढील सुनावणी पाच मे रोजी ठेवलेली आहे. त्यातच पुढील सात दिवसात सरन्यायाधीशांचा कार्यकाळ संपणार आहे. म्हणजे पाच मे ते बारा मे या कालावधीत सरन्यायाधीशांचे बेंच जे जे आदेश देईल. ते अंतिम निकालापर्यंत कायमच राहतील. या विधेयकातील तरतुदी लागू करण्यास किती काळ लागेल. हे कोणालाच ठाऊक नाही. संसदेने पारित केलेल्या एका विधेयकाची आज तरी संविधानाचा आधार घेऊन सर्वोच्च न्यायालयाने बरीच काटछाट केलेली दिसते. आता जर आपले जुने न्यायाधीश चंद्रचूड असते. तर त्यांनी कोणता निर्णय दिला असता किंवा निर्णय दिला नसता. हे त्यांचे त्यांना ठाऊक असेल. पण सध्याचे सरन्यायाधीश मा. न्या. खन्ना यांनी राज्यपाल आणि राष्ट्रपती यांनाही हे विधेयक कायदा मंजुरी म्हणून रूपांतरित होण्यासाठी विशिष्ट अवधी देण्याचे आदेश दिलेले आहेत. आता बारा मे पर्यंत या विधेयकातील कोणत्या कलमांचे बारा वाजतात. त्याची प्रतीक्षा संपूर्ण भारत देशाला आहे. जय हिंद!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# राज्यात पुन्हा उफाळला हिंदी, मराठी वाद!

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवे शैक्षणिक धोरण व त्याअंतर्गत करण्यात येणाऱ्या हिंदीच्या सक्तीचे जोरदार समर्थन केले आहे. महाराष्ट्रात मराठी भाषा सर्वांना आली पाहिजे. पण देशात एक संपर्कसूत्र तयार करण्यासाठी हिंदी भाषेचा पर्याय ठेवण्यात आला आहे. त्यामुळे संपर्कसूत्राची भाषा म्हणून लोकांनी हिंदी शिकलीच पाहिजे, असे ते म्हणालेत.

दुसरीकडे, मनसेने या सक्तीचा विरोध केला असून, महाराष्ट्रात हिंदीची सक्ती खपवून घेणार नाही, सर्वत्र 'हिंदीकरण' करण्याचे प्रयत्न मनसे यशस्वी होऊ देणार नाही, अशा इशारा राज ठाकरे यांनी दिला आहे. यावरून, मराठी, हिंदीचा वाद पुन्हा उफाळून आला आहे.

महाराष्ट्रात इयत्ता पहिलीपासूनच हिंदी भाषा शिकण्याच्या अनिवार्यतेवर नुकतेच शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. 'राज्य शालेय अभ्यासक्रम आराखडा २०२४'नुसार, मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधील पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना मराठी व इंग्रजीसह हिंदी ही तृतीय भाषा म्हणून शिकावी लागणार आहे. अन्य माध्यमांच्या शाळांमध्ये पहिली ते पाचवीसाठी माध्यम भाषा, मराठी व इंग्रजी अशा ३ भाषा असणार आहेत.

येत्या जून महिन्यापासून सुरू होणाऱ्या नव्या शैक्षणिक वर्षापासूनच या निर्णयाची अंमलबजावणी होणार आहे. पण आता मनसेसह मराठी भाषेसाठी लढणाऱ्या संघटनांनी यावर तीव्र आक्षेप घेतला आहे. या पार्श्वभूमीवर देवेंद्र फडणवीस यांनी या धोरणाचे समर्थन केले आहे.

फडणवीस म्हणाले की, या प्रकरणी कोणताही नवा निर्णय घेण्यात आला नाही. महाराष्ट्रात प्रत्येकाला मराठी भाषा आलीच पाहिजे. हा आमचा आग्रह आहे. पण या देशात एक संपर्कसूत्र तयार करण्यासाठी हिंदी भाषा हा एक पर्याय आहे. त्यामुळे लोकांनी ही भाषाही शिकावी असा आमचा प्रयत्न आहे.

### हिंदी सक्तीला मुख्यमंत्र्यांचे समर्थन : मनसेचा विरोध




राज्य शालेय अभ्यासक्रम आराखडा २०२४ नुसार महाराष्ट्रात पहिलीपासूनच हिंदी ही भाषा अनिवार्य करण्यात आली आहे. मी स्वच्छ शब्दांत सांगतो की ही सक्ती महाराष्ट्र नवनिर्माण सेना खपवून घेणार नाही. सरकारचं सध्या जे सर्वत्र 'हिंदीकरण' करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, ते या राज्यात आम्ही यशस्वी होऊ देणार नाही. हिंदी ही काही राष्ट्रभाषा नाही. ती महाराष्ट्रात का म्हणून पहिलीपासून शिकायची? तुमचं त्रिभाषेचं सूत्र जे काही आहे, ते सरकारी व्यवहारांपुरतंच मर्यादित ठेवा, शिक्षणापर्यंत आणू नका, असे राज ठाकरे म्हणालेत.

### हिंदीच्या सक्तीला काँग्रेसचाही विरोध

महाराष्ट्रात इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषेची सक्ती करण्याच्या मुद्यावरून मोठे रणकंदन माजले आहे. आता काँग्रेसनेही हिंदीच्या सक्तीला विरोध केला आहे. तिसरी भाषा म्हणून हिंदी लादणे हा मराठीवरील अन्याय व मराठी अस्मितेवरील घाला आहे, असे काँग्रेसने या प्रकरणी म्हटले आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी हिंदीची सक्ती करणारा हा निर्णय मराठी भाषिकांच्या अस्मितेवरील घाला असल्याचा आरोप केला आहे. वडेट्टीवार म्हणाले की, संघराज्य निर्मितीच्या वेळी भाषेला प्राधान्य देताना राज्यांची मातृभाषा मान्य केली गेली. महाराष्ट्राची मातृभाषा मराठी आहे. इंग्रजी व मराठी या दोन भाषा शिक्षण व प्रशासनात वापरल्या जातात. अशा परिस्थितीत तिसरी भाषा म्हणून हिंदी सक्तीने लादणे हा मराठीवरील अन्याय आहे. मराठी भाषिकांच्या अस्मितेवर घाला आहे. सरकारला तिसरी भाषा हवीच असेल तर ती पर्यायी असावी. तिची सक्ती करू नये.

हिंदीची सक्ती करणे हा एकप्रकारे केंद्रातून राज्यांवर दबाव टाकण्याचा प्रयत्न आहे. हा प्रकार संघराज्य व्यवस्थेच्या मूलभूत तत्त्वांना धरून नाही. काही राज्यांनी याला विरोध केला आहे. पण त्यांना धमकावले जात आहे, ही चिंता वाढवणारी बाब आहे. मराठी अस्मिता आणि भाषिक अधिकार रक्षणासाठी ही सक्ती तत्काळ मागे घेतली पाहिजे, असे ते म्हणाले.

## वक्फ सुधारणा कायद्यावर सुप्रीम कोर्टाचे अंतरिम आदेश

### नियुक्ती थांबवल्या; केंद्राला ७ दिवसांत उत्तर मागितले

■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. १७ :
वक्फ सुधारणा कायद्यावर गुरुवारी सर्वोच्च न्यायालयात दुसऱ्या दिवशी सुनावणी झाली. न्यायालयाने केंद्र सरकारला कायद्यावर उत्तर देण्यासाठी ७ दिवसांची मुदत दिली आहे.

सरकारच्या उत्तरानंतर, याचिकाकर्त्यांना ५ दिवसांच्या आत उत्तर द्यावे लागेल. पुढील सुनावणी ५ मे रोजी होईल. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की कायद्याविरुद्ध दाखल झालेल्या ७० याचिकांऐवजी फक्त ५ याचिका दाखल कराव्यात.

**सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशातील ३ मोठ्या गोष्टी**

वक्फ बोर्डावर केंद्राचा प्रतिसाद येईपर्यंत वक्फ मालमत्तेची स्थिती बदलणार नाही.

न्यायालयाने वक्फ घोषित केलेली मालमत्ता रद्द केली जाणार नाही.

वक्फ बोर्ड आणि केंद्रीय वक्फ परिषदेत नवीन नियुक्त्या होणार नाहीत.

सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, '११० ते १२० फायली वाचणे शक्य नाही.' अशा परिस्थितीत, असे ५ मुद्दे ठरवावे लागतील. फक्त ५ मुख्य आक्षेपांवर सुनावणी होईल. सर्व याचिकाकर्त्यांनी मुख्य मुद्द्यांवर सहमत असले पाहिजे. नोडल कौन्सिलमार्फत या आक्षेपांचे निराकरण करा.

सरन्यायाधीश संजीव खन्ना: सुनावणीदरम्यान, एसजी मेहता म्हणाले की प्रतिवादी ७ दिवसांच्या आत एक लहान उत्तर दाखल करू इच्छितात आणि पुढील तारखेपर्यंत २०२५ कायद्याअंतर्गत बोर्ड आणि कौन्सिलमध्ये कोणत्याही नियुक्त्या होणार नाहीत असे आश्वासन दिले. अधिसूचनेद्वारे किंवा राजपत्रित केलेल्या वापरकर्त्याने आधीच घोषित केलेल्या वक्फसह वक्फच्या स्थितीत कोणताही बदल होणार नाही, अशी हमी त्यांनी दिली. उत्तर ७ दिवसांच्या आत दाखल करावे लागेल.

## न्यायमूर्ती झाले 'सुपर संसद'

■ वृत्तसंस्था,नवी दिल्ली, दि. १७ :
सर्वोच्च न्यायालयाने गेल्या आठवड्यात राष्ट्रपती आणि राज्यपालांना विधेयकांना मान्यता देण्यासाठी अंतिम मुदत दिली होती. यावर उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी नाराजी व्यक्त केली आहे. ते म्हणाले की न्यायालये राष्ट्रपतींना आदेश देऊ शकत नाहीत.



उपराष्ट्रपती म्हणाले, आपण अशी परिस्थिती निर्माण करू शकत नाही जिथे न्यायालये राष्ट्रपतींना निर्देश देतील. संविधानाच्या कलम १४२ अंतर्गत न्यायालयाला देण्यात आलेले विशेष अधिकार लोकशाही शक्तींविरुद्ध २४७७ उपलब्ध असलेले अणुक्षेपणास्त्र बनले आहेत. लोकशाहीमध्ये, निवडून आलेले सरकार सर्वात महत्वाचे असते आणि सर्व संस्थांनी त्यांच्या संबंधित मर्यादेत काम केले पाहिजे.

## त्रिभाषा धोरण लागू करणारे महाराष्ट्र बनले पहिले राज्य

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :
महाराष्ट्र हे त्रिभाषा धोरण लागू करणारे देशातील पहिले राज्य बनले आहे. आता पहिली ते पाचवीच्या मुलांना हिंदी भाषा शिकणे सक्तीचे करण्यात आले आहे. हा निर्णय राज्यातील सर्व मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांना लागू असेल. राष्ट्रीय शिक्षण धोरणच्या नवीन अभ्यासक्रमाला लक्षात घेऊन, महाराष्ट्रात या वर्गांसाठी त्रिभाषा धोरण लागू करण्यात आले आहे.



राज्य शालेय शिक्षण विभागाने बुधवारी ही घोषणा केली. ज्या शाळा मराठी आणि इंग्रजी व्यतिरिक्त इतर कोणत्याही माध्यमाचा वापर करत आहेत, त्या आधीच त्रिभाषा धोरणाचे पालन करत आहेत. कारण या शाळांमध्ये इंग्रजी आणि मराठी शिकवणे अनिवार्य आहे आणि येथे संवादाची भाषा तिसरी भाषा म्हणून शिकवली जात आहे.

## मुख्यमंत्री फडणवीसांना न्यायालयाचे समन्स

### निवडणुकीतील विजयाला आव्हान

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :
मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना समन्स बजावले आहे. त्यांना ८ मेपर्यंत उत्तर दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

मागील वर्षीच्या विधानसभा निवडणुकीत पराभूत झालेल्या २६ उमेदवारांनी महायुतीच्या विजयी उमेदवारांच्या विजयाला आव्हान दिले आहे. दक्षिण पश्चिम नागपूर मतदारसंघातून काँग्रेसचे प्रफुल्ल गुडधे यांनी फडणवीसांविरुद्ध निवडणूक याचिका दाखल केली आहे. न्यायालयाने भाजपा आमदार सुधीर मुनगंटीवार, राष्ट्रवादीचे मनोज कायंदे आणि भाजपचे देवराव भोंगळे यांनाही समन्स बजावले. गुरुवारी भाजपचे मोहन मते आणि चिमूरचे आमदार कितीर्कुमार भांगडिया यांनाही न्यायालयाने नोटीस पाठवली.

याचिकाकर्त्यांनी ईव्हीएम संदर्भात गंभीर आरोप केले आहेत. निवडणूक आयोगाने ईव्हीएमद्वारे निवडणूक घेण्यापूर्वी आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली नसल्याचा आरोप आहे. तसेच पराभूत उमेदवारांना सीसीटीव्ही फुटेज आणि फॉर्म क्रमांक १७ दिले जात नसल्याचेही म्हटले आहे.

न्यायमूर्ती प्रवीण पाटील यांनी निवडणूक आयोग आणि इतर प्रतिवादींची नावे वगळून केवळ विजयी उमेदवारांना नोटीस बजावली आहे. मते यांना ६ मे तर भांगडिया यांना ८ मेपर्यंत उत्तर सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. याचिकाकर्त्यांच्या बाजूने ॲड. आकाश मून यांनी बाजू मांडली.

## तिघांचा बळी घेणारा वाघ अखेर जेरबंद

■ महासागर प्रतिनिधी
चंद्रपूर, दि.१७ :
तीन गावकऱ्यांचा बळी घेणाऱ्या वाघाला जेरबंद करण्यात चंद्रपूर वनविभागाला यश आले असून या वाघाची रवानगी गोरेवाडा येथे करण्यात येणार आहे.

उत्तर ब्रम्हपूरी वनक्षेत्रातील चिचखेडा बिटात दुपारी साडेबाराच्या सुमारास टी-३ वाघाला जेरबंद करण्यात आले. या वाघाला जेरबंद करण्यात आले.

ब्रम्हपूरी नवविभागअंतर्गत नवेगाव/आवळगाव उपक्षेत्र परिसरात टी-३ वाघाचे वास्तव्य होते. या वाघाकडून परिसरात सातत्याने गावकऱ्यांवर, जनावरांवर हल्ले होत होते. या वाघाला जेरबंद करण्याची परवानगी ब्रम्हपूरी उपवनसंरक्षक व प्रादेशिक मुख्य उपवनसंरक्षक यांनी प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) एम. श्रीनिवास राव यांच्याकडे केली. त्याअन्वये आज अखेर या वाघाला जेरबंद करण्यात आले.



## २५ हजार वर्षांपूर्वीचे हत्तीचे जीवाश्म आणि अवजारे सापडली

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :
चंद्रपूर तालुक्यातील वर्धा-पैनगंगा नदीच्या पात्रात महत्त्वपूर्ण पुरातत्त्वीय शोध लागला आहे. भूशास्त्र संशोधक प्रा. सुरेश चोपणे यांना २५ हजार वर्षांपूर्वीच्या स्टेगोडॉन गणेश हत्तीचे जीवाश्म सापडले आहे.

महाराष्ट्रात प्रथमच प्लेईस्टोसीन काळातील हत्तीचे जीवाश्म सापडले आहे. डायनोसॉरनंतर विदर्भात सापडलेले हे पहिलेच विशालकाय प्राण्यांचे जीवाश्म आहे. वाडिया इन्स्टिट्यूट ऑफ हिमालयन जिओलॉजीचे निवृत्त प्राध्यापक अविनाश नंदा यांच्यासह अनेक परदेशी संशोधकांनी या जीवाश्माची पुष्टी केली आहे. हे हत्ती सुमारे १५ फूट उंच होते आणि आजच्या आशियाई हत्तींचे पूर्वज मानले जातात.




या शोधाचे दुसरे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे जीवाश्मांसोबतच पाषाणयुगीन मानवाने वापरलेली दगडी अवजारे सापडली आहेत. यामध्ये हात कुऱ्हाडी आणि इतर साधने आहेत. एकाच ठिकाणी हत्तींची जीवाश्मे आणि पाषाणयुगीन अवजारे सापडल्याने तत्कालीन मानव हत्तींची शिकार करत असल्याचे स्पष्ट होते.

प्लेईस्टोसीन काळात (२ लाख ते ११,७०० वर्षांपूर्वी) भारतात हत्ती आणि पाषाणयुगीन मानवांची मोठी वस्ती होती. या काळाच्या शेवटी आलेल्या हिमयुगामुळे झालेल्या महापुरात अनेक प्रजाती नष्ट झाल्या. त्याच पुराच्या गाळात हे जीवाश्म सापडले आहे.

याच ठिकाणी एलेफास नामाडिकस या लुप्त झालेल्या हत्तीसदृश प्राण्याचे अवशेषही मिळाले आहेत. त्यामुळे या जीवाश्मांचे अधिक सखोल विश्लेषण करण्याची गरज असल्याचे मत प्रा. चोपणे यांनी व्यक्त केले आहे.

## सायबर पोलीस करणार उल्हास नरड यांना अटक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :
शालार्थ आयडी घोटाळ्यामध्ये आता नवीन माहिती समोर आली आहे. नागपूर विभागीय उपसंचालक कार्यालयातील कर्मचारी रवींद्र पाटील यांनी १२ मार्चला सायबर पोलिसांकडे या घोटाळ्याची तक्रार केली. सध्या बनावट कागदपत्रांच्या आधारे मुख्याध्यापकास मान्यता दिल्याच्या गुन्ह्यात अटकेत असलेले विभागीय उपसंचालक उल्हास नरड यांच्या सांगण्यावरून ही तक्रार झाली.

**शालार्थ आयडी घोटाळा**

शालार्थ आयडी निर्माण करण्याचा अधिकार नरड यांना असताना त्यांच्या पासवर्डचा दुसऱ्याने गैरवापर करून शालार्थ आयडी तयार केल्याचे या तक्रारीत नमूद आहे. नरड यांना अटक होण्यापूर्वी ही तक्रार झाल्याचे समोर आल्याने या प्रकरणाला वेगळे वळण मिळाले आहे. सध्या शिक्षण उपसंचालक उल्हास नरड आणि मुख्याध्यापक पुडके, निलेश मेश्राम, अधीक्षक माध्यमिक शिक्षण विभाग, संजय दुधाळकर, शिक्षण उपनिरीक्षक शिक्षण उपसंचालक कार्यालय, सुरज नाईक, वरिष्ठ लिपीक शिक्षण उपसंचालक कार्यालय यांची कारागृहात रवानगी केली आहे. नरड यांनी जामीनासाठी अर्ज केला आहे. परंतु, सायबर पोलिसांच्या हातात नवीन पुरावे लागले असून पुढील तपासासाठी ते नरड यांना अटक करणार आहेत. तर शिक्षक भरती घोटाळ्यात संशय असलेले दोन शिक्षणाधिकारी आणि एक वेतन पथकाचे अधिकारी बेपत्ता असल्याची माहिती आहे.

विभागीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष चिंतामण वंजारी यांची चौकशी समिती नेमण्यात आली होती. त्यावेळी उपसंचालक कार्यालयाने २११ प्राथमिक शिक्षक, २ मुख्याध्यापक, १८ कनिष्ठ लिपिक, १३ शिपाई अशी २४४ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा?यांची यादी दिली होती. या यादीनुसार सर्व प्रस्तावांची चौकशी केली असता ३१ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या शालार्थ आयडींना उपसंचालक कार्यालयाने मान्यता दिली होती. उर्वरित शालार्थ आयडीची मान्यता नसताना पासवर्डचा गैरवापर करून ते तयार करण्यात आल्याचा आक्षेप आहे.

नरड यांना अपात्र मुख्याध्यापकाचा शालार्थ आयडी तयार केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे. त्यांच्या पासवर्डचा गैरवापर झाला असा दावा नरड करत असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. यानंतर आता सायबर पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

## पत्नीच्या शोधात गेला त्याचा जीव

■ महासागर प्रतिनिधी,नागपूर, दि.१७ :
यशोधरानगर पोलिस ठाण्यांतर्गत मेहंदीबाग पुलाजवळील जोशीपुऱ्यात एका व्यक्तीची दगडाने डोके ठेचून हत्या करण्यात आली होती. तपासात साळ्यानेच त्याची हत्या केल्याचे समोर आले आणि पोलिसांनी त्याला अटक केली.

ताराचंद प्रजापती (३५) रा. कळमना असे मृताचे तर, राहुल इंगळे (२५) रा. जोशीपुरा असे आरोपीचे नाव आहे. चौकशीदरम्यान राहुलने सांगितले की, जवळपास दीड महिन्यापूर्वी त्याची बहीण आणि ताराचंदची पत्नी ही त्याला सोडून एका नातेवाईकासोबत पळून गेली होती.

पत्नीच्या विरहात ताराचंद व्यसनाच्या आहारी गेला होता. तो दररोज साळ्याच्या घरी येऊन तिच्याबद्दल विचारपूस करीत होता. घटनेच्या दिवशीही तो साळ्याच्या घरी गेला होता. त्याची कॉलर पकडली, सांग माझी पत्नी कुठे आहे? अशी विचारणा केली.

दररोजच्या कटकटीला कंटाळून साळ्याने जवळच पडलेल्या दगडाने भाटव्याच्या डोक्यावर वार करून त्याची निर्घुन हत्या केली. गोळीबाराच्या घटनेला चोवीस तास होत नाही तोच खुनाच्या घटनेनी पुन्हा शहरात थरकाप उडाला.

मृतक ताराचंदला १० वर्षांचा एक मुलगा आणि ८ वर्षांची मुलगी आहे. मृतकाचे आई वडील माठ बनवून विक्रीचे काम करतात. ११ वर्षापूर्वी ताराचंदचा प्रेम विवाह झाला. सुरूवातीचे दिवस चांगले गेले. नंतर मात्र, त्याला दारूचे व्यसन लागले. तो कामधंदाही करीत नव्हता. घर खर्च आणि मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी पत्नीवर आली होती. कुटुंबाचा भार पत्नीवर आल्याने ती सुद्धा त्रस्त होती. हीच संधी साधून नातेवाईकाने तिच्याशी जवळीक साधली. तिला मदत करू लागला. त्यांचे सूत जुळले आणि दीड महिन्यापूर्वीच ताराचंदची पत्नी त्याच्यासोबत पळाली. पत्नी गेल्यापासून ताराचंद वेडापिसा झाला होता. आजोबांनी नातवांची जबाबदारी स्वीकारली. ताराचंद सतत पत्नीच्या शोधात भटकायचा. नातेवाईकांना विचारपूस करायचा. त्याच्या पत्नी संदर्भात तिचा भाऊ आरोपी राहुलला माहिती आहे, अशी त्याला शंका होती. त्यामुळे तो सतत राहुलच्या घरी जायचा. पत्नी कुठे आहे, अशी विचारणा करायचा. दररोजच्या प्रकारामुळे राहुल आणि त्याची पत्नी त्रस्त झाली होती.

**रक्तबंबाळ अवस्थेत होता पडून**

घटनेच्या दिवशी दुपारी तो राहुलच्या घरी गेला. मात्र, राहुल घरी नव्हता. तो घरी परतल्यावर राहुलच्या पत्नीने ताराचंद पुन्हा आल्याचे सांगितले. राहुल पुन्हा संतापला. रात्री ९ च्या सुमारास ताराचंद पुन्हा राहुलच्या घराकडे गेला. राहुल त्याला रस्त्यातच भेटला. राहुलची कॉलर पडकून सांग माझी पत्नी कुठे गेली, तुला माहिती आहे, असे म्हणत राहुलला ओढले. संतापलेल्या राहुलने जवळच पडलेला दगड उचलून त्याच्या डोक्यावर वार केले. ताराचंद रक्तबंबाळ होत खाली कोसळला. माहिती मिळताच एपीआय मेघा गोखरे, एपीआय विलास पाटील, हवालदार अमोल बांबोलकर, सुहास राऊत यांनी घटनास्थळी धाव घेतली. ताराचंदला रूग्णालयात घेवून गेले. मात्र, डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले. दुसऱ्या पथकाने सीसीटीव्ही फुटेज आणि नागरिकांच्या माहितीवरून राहुलला अटक केली. वरिष्ठ पोलिस निरीक्षक रमेश खुणे यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून परिसरात पोलिसांची गस्त वाढविली आहे.

# राज्यात तिसऱ्या आघाडीचा प्रयोग

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :** महाराष्ट्राचे राजकारण युती आणि आघाडीवर सुरु झाले आहे. राज्यात शिवसेना-भाजप युती होती. त्यानंतर त्या युतीमध्ये अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस आल्यानंतर महायुती झाली.

महायुतीला आव्हान देण्यासाठी शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना उबाठा आणि काँग्रेस यांची महाविकास आघाडी निर्माण झाली. विधानसभा निवडणुकीपूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पणतू राजरत्न आंबेडकर यांनी मनोज जरांगे यांना सोबत घेऊन तिसरी आघाडी निर्माण करण्याचा प्रयत्न केला. परंतु तो यशस्वी झाला नाही.

आता राज्यातील तीन बडे नेते राजू शेट्टी, बच्चू कडू आणि महादेव जानकर एकत्र येत आहे. त्या नेत्यांनी तिसऱ्या आघाडीचा प्रयत्न सुरु केला आहे. त्यावर येत्या २० एप्रिल रोजी शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे.



२० एप्रिल रोजी नव्या आघाडीवर शिक्कामोर्तब?

राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर यांचा २० एप्रिल रोजी वाढदिवस आहे. त्यानिमित्त बच्चू कडू मोठा निर्णय घेणार आहे. राष्ट्रीय समाज पक्षाने पुण्यात युवा संघर्ष निर्धार परिषद भरवली आहे.


त्यावेळी महादेव जानकर यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने मेळाव्याच आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याला बच्चू कडू आणि राजू शेट्टी उपस्थित राहणार आहेत. या दिवशी राजू शेट्टी आणि बच्चू कडू मोठा निर्णय जाहीर करणार आहेत.

राज्यात तिसरी आघाडी निर्माण होण्याची शक्यता राजू शेट्टी, बच्चू कडू आणि महादेव जानकर या तिन्ही नेत्यांच्या माध्यमातून झाली आहे. हे तिन्ही नेते एकत्र येत मोठा निर्णय घेणार आहे, अशी माहिती बच्चू कडू यांनी दिली. त्यासाठी त्यांनी फुले वाड्यात येण्याचे आवाहन सर्व कार्यकर्त्यांना केले आहे. यामुळे २० एप्रिल रोजी राज्याच्या राजकारणाचे लक्ष फुले वाडा राहणार आहे.

पुणे शहरात २० एप्रिल रोजी ह्युवा संघर्ष निर्धार परिषद २०२५ह होणार आहे. खोट्या आश्वासनांना कंटाळलेल्या तरुणांचा बुलंद निर्धार.! या टॅगलाईन खाली परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे या मेळाव्यातून राज्यातील सत्ताधाऱ्यांना टीकेचे लक्ष केले जाणार आहे. राज्यात तयार होणारी ही तिसरी आघाडी प्रबळ विरोधक ठरणार का? या प्रश्नाचे उत्तर आगामी काळात मिळणार आहे.

## भाजपच्या एटीट्युडला सुप्रीम कोर्टाचा धक्का

### सुषमा अंधारे यांची टीका



■ **मुंबई :** सर्वोच्च न्यायालयाने वक्फ दुरुस्ती विधेयकाला दिलेल्या स्थगितीवरून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारवर निशाणा साधला आहे. वक्फच्या संदर्भात सुप्रीम कोर्टाने दिलेला आदेश हा संसदीय लोकशाही व्यवस्थेला अधोरेखित करणारा आहे. संसदेकडे बहुमत असले तरी घटनात्मक चौकटीच्या बाहेर जाऊन संसद कायदा करू शकत नाही, हेच कलम २५,२६ चा अन्वयार्थ लावत सुप्रीम कोटार्ने या प्रकरणी स्थिती जैसे थे ठेवण्याचे आदेश दिलेत, असे त्या म्हणाल्यात.

सुषमा अंधारे म्हणाल्या, वक्फ बोर्डाच्या संदर्भात सुप्रीम कोर्टाने दिलेला निर्णय हा पुन्हा एकदा संविधानकर्त्यांच्या दूरदृष्टकोनाचा प्रत्यय आणून देणारा आहे. संविधानकर्त्यांनी इथल्या छोट्या व दुर्बल घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी संविधान सर्वोतपरी प्रयत्नशील असेल असे म्हटले होते. या दोन्ही कलमांतर्गत प्रत्येक व्यक्तीला आपले धार्मिक स्वातंत्र्य कायम ठेवण्याचा आणि धार्मिक प्रचार प्रचाराशी संबंधित असणाऱ्या संस्था आणि त्यांचे व्यवस्थापन स्वतंत्रपणे चालवण्याचा अधिकार असेल, यावर चर्चा करत हा संदर्भ देत कोर्टाने हा निकाल दिला.

एका अर्थाने कोर्टाने भारतीय जनता पार्टीच्या बहुमताच्या जोरावर काहीही करण्याच्या एटीट्यूडला धक्का देण्याचे काम केले आहे. किंबहुना या देशातील संसदीय लोकशाही पद्धत, ज्याच्यामध्ये कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्याय मंडळ हे एकमेकांना सत्ता संतुलित करत राहतील हे तत्त्व पुन्हा एकदा प्रस्थापित झाले आहे, असे सुषमा अंधारे यांनी म्हटले आहे.

## 'ब्राह्मणांना नेमकं काय खटकते?

### अनुराग कश्यपचा संतप्त सवाल



■ **मुंबई :** महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित 'फुले' चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वीच वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. ब्राह्मण महासंघाने या चित्रपटावर आक्षेप घेतला होता. त्यानंतर सेन्सॉर बोडार्नेही चित्रपटातील काही दृष्यांवर आक्षेप घेत, ती दृष्ये हटवण्यास आणि काही दृष्यांमध्ये बदल करण्यास सांगितले आहे. सीबीएफसीच्या या निर्णयावर दिग्दर्शक अनुराग कश्यपने संपात व्यक्त केला आहे. अनुरागने सोशल मीडियावर एक लांब पोस्ट लिहून सीबीएफसीवर टीका केली. त्याचबरोबर त्यांनी पोस्टमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींबद्दल एक मोठी गोष्ट देखील लिहिली.

धडक २ च्या स्क्रिनींग वेळी सेन्सॉर बोर्डाने मोदींनी देशातून जातीवाद हद्दपार केल्याचे म्हटले होते. पण आता संतोष चित्रपटही भारतात प्रदर्शित होत नाहीये. आता ब्राह्मणांचा फुलेंवरही आक्षेप आहे. जेव्हा जातीयवाद नाही, तर ब्राह्मणांना समस्या का येत आहेत? तुम्ही रागाने का जळत आहात? देशातून जात व्यवस्था, जातीवाद हद्दपार केला गेलाय तर मग आता हे ब्राह्मण कसे काय? कोण आहात तुम्ही? जेव्हा जातीव्यवस्था नव्हती, तेव्हा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले का होते? असा सवाल अनुराग कश्यपने उपस्थित केला.

एखादा सिनेमा जेव्हा सेन्सॉर बोर्डाकडे जातो तेव्हा बोर्डावर चार सदस्य असतात. पण काही गटांच्या आणि पक्षांच्या लोकांना हे सिनेमे कसे पाहायला मिळतात. ही सगळी यंत्रणा भ्रष्ट आहे. जातीवाद, प्रांतवादावर आधारित सिनेमांना हे सरकार अडकवून ठेवत आहे, त्यांना आपलाच चेहरा असा बघायची लाज वाटतेय, असेही अनुराग कश्यप म्हणाला.

## महाराणा प्रताप पुतळ्याचे अनावरण

■ **छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी:** केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह हे शुक्रवार, १८ एप्रिल रोजी छत्रपती संभाजीनगर येथे येत असून, त्यांच्या हस्ते कॅनॉट गार्डन येथे वीर शिरोमणी महाराणा प्रताप यांच्या भव्य पुतळ्याचे अनावरण होणार आहे. या ऐतिहासिक सोहळ्याला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही प्रमुख उपस्थिती असेल.

हा कार्यक्रम दुपारी १२ वाजता प्लेस सिडको परिसरात आयोजित करण्यात आला आहे. महाराणा प्रताप यांच्या शौर्य आणि पराक्रमाचे स्मरण करणारा हा पुतळा शहराच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशात भर घालणारा ठरणार आहे.

## सरकारने आश्वासनांची पूर्तता करावी



■ **मुंबई :** निवडणूक काळात महायुतीच्या नेत्यांनी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता न झाल्याचा आरोप करत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला विभागाने सरकारविरोधात आक्रमक पवित्रा घेतला आहे. बहुमताची झाली तजवीज, सरकार झाले ४२०! असे बॅनर राष्ट्रवादी भवनाबाहेर लावून सरकारच्या दडपशाहीविरोधात जोरदार एल्गार पुकारला. या बॅनरवरून पोलिसांनी कारवाईचा प्रयत्न केला, मात्र महिला विभागाच्या प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी पोलिसांना जाब विचारत माघार घ्यायला भाग पाडले.

रोहिणी खडसे म्हणाल्या, सरकारने बॅनरवर लक्ष केंद्रित करण्यापेक्षा निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करावी. आम्ही सरकारच्या दडपशाहीला घाबरणार नाही. आश्वासनांचा जाब विचारतच राहू. त्यांनी ह्यलाडकी बहीणह्व योजनेंतर्गत महिलांना २१०० रुपये देण्याच्या आश्वासनाची आठवण करून दिली. आता सरकार २१०० रुपये सोडून ५०० रुपये देण्याची भाषा करते. हे दुर्दैव आहे, अशी टीका त्यांनी केली.

## पुतळा विटंबना प्रकरणी जयंत पाटलांचा हल्लाबोल



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :** अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची दिवसाढवळ्या झालेल्या विटंबनेमुळे संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. या घटनेला २० दिवस उलटूनही आरोपींना अटक न झाल्याने माजी राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी बेमुदत अन्नत्याग उपोषण सुरू केले होते.

तिसऱ्या दिवशी पोलिस प्रशासनाने कारवाईचे आश्वासन दिल्यानंतर त्यांनी उपोषण तात्पुरते मागे घेतले. या प्रकरणावर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका करत गंभीर सवाल उपस्थित केले आहेत.

जयंत पाटील म्हणाले, अलिकडच्या काळात राष्ट्रपुरुषांच्या अवमानाच्या घटना वारंवार घडत आहेत. मूलभूत प्रश्न बाजूला सारण्यासाठी जाती-धमार्चे मुद्दे जाणीवपूर्वक पुढे आणले जात आहेत का, असा प्रश्न सर्वसामान्यांच्या मनात निर्माण झाला आहे. यामुळे समाजात अस्थिरता निर्माण होऊन विकासाचे नेमके कोणते पाऊल उचलले जात आहे? छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार देशभर पोहोचवण्याचा दावा करणारे सरकार त्यांचा अपमान करणाऱ्यांना मोकाट सोडते, हा दुटप्पीपणा आहे, अशी घणाघाती टीका त्यांनी केली.

पाटील यांनी गृहमंत्रालयाला अशा घटनांचा तातडीने छडा लावण्याचे आदेश पोलिसांना देण्याची मागणी केली. छत्रपती शिवरायांचे विचार चिरकाल टिकावेत, त्यांचे आदर्श पुढच्या पिढीपर्यंत पोहोचावेत, यासाठी प्राजक्त तनपुरे यांनी सुरू केलेला लढा अधिक दृढ व्हावा, असे आवाहन त्यांनी केले. या घटनेमुळे सरकारच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, पोलिसांच्या ढिसाळ कारवाईमुळे जनतेचा विश्वास डळमळीत झाला आहे. समाजात एकता आणि सौहार्द राखण्यासाठी तातडीने कठोर पावले उचलावी, असे त्यांनी म्हटले आहे.

## महेश मांजरेकर यांना व्ही. शांताराम जीवन गौरव पुरस्कार



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १७ :** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे दिल्या जाणाऱ्या मानाच्या चित्रपट पुरस्कारांची घोषणा आज सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी केली.

यामध्ये चित्रपती व्ही.शांताराम जीवन गौरव पुरस्कार, चित्रपती व्ही.शांताराम विशेष योगदान पुरस्कार, स्व.राज कपूर जीवन गौरव पुरस्कार, स्व.राज कपूर विशेष योगदान पुरस्कार तसेच गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार अशा पाच महत्त्वाच्या पुरस्कारांची घोषणा आज मंत्री ॲड. शेलार यांनी मंत्रालयात झालेल्या पत्रकार परिषदेतून दिली.

या वर्षीचा चित्रपती व्ही.शांताराम जीवन गौरव पुरस्कार नामवंत अभिनेता, दिग्दर्शक व निर्माते महेश मांजरेकर जाहीर झाला आहे. १० लाख रुपये रोख, स्मृतिचिन्ह, मानपत्र व चांदीचे पदक असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार यंदा प्रसिद्ध अभिनेत्री मुक्ता बर्वे यांना प्रदान करण्यात येणार असून, या पुरस्काराचे स्वरूप ६ लाख, स्मृतिचिन्ह, मानपत्र व चांदीचे पदक असे आहे.

हिंदी चित्रपट सृष्टीतील मानाच्या स्व.राज कपूर जीवन गौरव पुरस्कार प्रख्यात अभिनेते अनुपम खेर यांना देण्यात येणार आहे. तर स्व.राज कपूर विशेष योगदान पुरस्कार यंदा अष्टपैलू अभिनेत्री काजोल देवगणला मिळणार आहे. या दोन्ही पुरस्कारांचे अनुक्रमे १० लाख व ६ लाखांचे स्वरूप आहे.

तसेच, १९९३ पासून देण्यात येणारा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार यावर्षी मराठीतील ज्येष्ठ गझल गायक भीमराव पांचाळे यांना प्रदान करण्यात येणार आहे. हा पुरस्कार १० लाख रोख रक्कम, मानचिन्ह, मानपत्र व शाल यांसह दिला जातो. सर्व पुरस्कारांचे वितरण २५ एप्रिल रोजी एन.एस.सी.आय. डोम, मुंबई येथे एका भव्य समारंभात होणार आहे.

या सोहळ्याशिवाय, संविधान अमृत महोत्सव आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य विभागातर्फे २० एप्रिल रोजी सायंकाळी ६:३० वाजता गेटवे ऑफ इंडिया, मुंबई येथे एक खास सांगीतिक मानवंदना कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

## युतीवर अवलंबून राहू नका : गोऱ्हे



■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १७ :** पुण्यात शिवसेनेच्या सभासद नोंदणी अभियानाच्या कार्यक्रमात नीलम गोऱ्हे उपस्थित होत्या. यावेळी त्यांनी अनेक विषयांवर भाष्य केले आहे. तसेच युटीवर अवलंबून राहू नका, असा संदेशही नीलम गोऱ्हे यांनी दिला आहे.

मुंबई, ठाणे वगळता इतर ठिकाणी युती होणे अवघड आहे, झाली तर आनंदच आहे. पण अवलंबून राहू नका, असा संदेश नीलम गोऱ्हे यांनी कार्यक्रमात बोलताना कार्यकर्त्यांना दिला आहे. पुण्यातील काही विधानसभा मतदारसंघात आता आम्ही सभासद नोंदणी सुरू करणार आहोत, अशी माहिती नीलम गोऱ्हे यांनी दिली आहे. नीलम गोऱ्हे म्हणाल्या, युती होईल का नाही हे माहिती नाही. याचा सर्वस्वी निर्णय आमचे वरिष्ठ नेते एकनाथ शिंदे, देवेंद्र फडवणीस आणि अजित पवार घेतील. आपण पक्ष वाढवावा तेवढेच मला वाटते. योग्य निर्णय वरिष्ठ घेतील.

## गुंगीची गोळी देऊन मेव्हणीवर बलात्कार

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १७ :** वारजे परिसरात राहणाऱ्या एका कुटुंबातील ३६ वर्षीय दाजीने मेव्हणी घरी रहाण्यास आल्यानंतर तिला डोके दुखत असल्याने दोन गुंगीच्या गोळ्या खाण्यास दिल्या. त्यानंतर घरात कोणी नसल्याची संधी हेरुन १८ वर्षीय मेव्हणीवर बलात्कार केलो.

पिडित तरुणी ही बहिणीचे घरी असताना, घरातील लोक नवरात्री निमित्त यात्रेसाठी बाहेर गेले होते. दाजीने तिला दोन गोळ्या खाण्यास दिल्या. ती गुंगीत असताना, तिच्यावर जबरदस्तीने शारिरिक संबंध केले. याप्रकरणी दाजीविरूद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# भारतात वारसावास्तू संवर्धन हास्यास्पद!

(१८ एप्रिलः आंतरराष्ट्रीय वारसा दिन विशेष)

आपल्याकडे समाज एकसंध राहण्यासाठी कलाकृतीची मंदिरे बांधण्याचा प्रभाव यादव, शिलाहार काळापासून चालत आला आहे. युनेस्कोतर्फे १८ एप्रिल हा दिवस जागतिक वारसा दिन म्हणून साजरा केला जातो. लिखित स्वरूपाच्या इतिहासाबरोबर वास्तुरुपी राष्ट्रवैभवाचे योग्य संवर्धन करणे हे सरकार बरोबर सुजाण नागरिकांचेही कर्तव्य आहे. याची समाजमनाला जाणिव करून देण्यासाठी युनेस्कोतर्फे हा दिवस जागतिक वारसा दिन म्हणून साजरा केला जातो.

------------------

आपल्या समाजमनात प्रौढशिक्षण, लैंगिकशिक्षण या विषयांप्रमाणे प्राचीन वारसावास्तूंचे महत्त्व आणि संवर्धनाबाबत अज्ञान, बेफिकिरी आणि उदासिनता आहे. हा विषय सर्वत्र पोचवायचा असेल तर दृकश्राव्य माध्यमाबरोबर साध्यासोप्या भाषेतून त्यावर विपुल लेखन होणे गरजेचे आहे. तरच संस्कारक्षम विद्यार्थ्यांपासून, अशिक्षित, असंस्कृत पर्यटकांना त्याची जाण येईल.

पाश्चिमात्य राष्ट्रांसह इजिप्तसारख्या पुरातन वास्तूवैभवाच्या देशातील वारसासंवर्धनाच्या जाणीवेची उणीव आपल्याकडे प्रकर्षाने जाणवते. आमची अलौकिक कलाकृतीची मंदिरे ही फक्त धार्मिक ठिकाणच नव्हती, तर सभोवतालचा समाज एकसंघ राहण्यासाठी ती शैक्षणिक, सांस्कृतिक केंद्रे होती. हे आम्ही ध्यानात का घेत नाहीत?

या मंदिरवास्तूंच्या व्यासपीठावरून नृत्य, किर्तन, गायन, प्रवचन, भारूड, पाठशाळा यांच्याबरोबर प्रांगणात आठवडी बाजार, जत्रा, मंडई उपक्रम राबवले जात होते. बरोबरीने न्यायनिवाडा करण्याचे ते एक समाजमान्य न्यायालयही होतेच. याशिवाय मंदिर माध्यमाद्वारे वाद घालून संवाद साधण्याचे हे लोकांचे एक हक्काचे ठिकाण होते. तर व्याख्यान, प्रवचनांद्वारे लोकोपयोगी माहिती पुरवण्याचा परिपाठ तर वाखाणण्याजोगा होता. आता हे सारे इतिहासजमा होताहेत, याचीच मनाला खंत वाटते!

पृथ्वीवर जशी काळानुरूप नैसर्गिक स्थित्यंतरे सतत घडत असतात, तशी अनेक क्षेत्रात मानव निर्मित घटकांतही परिवर्तन घडत असते. त्यात कला क्षेत्राप्रमाणे सांस्कृतिक तसेच ऐतिहासिक क्षेत्रातही बदल घडत असतात. त्यात मानवाने आपल्या संस्कृतीचे मापदंड गणल्या जाणा?या कलाकृती निर्माण केल्यास त्यांना इतिहासाच्या पाऊल खुणांबरोबर धार्मिक अधिष्ठानासह सांस्कृतिक मोलही आहे. त्यातील काहींना राष्ट्राच्या अस्मितेची शान आहे.

त्यात गडकोट, कमानी, राजवाडे, मनोरे, विजयस्तंभ प्रशासकीय इमारती आदींचा समावेश आहे. हजारो वर्षांच्या इतिहासात अनेक राज्यकर्त्यांनी आपल्या धर्माच्या आधारावर, तत्त्वप्रणालीनुसार लेणी, स्तुप, मंदिर, चर्च, मशीदी, मनोरे, कमानी उभारल्या, त्या वारसा वास्तु गणल्या गेल्या. लिखित स्वरूपाच्या इतिहासाबरोबर या राष्ट्रवैभवाचे योग्य संवर्धन करणे, हे सरकार बरोबर सुजाण नागरिकांचेही कर्तव्य आहे. याची समाजमनाला जाणिव करून देण्यासाठी युनेस्कोतर्फे १८ एप्रिल हा दिवस जागतिक वारसा दिन म्हणून साजरा केला जातो.

आपल्याकडे समाज एकसंध राहण्यासाठी कलाकृतीची मंदिरे बांधण्याचा प्रभाव यादव, शिलाहार काळापासून आहे. वारसा वास्तुप्रकारात मंदिर वास्तूंचे प्रमाण सर्वाधिक आहे. त्यावरील कलाकृती ही पर्यटक, अभ्यासकांना भूरळ घालणारी आहे. परंतु दुर्दैवाने या बऱ्याच मंदिरांसह, लेण्या, गुहामंदिरे, गडकोट, कमानी यांची आजची अवस्था दयनीय असून त्यांचे अस्तित्वच धोक्यात आले आहे.

आता नवीन मंदिरे उभारताना त्यावर मार्बल, ग्रेनाईट आदींचा साज चढवून ते सुशोभित करण्याच्या प्रयत्नात त्यांचा मूळ ढाचा, बाज, प्राचीन स्थापत्य कौशल्य नाहीसे होत चाललेय. त्यामुळे आमचा प्राचीन बांधकाम वारसाच नष्ट होतोय. आर्थिक पाठबळाच्या आधारावर नवीन मंदिरवास्तू उभारताना ज्या नवीन मंदिरवास्तू उभारल्या जाताहेत, पण प्रादेशिक वास्तुकलेच्या प्राचीन मंदिरांच्या संवर्धनाकडे दुर्लक्ष होत आहे. आधुनिकपणा बरोबर नावीन्याची कास धरताना आम्ही आमचा वैभवशाली वारसा विसरत चाललोय हेच यातून जाणवते.

भारतातील प्राचीन संस्कृती दर्शवणाऱ्या वारसावास्तू, लेण्या, स्तुप आदी पाहण्यासाठी जगभरचे पर्यटक, अभ्यासक येत असतात. मात्र इतिहासाचे मापदंड ठरलेल्या या घटकांच्या संवर्धनाची समाजात व शासकीय पातळीवरही जाणीव नाही, दुर्दैव! याकडे होणारे दुर्लक्ष अक्षम्य असून भावीकाळात हा राष्ट्रीय ठेवा इतिहासजमा होण्याची वेळ येऊन ठेपली आहे. परिसराचा विकास साधताना, धरण प्रकल्प निर्माण होताना प्राचीन वास्तूंना जलसमाधी का लाभली? याचे कुणालाच सोयरसुतक नाही.

**कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरुजी**
**गडचिरोली. ९४२३७१४८८३**

आपल्याकडे पुरातत्त्वखाते कायम उपेक्षितच राहिले आहेत. वारसा स्थळांच्याद्वारे प्राप्त होणारा महसूल अत्यल्प असेल, या कारणाने या खात्याकडे गांभीयार्नेही पाहिले जात नाही. देशातील वारसावास्तूंची संख्या आणि त्यांच्या संवर्धनासाठी मंजूर निधी, याचे प्रमाण तर हास्यास्पद आहे.

लोप पावलेल्या अज्ञात संस्कृतीला जनमानस-समोर आणून तिच्या इतिहासासह त्यावेळच्या समाजजीवनावर प्रकाश झोत टाकण्याचे काम पुरातत्त्व अभ्यासाद्वारे होत असते. हेच पुरातत्व शास्त्राला अभिप्रेत आहे.

१७८४ मध्ये आपल्या देशात एशियाटिक सोसायटीची स्थापना करून पुरातत्व शास्त्राचा पाया घातला गेला. त्याला शास्त्रीय अभ्यासाची जोड देण्यासाठी १८६० साली आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया ही अस्थापना स्थापन करून ब्रिटिश प्रशासकांनी पुरातत्वखात्याला प्रोत्साहन दिले होते. ग्रामीण भागात प्राचीन मूर्ती विरघळत, शिलालेख रस्त्याच्या कडेला उनपावसात तडाखे सोसत उभे आहेत, तर काही वारसा वास्तूंचे अवशेष आपल्या घरांच्या पायऱ्यासाठीही वापर करून आपली गरज भागविली जात आहे.

येथील काही किल्ले, लेण्या, स्तंभावर खडू-कोळशाने आपले नाव ठळकपणे लिहून आपण या ठिकाणी आपल्या मैत्रिणींसह भेट दिल्याचा पुरावा दर्शवणाऱ्या खुणा पाहून पर्यटकांच्या असंस्कृतपणाची कीव करावीशी वाटते. खरं तर, ही पुरातन कलाकृती निर्माण करणारे कलाकार अज्ञात आहेत, परंतु असले आचरटाचार्य पर्यटक सवंग प्रसिद्धीच्या हव्यासापोटी या वास्तूसौंदर्याला बाधा आणतात.

जसा निसर्गाचे मोल जाणणारा पर्यटक वनपर्यटनाला हवा आहे, तसाच वारसा वास्तूचे मोल जाणणारा अभ्यासूपर्यटक असेल, तरच या राष्ट्रवैभवाचे संवर्धन होईल. भूकंपासारख्या आपत्तीतही काही प्राचीन मंदिर वास्तूंवर परिणाम झाला नाही तेव्हा पूर्वीच्या बांधकाम तंत्रज्ञानाचा अभ्यास करून या शास्त्राच्या आधारावर इमारती बांधकामाचे तंत्रज्ञान विकसित करण्याचा विचारही आम्हाला सूचत नाही.

खोदकाम करताना अनेकदा जुन्या वस्तू, मूर्ती आढळतात. त्या शैक्षणिक संस्था, ग्रामपंचायत तालुका तहसिलदार यांच्याकडे जमा करून अखेरीस प्रत्येक जिल्हा पातळीवर चांगले वस्तुसंग्रहालय निर्माण होणे शक्य आहे. पण सरकारी जाच-काच व नियमांचा कोलदांडा टाकण्यासाठी याची कुठेच नोंद होत नाही. त्यासाठी सुजाण नागरिकांबरोबर लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेणे आवश्यक आहे,

शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वारसा वास्तू दर्शन सहलींचे हेरिटेज वर्क आयोजन करून या वारसावास्तू स्थळदर्शनाद्वारे या अनमोल ठेव्याचे संवर्धन करणे कसे आवश्यक आहे, हे त्यांच्या मनावर बिंबवता येईल. त्यासाठी प्रथमतः त्यांच्या अभ्यासक्रमातच या विषयाचा समावेश करावा लागेल. बऱ्याचदा सहल व्यवस्थापक गाईडची भूमिका पार पाडतो. आयोजित सहलीचे वेळापत्रक सांभाळणारा हा व्यवस्थापक वारसा वास्तू अभ्यासक, मार्गदर्शक असेलच असे नाही. तो स्थानिक मार्गदर्शकांकडे पर्यटकांच्या गटाला सोपवून मोकळा होतो. यासाठी सहल व्यवस्थापकानाच वारसावास्तू मार्गदर्शनाचे प्रशिक्षण हवे.

पर्यटकांना वारसा स्थळ दर्शनापेक्षा भोजन खरेदीतच जास्त स्वारस्य असते. अनेक वारसावास्तू स्थळ दर्शनात अधिकृत मार्गदर्शकच नसतो आणि जो स्थानिक स्वयंघोषित मार्गदर्शक असतो, ती तर प्रचलित दंतकथा सांगत या ठिकाणी कोणत्या चित्रपटांचे छायाचित्रण झाले हे सांगण्यात धन्यता मानतो व ऐकणारे पर्यटकही आपली सहल सत्कारणी धन्यता मानतो.

ऐकणारे पर्यटकही आपली सहल सत्कारणी लागल्याचं समाधान घेऊन भोजन- खरेदीसाठी तत्परतेने परततील किंवा या स्थळाची आजची अवस्था पाहून सरकारी यंत्रणेला दोष देत काही वेळ हळहळतील. पण याच ठिकाणी आडोशाला मद्यपानाचा आस्वाद घेऊन सहलीचा आनंद द्विगुणीत करतील. फार तर घरी परत त्यावर एखाद्या वृत्तपत्रातून त्या वारसा स्थळाच्या आजच्या सोचनीय स्थितीबद्दल पत्र प्रसिद्ध करून राष्ट्रीय कर्तव्य पार पाडल्याच समाधान मानणारे पर्यटक भरपूर आहेत.

वैयक्तिक छंद म्हणून काहींनी स्वतःचे वस्तुसंग्रहालय उभारले आहे. त्यांना शासकीय मान्यतेसह अनुदान दिल्यास प्राचीन वारसा संवर्धन कामाला प्रोत्साहन मिळेल. काही कुटुंबांकडे जुनी शस्त्रे, वस्तू आहेत त्यांनाही मदतीसह आवाहन करून हा ठेवा संग्रहालयात सुपूर्द करण्यासाठी प्रोत्साहन दिल्यास संग्रहालयात त्याचे योग्य जतन होईल.

सक्षम ज्येष्ठ नागरिकांच्या ज्ञानासह त्यांच्या क्षमतेचा उपयोग करून घेतला जात नाही. इतिहास, प्राचीन वास्तू, संस्कृती यात गती असलेल्या ज्येष्ठांना मार्गदर्शक म्हणून काम करण्याची तयारी असूनही त्यांच्या आवाहनाला शासन दरबारी प्रतिसाद नाही. काही वारसा वास्तूसमुहाची परिक्षेत्र व्याप्ती मोठी असते, तेव्हा प्रवेश द्वारीच मार्गदर्शक नकाशा व संक्षिप्त माहितीफलकच नसतो आणि जो असतो तो वाचणे अशक्य असते. मात्र असल्या स्थळी प्रवेश शुल्क तत्परतेने आकारले जाते.

आता मानवनिर्मित वारसा कलाकृती बरोबर काही नैसर्गिक स्थळांची दखल युनेस्कोने घेऊन त्यांचाही जागतिक वारसा स्थळात समावेश केला आहे. त्यात महाराष्ट्रातील पश्चिम घाट क्षेत्रातील चार स्थळांचा समावेश झाला आहे. परंतु या अजस्त्र घाटमाथ्यावरील निसर्गराजा जसा आम्हाला खचितच क्षमा करणार नाही, तसेच वारसा वास्तूसंवर्धनाची उपेक्षाही हेच सांगते, हे विशेष! ■ ■ ■

# बाळासाहेबांच्या एआय भाषणावर शिंदेंसेनेचा हल्लाबोल!

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :** उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना पक्षाचा नाशिकमध्ये भव्य मेळावा पार पडला. या मेळाव्यात बाळासाहेब ठाकरे यांच्या आवाजातील एआय भाषण शिवसैनिकांना ऐकवण्यात आले. बाळासाहेबांच्या या एआय भाषणात शिवसेना फुटीवर भाष्य करण्यात आलें. याच भाषणात निष्ठावंत म्हणून घेणारे गद्दार निघाले, असंही या म्हणण्यात आलें.



आता याच भाषणावर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे नेते तथा खासदार नरेश म्हस्के यांनी प्रतिक्रिया दिलीय. बाळासाहेबांच्या बनावट आवाजाचा उपयोग करावा लागतोय याचे वाईट वाटतेय. बाळासाहेबांचे खरे विचार आमच्यासोबत आहेत, असं म्हणत म्हस्केंनी ठाकरेंवर हल्लाबोल केला आहे.

त्यांनी बाळासाहेबांचे विचार सोडले आहेत. बाळासाहेबांच्या बनावट आवाजाचा उपयोग करावा लागला याचं वाईट वाटत आहे. पण बाळासाहेबांचा ओरिजनल विचार आमच्यासोबत आहे. त्यांना बनावट कॅसेटचा उपयोग करावा लागला आहे, बाळासाहेबांच्या आवाजाची नक्कल करून आमच्यावर टीका करत आहेत. बाळासाहेबांचा आत्मा काय म्हणत असेल, असे म्हणत त्यांनी ठाकरेंच्या शिवसेनाला डिवचलं.

त्यांचा पक्ष शिल्लक राहिलेला नाही. त्यांना सर्वच सोडून चालले आहेत. म्हणून बाळासाहेबांच्या आवाजात बोलायला लावून बनावटगिरी करत आहेत. हा बाळासाहेबांचा अपमान आहे, असा हल्लाबोल म्हस्के यांनी केला.

उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणात एकनाथ शिंदे यांची नक्कल केली. तसेच दाढीचा उल्लेख करून त्यांनी शिंदेंनाही डिवचलं. हातात तलवार पकडायला मनगटात जोर लागतो. आपला सर्व जोर फेसबुक वरती आहे. दाढी वाढवण्याकरता छत्रपतींचा विचार हृदयात लागतो. तोही विचार तुमच्यात नाही. दाढी, तलवार आणि मनगट या गोष्टी विसरून जा, अशी टीका नरेश म्हस्के यांनी केली.

### संजय राऊत यांचे परखड उत्तर



बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने ज्यांनी बनावट शिवसेना निर्माण केलीय, त्यांनी हे बोलू नये. बाळासाहेबांच्या नावाचा बनावट वापर करून एक शिवसेना अमित शाह यांनी तयार केली. ती इथे महाराष्ट्रात काही लोकांना चालवायला दिली. बनावट शिवसेना. त्यांना बाळासाहेबांच्या भूमिका बनावट वाटणारच. हे काय कालच झालं का? या आधी मुंबईच्या शिबीरातही असा प्रयोग केला. तेव्हा लक्ष गेलं नाही. त्यांनी आपल्या नेत्यांचं ऐकलं पाहिजे, बाळासाहेबांशी या लोकांचा काय संबंध आहे? अमित शाह यांनी एक बनावट संघटना केली आणि त्याला शिवसेना हे नाव निवडणूक आयोगाला द्यायला लावलं. म्हणून त्यांचा बाळासाहेब ठाकरेंवर अधिकार होत नाही, असं संजय राऊत म्हणाले.

# धामणगावात साडे आठ तास वीज गायब

## प्रधान तंत्रज्ञ म्हणतो, तुम्हाला जे करायचं ते करून घ्या!




**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे, ( दि. 17 )**– भीषण उकाड्याने आधीच त्रस्त असलेल्या दत्तापूर, धामणगाव रेल्वेतील नागरिकांना बुधवार 16 एप्रिल च्या दुपारी 4:30 वाजेपासून तब्बल साडे आठ तास वीज पुरवठा बंद असल्याने मोठ्या संकटाचा सामना करावा लागला. संध्याकाळपासून वीज गायब झाली असून मध्यरात्र उलटल्यावर 1.50 वाजेपर्यंत सुध्दा शहरातील सर्वच वीज पुरवठा बंद असल्यामुळे दत्तापूर व धामणगाववासी नागरीकांचा जीव अक्षरश: मेटाकुटीस आला होता. नारगावंडी सब स्टेशन कडे येणाऱ्या 35 केवी लाईनची दत्तापूरजवळ तार तुटल्यामुळे सदरहू वीजपुरवठा बंद पडल्याची माहिती प्राप्त आहे.

### आजारी व्यक्ती व विद्यार्थ्यांचे हाल, नागरिक संतप्त

उकाड्यात वीज नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे फार हाल झाले. परीक्षेच्या तयारीसाठी अभ्यास करणाऱ्या मुलांच्या घरांतील पंखे, कूलर बंद होते. इन्व्हर्टर व बॅकअपही संपले. घरातील आजारी व्यक्तीची हालत अधीकाधीक नाजूक होत चालली होती. अनेक कुटुंबे अंधारात व उकाड्यात घाम गाळत होती.

### साधी विचारणा केली तरी धमकी

या प्रकाराबाबत विचारणा करण्यासाठी नागरिकांनी महावितरणच्या प्रधान तंत्रज्ञ रितेश सुरेश जाधव यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी असे अत्यंत उद्धटपणे उत्तर दिले. या अपमानास्पद वर्तनामुळे नागरिक प्रचंड संतप्त झाले असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता कोणीही फोन उचलत नव्हते. अनेकांनी सोशल मीडियावर संताप व्यक्त करत संबंधित अधिकाऱ्यांविरोधात कारवाईची मागणी केली आहे.

### तक्रार मेलने पाठवली – कारवाईची मागणी

या घटनेबाबत सचिदानंद प्रभातकुमार काळे (विज ग्राहक तथा जेष्ठ नागरीक ) यांनी महावितरण मुख्यालय व अमरावती परिमंडळाला मेल द्वारे तक्रार केली आहे. त्यांनी तक्रारीत म्हटले की, विजेची आत्यंतिक गरज असलेल्या उन्हाळ्याच्या काळात वीज पुरवठा खंडीत झाल्यावर शक्य तितक्या लवकर पुर्ववत सुरू करण्यासाठी आवश्यक पूर्वनियोजन तैनात ठेवावे व जनतेची संभाव्य त्रासातून तत्परतेने सुटका करण्याच्या दृष्टीने कंपनी प्रशासनाने वीज ग्राहकांसोबत सौजन्यशील वागणूकीचा परिचय देत सुयोग्य पावले उचलावी, अशी मागणी सर्व स्तरावरील नागरीकांकडून केली जात आहे.

# घरातील साहित्य शिफ्टींग करतेवेळी कारमधील 5.24 लाखाचे दागिन लंपास

## न्यायाधीशांच्या पत्नीची गाडगेनगर पोलीसात तक्रार



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 17 )** गाडगे नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रहिवासी असणारे न्यायाधीश यांची बदली झाली होती. त्यामुळे घरातील साहित्य ट्रकमध्ये भरले जात होते. अशावेळी न्यायाधीशांच्या पत्नीने कारमध्ये ठेवलेली साडेचार लाख रुपयांचे दागिने चोराने लंपास केले. या घटनेची तक्रार महिलेने गाडगेनगर पोलिस ठाण्यात 16 एप्रिल रोजी रात्री दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सूत्रांनुसार तक्रारदार महिलेचा पती शासकीय नोकरीत आहे. तर महिला ही गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहते. मात्र महिलेच्या पतीची बदली झाल्याने त्यांनी घरातील साहित्य शिफ्ट करण्यासाठी 16 एप्रिल रोजी ट्रक बोलावला होता. 7 ते 10 जण साहित्य शिफ्टिंगच्या कामासाठी आले होते. दरम्यान, अज्ञात आरोपींनी महिलेच्या घरातील एक तोळ्याचा राणी हार, 1 लाख 75 हजार रुपये किमंतीचे मोठे मंगळसूत्र, 60 हजार रुपये किमंतीचा राणी हार, 45 हजार रुपये किमंतीची लहान मुलांची चेन, 45 हजार रुपये किमंतीच्या दोन सोनसाखळ्या, 7 ग्रॅम किमतीची 30 हजार रुपये किमतीची अंगठी, 30 हजार रुपये किमतीची अंगठी, 4 ग्रॅमचे टॉप्स, कानातले, चांदीची भांडी व इतर साहित्य असा एकूण 5 लाख 24 हजार 500 रुपयांचे दागिने चोरून नेले. चोरीचा प्रकार उघडकीस येताच महिलेने 16 एप्रिल रोजी रात्री गाडगेनगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## 22 व 23 एप्रिल रोजी पाणीपुरवठा राहणार बंद

**अमरावती** – नांदगाव पेठ ते माहुली गावादरम्यान पाईपलाईन गळतीच्या दुरुस्तीचे काम करण्यात येणार आहे. त्यामुळे अमरावती व बडनेरा शहरातील पाणीपुरवठा सेवा 22 व 23 एप्रिल रोजी बंद राहणार असल्याची माहिती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दिली आहे. मजीप्राच्या कार्यकारी अभियंत्याने दिलेल्या पत्रानुसार, अमरावती पाणीपुरवठा योजनेंतर्गत नेरपिंगळई येथून येणाऱ्या 1500 मिमी व्यासाच्या पीएससी ग्रॅव्हिटी पाइपलाइनमधील नांदगाव ते माहुली गावांदरम्यानची गळती दुरुस्त करण्यात येत आहे. यासाठी संपूर्ण अमरावती व बडनेरा शहराचा पाणीपुरवठा 22 व 23 एप्रिल रोजी बंद राहणार आहे. गळती दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर पूर्ण करण्यात येणार असून लवकरच अमरावती व बडनेरा शहरात पाणीपुरवठा सुरळीत करण्यात येणार आहे. पाणी साठवून त्याचा योग्य वापर करण्याचे आवाहन मजीप्राच्या माध्यमातून नागरिकांना करण्यात आले आहे.

## साहित्य पुरवठ्यात व्यापाऱ्याला 2.25 लाखाने गंडविले

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती ( दि. 17 )** – उपकरणे पुरविण्यातील व्यवहारात शहरातील एका व्यापार्याची 2.25 लाख रुपयांची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे.

**तीन संचालकांवर गुन्हा दाखल**

शंकर सीतलदास शेवानी (69, अग्रवाल कॉम्प्लेक्स रॅलीस प्लॉट, अमरावती) यांच्या तक्रारीवरून सिटी कोतवाली पोलिसांनी पालघर येथील डाईझर इंडिया प्रा.लि.चे संचालक व्यंकटाचल श्रीधर हेडगे, संजीव घोष आणि देवनजी घोष यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राप्त माहितीनुसार, शंकर शेवानी यांची रॅलीस प्लॉटमधे लॅबलाइन इन्स्ट्रुमेंट्स इंडिया प्रा. कंपनी आहे. या कंपनीला उपकरणे पुरवण्यासाठी शंकर सेवानी यांना आरोपींचा फोन आला होता. त्याअंतर्गत शंकर शेवानी यांनी 2 लाख 25 हजार रुपये ऑनलाइन पाठवून काही उपकरणे खरेदी केली. मात्र त्यानंतर कंपनी संचालकांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. उपकरणेही पुरविण्यात आली नाहीत. शंकर शेवानी यांनी कंपनीची चौकशी केली असता खोट्या पत्त्यावर कंपनी असल्याचे उघड झाले. तिन्ही संचालकांनी कंपनी बंद करून शंकर शेवानी यांची 2 लाख 25 हजार रुपयांची फसवणूक केली. याप्रकरणी कारवाईसाठी शंकर शेवानी यांनी तक्रार दाखल केली होती. तपास अहवालानंतर सिटी कोतवाली पोलिसांनी डायजर इंडिया प्रा. लि. कंपनी आणि संचालक व्यंकटाचल श्रीधर हेडगे, संजीव घोष आणि देवनजी घोष यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून चौकशी सुरू करण्यात आली आहे.

## साक्षगंधानंतर हुंड्याची मागणी करून लग्न तोडले

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 17 )** – साक्षगंध झाल्यानंतर भावी पतीने हुंडा म्हणून 5 लाख रुपयांची मागणी करून शेवटच्या क्षणी लग्न तोडले. याप्रकरणी तरुणीने खल्लार पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी भावी पती किरण गोपाळराव आमझरे (31, बोरगाव, अचलपूर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

प्राप्त माहितीनुसार, खल्लार पोलिस ठाण्यातील बेंबळा येथे राहणाऱ्या 23 वर्षीय तरुणीचे किरण आमझरे याच्यासोबत प्रेमसंबंध होते. या दोघांनीही 13 फेब्रुवारी 2025 रोजी साक्षगंध केले होते, मात्र त्यानंतर किरण आमझरेने लग्नास नकार दिला होता. तू तुझ्या वडिलांकडून 5 लाख रुपये आणशील तर तुझ्याशी लग्न करेन, नाहीतर करणार नाही. अखेरच्या क्षणी हुंड्याची मागणी करून मुलीची व तिच्या कुटुंबाची फसवणूक केल्याची तक्रार आरोपींनी खल्लार पोलिस ठाण्यात दिली. मुलीच्या तक्रारीवरून खल्लार पोलिसांनी आरोपी किरण आमझरे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# मागिल पाच वर्षात पीक विमा कंपन्यांना 50 हजार कोटींचा फायदा

## विमा कंपन्यांना अधिक लाभ, शेतकऱ्यांच्या पदरी मात्र घंटा | केंद्र व राज्य सरकारे मात्र इळी, मिळी, गिळी चुप्प

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार, ( दि. 17 )** – दरवर्षीच नैसर्गिक आपत्तीमुळे शेती पीकांचे अतोनात नुकसान होते. याचा अर्थिक फटका शेतकऱ्यांना बसतो.परिणामी शेतकरी देशोधडीला लागतात. अशा अडचणीच्या वेळी शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळावा. यासाठी देशातील बहुसंख्य राज्यात,पीक विमा योजना लागू करण्यात आली आहे.मात्र या योजनेचा शेतकऱ्यां ऐवजी पीक विमा कंपन्यांनाच अधिक लाभ होतांना दिसून येत आहे. कारण मागिल पाच वर्षांत पीक विमा कंपन्यानी, 50 हजार कोटींचा, निव्वळ नफा रूपी फायदा मिळविला आहे. पीक विमा व्दारे शेतकऱ्यांना मिळणारी भरपाई, मात्र दिवसें दिवस कमी होत गेली आहे.

केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालया कडून प्राप्त माहितीनुसार केंद्र सरकारने 2016-17 पासून अतिवृष्टी, गारपीट, वादळी वारे, भूस्खलन यासह शेती पीकांचे इतरही येणार्या अनेक नैसर्गिक आपत्ती मुळे होणाऱ्या शेती पीकांचे नुकसानाच्या वेळी, शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्यासाठी पंतप्रधान पीक विमा योजना सुरू केली आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे पीकांचे नुकसान होऊन अडचणी आलेल्या शेतकऱ्यांना,पीक विम्या व्दारे आर्थिक मदतीचा हात देणे. हा या पीक विमा योजनेचा मूळ उद्देश होता. तरीही दिवसेंदिवस शेतकऱ्यांना मिळणारी भरपाईची



### महाराष्ट्रातून साडे दहा हजार कोटी रुपयांचा नफा

राज्यात 2016 - 17 पासून पीक विमा योजना सुरू झाली. 2016 - 17 ते 2023 - 24 या आठ वर्षांत शेतकरी, राज्य सरकार व केंद्र सरकारने एकूण 43 , 201 कोटी रूपयांचा वीमा हप्ता कंपन्याना दिला आहे. मात्र शेतकऱ्यांना विमा कंपन्यांनी भरपाई पोटी, 32 , 610 कोटी रूपये दिले आहेत.तर विमा कंपन्यांनी या काळात, 10 , 591 कोटी रुपयांचा निव्वळ नफा कमावला आहे.

| वर्ष | विमा हप्ता | भरपाई रक्कम | कंपन्यांचा नफा (रक्कम कोटीत) |
|---|---|---|---|
| 2019-20 | 32,261.86 | 27,913.30 | 4,348.56 |
| 2020-21 | 31665.53 | 21,225.05 | 10,440.48 |
| 2021-22 | 30,035.19 | 20,850.69 | 9,184.5 |
| 2022-23 | 31,115.17 | 18,385.14 | 12,730.03 |
| 2023-24 | 29505.82 | 16,504.54 | 13,001.28 |

रक्कम कमी कमी होत गेली.मात्र पीक विमा कंपन्यांचा नफा वर्षा गणिक वाढतच गेला. त्यामुळे पीक विमा योजनेचा मूळ उद्देश साध्य झाला नसल्याची स्थिती निर्माण झाली आहे. ही बाब माहित असूनही या बाबत कोणता लांडगा ही ठोस निर्णय न घेता, केंद्र व राज्य सरकारे इळी-मिळी-गिळी चुप्प बसली आहेत. सरकारच्या या चूप बसण्याच्या धोरणांमुळे, पीक विमा कंपन्यांना अधिक लाभ झाला आहे.तर शेतकऱ्यांच्या पदरी मात्र घंटाच आला आहे.

2019-2020 ते 2023-2024 या पाच वर्षांत शेतकरी व सरकार कडून 17 पीक वीमा कंपन्यांना, एकूण 1 लाख,54 हजार, 543 कोटी रूपये एकत्रित विमा हप्ता भरला आहे.या काळात विम्यापोटी शेतकऱ्यांना 1 लाख,5 हजार कोटी रूपयांची मदत देण्यात आली आहे. उर्वरीत 49,704 कोटी रुपयांचा निव्वळ नफा, विमा कंपन्यानी आपल्या घसात घातला आहे. 2020-21 मध्ये विमा कंपन्यांचे उखळ चांगलेच पांढरे झाले आहे.या वर्षात एकूण 5,806.21 कोटी रूपयांचा हप्ता पीक विमा कंपन्यांना भरण्यात आला होता. यापैकी कंपन्यांनी शेतकऱ्यांना 1,431.34 कोटी रूपयांची भरपाई शेतकऱ्यांना दिली.या एका वर्षात पीक विमा कंपन्यांनी 4,374.87 कोटी रूपयांचा निव्वळ नफा मिळाला होता. विमा हप्त्याच्या तुलनेत शेतकऱ्यांना, फक्त 25 टक्केच भरपाई देण्यात आली होती. मात्र 2022-23 पासून पीक विम्याचा बीड पॅटर्न 80 : 110 राज्यात लागू झाला. त्या नंतर मात्र भरपाईची रक्कम थोडी वाढली आहे. तरीही ही भरपाई वीमा कंपन्यां हातचे राखूनच देतात.

एक रूपयात पीक विमा योजने मुळे भ्रष्टाचार व गैरव्यवहार झाल्याचे, शासनाच्या निदर्शनास आले आहे.यामुळे शेतकऱ्यांसह सरकारचेही नुकसान झाले आहे.या पीक विमा योजनेचा शेतकऱ्यांना फारसा फायदा झाला नाही.पीक विमा कंपन्यांन्याच फक्त फायद्यात राहील्या. त्यामुळे राज्य सरकार व राज्याच्या कृषी विभागा,पीक विमा योजनेची फेररचना करणार असल्याचे कळते. लवकरच त्या बाबतची राज्य सरकार कडून घोषणा केली जाण्याची शक्यता आहे. नविन येणारी पीक विमा योजना शेतकऱ्यांना फायदेशीर ठरेल.अशी अपेक्षा ठेवू या.

**राहुल सातपुते,**
**जिल्हा कृषी अधीक्षक.**

### हवामान आधारित पीक विमा योजना हवी

मागिल पाच वर्षांपासून राबविण्यात येणाऱ्या पीक विमा योजनेचा शेतकऱ्यांना कोणताच फायदा झाला नाही. शेतकऱ्यांचे नुकसान होऊन ही कापूस, तूर, सोयाबीन,फळ पीके या पिकांना विमा संरक्षण मिळाले नाही.परिणामी शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला.तर विमा कंपन्यां मात्र गब्बर झाल्या आहेत. सरकार सध्या पीक विमा योजनेत बदल करणार असल्याचे कळते. नैसर्गिक आपत्तीने नुकसान झाल्यास, त्यासाठी शेतकऱ्यांना पीक विम्याचा आर्थिक आधार मिळायलाच पाहिजे. त्यासाठी सरकारने शेतकऱ्यांचे हित लक्षात घेता, हवामान आधारित पीक विमा योजना सुरू करावी.

**पुष्पक खापरे,**
**शेतकरी प्रतिनिधी,जिल्हा पीक विमा समिती.अमरावती.**

फळ पीकाचा विमा हा हवामान आधारित आहे. त्यामुळे हवामान ट्रिगर नुसार त्यांना, मंडळ निहाय नुकसान भरपाई मिळते. मात्र इतर खरीप व रब्बी पीकांना नुकसान होऊन ही लाभ मिळत नाही. 85 टक्के शेतकरी खरीप व रब्बी ची पीके, मान्सून वरच घेतात.त्यांना पीक विम्याचा फायदा मिळण्यासाठी, हवामान आधारित पीक विमा योजना लागू करने आवश्यक आहे.

**मंगेश देशमुख,**
**जिल्हा अध्यक्ष, प्रहार शेतकरी संघटना अमरावती.**

**उपवनसंरक्षक, मेळघाअ व्याघ्र प्रकल्प, सिपना वन्यजीव विभाग, परतवाडा यांचे कार्यालय, पिन- ४४४८०५**

कार्यालयीन दुरध्वनी क्र. ०७२२३-२२०२१४ e-mail-dycfwlsipna@mahaforest.gov.in

## लिलाव सुचना

व्याघ्र प्रकल्पाअंतर्गत सर्व गावकऱ्यांना कळविण्यात येते की, सेमाडोह संकुल उपहारगृहाचा लिलाव येत्या २९/०४/२०२५ रोजी सिलबंद लिफाफामध्ये उपवनसंरक्षक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, सिपना वन्यजीव विभाग, परतवाडा यांचे कार्यालयात सकाळी १२.०० वाजता करण्याचे ठरविले आहे.

१. लिलावात जास्तीत जास्त दर नमुद करणाऱ्या व्यक्ती/गट यांन उपहारगृह चालविण्या करीता देण्यात येईल.
२. उपहारगृह चालविण्याचा कार्यकाळ ११ महिन्याचा राहिल.
३. लिलावात भाग घेण्यासाइी अनामत रक्कम व निविदा फॉर्म विक्री शुल्क खालीलप्रमाणे राहिल.

| अ.क्र. | उपहारगृहाचा तपशिल | भरावयाची अनामत रक्कम | कालावधी | निविदा फॉर्म विक्री शुल्क |
|---|---|---|---|---|
| १. | सेमाडोह संकूल | ५००००/- | ११ महिने | ३००/- |

४. शासकीय उपहारगृह/खाजगी उपहारगृह चालविण्याचे १ वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र सोबत जोडावे.
५. सदर अनामत रक्कमेचा डी.डी. उपवनसंरक्षक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, सिपना वन्यजीव विभाग, परतवाडा यांच्या नावे निविदे सोबत जोडावे लागेल.
६. निविदा भरण्याचा कालावधी दिनांक २१/०४/२०२५ ते दिनांक २८/०४/२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजे पर्यंत राहिल. निविदा दिनांक २९/०४/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता उघडण्यात येईल. तरी जास्तीत जास्त जोकांनी लिलावात भाग घ्यावा.
७. निविदा फॉर्म उपवनसंरक्षक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, सिपना वन्यजीव विभाग, परतवाडा यांचे कार्यालयात दिनांक २१/०४/२०२५ ते दिनांक २७/०४/२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजे पर्यंत विक्रीस उपलब्ध राहिल. (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून)

**अटी व शर्ती :-**

१. सदर उपहारगृह ११ महिन्याकरीता देण्यात येईल व त्यांचे कामगिरी नुसार सदर करार वाढविण्याचा पुनर्विचार करण्यात येईल.
२. उपहारगृहामध्ये जलतनाचा वापर करता येणार नाही, व तसेच स्थानिक लोकांना रोजगार देणे अनिवार्य राहिल.
३. उपहारगृहाचे भाडे प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेच्या आत भरून त्याची छायाप्रत संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयात जमा करावी लागेल.
४. सुरूवातीचे २ महिन्याचे भाडे अनामत रक्कम म्हणून शासनास अनिवार्य राहिल. व ११ महिने संपल्यावर अनामत रक्कमेतुन शासनास घेणे असलेली रक्कम वजा करून उर्वरीत रक्कम परत करण्यात येईल.
५.उपहारगृहाची तसेच सभोवतालच्या परिसराची नियमीतपणे साफसफाई करावी लागेल.
६. उपहारगृहाध्मये मद्यपान/धुम्रपान होणार नाही याची दक्षता घ्यावी.
७. उपहारगृहामध्ये खाद्यपदार्थाचे बाजार भावानुसार दरपत्रक लावावे लागेल.
८. विज बिल नियतमितपणे भरून विज पुरवठा खंडित होणार नाही याची दक्षता घ्यावी1
९. अन्न व औषधी विभागांकडून उपहारगृहाचा परवाना काढूण आनण्याची जबाबदारी स्वत:ची राहिल.
१०. उपहारगृह ११ महिन्यापूर्वी मध्येच सोडल्यास अनामत रक्कम परत मिळणार नाही.
११. वनविभागाचे पुर्व परवानगीशिवाय उपहारगृह कोणत्याही परिस्थितीत बंद ठेवला येणार नाही.
१२. उपहारगृहाचे स्वच्छ, शुद्ध व सात्विक भोजन देण्याची जबाबदारी उपहारगृह चालकाची राहिल.
१३. व्याघ्र प्रकल्पात येणारे पर्यटक हे आपले अतिथी/पाहुणे असल्याने त्यांना सन्मानजनक वागणुक देणे व त्यांच्याशी अगत्यपुर्वक वर्तन करणे आवश्यक आहे.
१४. पर्यटकांनी केलेल्या तक्रारीची गंभीर दखल घेऊन परवाना रद्द करण्याबाबत विचार करण्यात येईल.
१५. उपहारगृहातील व परिसरातील शासकीय मालमत्ता, साधने परवाना समाप्त झाल्यानंतर सुस्थितीत वनविभागचे ताब्यात देण्याची जबाबदारी उपहारगृह चालकाची राहिल.
१६. तोडफोड/ गहाळ झालेल्या साहित्याची शासकीय दराप्रमाणे वसुली केली जाईल.
१७. महिन्यातुन एकदा कॅन्टीनमध्ये अन्न दर्जा, स्वच्छता यावी, तपासणी संबंधित अधिकारी करतील. तपासणी दरम्यान अन्न दर्जा गुणवत्तापूर्ण आढळून न आल्यास व स्वच्छता बाबत त्रुटी आढळल्यास करारनामा रद्द करण्यात येईल.
१८. बाल कामगारास कामावर ठेवण्यास मनाई राहिल.
१९. तक्रार रजिष्टर ठेवणे बंधनकारक राहिल.
२०. कॅन्टीनमध्ये उंदीर, पाली, झुरळ, उधळी ईत्यादी करीता विषारी द्रव्ये वापरण्यास तसेच विषारी द्रव्याचा साठा करण्यास सक्त मनाई राहिल.
२१. उपरोक्त नियमांचा भंग झाल्यास परवाना रद्द करण्याचा हक्क वनविभाग राखून ठेवत आहे.
२२. सदर निविदा प्रक्रियेमध्ये फेरबदल किंवा रद्द करण्याचा अधिकार समितीकडे राखुन ठेवण्यात येत आहे.

वरील अटी व शर्तीचा भंग झाल्यास उपहारगृह चालकावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल व परवाना रद्द करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी1


( दिव्यभारती एम. भा.व.से )
उपवनसंरक्षक
मेळघाट व्याघ्र प्रकल्प,
सिपना वन्यजीव विभाग, परतवाडा

विमाका/अम./जाही./57/२०२४-२०२५

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# भूदान चळवळ



भूदान चळवळ (जमीन भेट चळवळ), ज्याला रक्तहीन क्रांती म्हणूनही ओळखले जाते, ही भारतातील एक स्वयंसेवी जमीन सुधारणा चळवळ होती. गांधीवादी विनोबा भावे यांनी आजच्याच दिवशी म्हणजे १८ एप्रिल १९५१ रोजी पोचमपल्ली गावात सुरुवात केली. भूदान चळवळीने श्रीमंत जमीनदारांना त्यांच्या जमिनीचा काही भाग स्वेच्छेने भूमिहीन लोकांना देण्यास प्रवृत्त करण्याचा प्रयत्न केला. भावे यांनी सर्वोदय चळवळ आणि ग्राम स्वराज्यातून तात्विक प्रेरणा घेतली.

---

भूमिहीन मजुरांना लहान भूखंड देण्यात आले होते ज्यावर ते स्थायिक होऊ शकतील आणि त्यांची पिके घेऊ शकतील. हा कायदा अशा प्रकारे पारित करण्यात आला की लाभार्थ्याला जमीन विकण्याचा किंवा ती बिगर-कृषी कारणांसाठी किंवा वनीकरणासाठी वापरण्याचा अधिकार नव्हता. उदाहरणार्थ, महाराष्ट्र राज्य भूदान कायद्याच्या कलम २५ मध्ये असे म्हटले आहे की लाभार्थ्याने (जो भूमिहीन असावा) फक्त उदरनिर्वाह शेतीसाठी जमीन वापरावी. जर मालकाने₹ एक वर्षापेक्षा जास्त काळ जमीन कसली नाही किंवा ती बिगर-कृषी कामांसाठी वापरण्याचा प्रयत्न केला तर सरकारला ती जप्त करण्याचा अधिकार असेल.

भावे यांना शेतकऱ्यांनी शेतीसाठी बैल, ट्रॅक्टर किंवा इतर यंत्रांचा वापर सोडून द्यावा अशी इच्छा होती. हिंदीमध्ये याला ऋषी-खेती म्हणतात. भावे यांना लोकांनी कांचन-दानाच्या स्वरूपात पैशाचा वापर सोडून द्यावा अशीही इच्छा होती. या चळवळीला काँग्रेसचा पाठिंबा होता . १९५३ मध्ये भूदान चळवळीत सामील होण्यासाठी जे.पी. नारायण यांनी सक्रिय राजकारणातून माघार घेतली.

भावे यांनी जमीन मालकांना त्यांच्या जमिनीचा एक तुकडा देण्यास भाग पाडण्यासाठी पायी भारत पादाक्रांत केला. त्यांना पहिले यश १८ एप्रिल १९५१ रोजी आंध्र प्रदेशातील नलगोंडा जिल्ह्यातील पोचमपल्ली गावात मिळाले (आता तेलंगणा) जे कम्युनिस्ट चळवळीचे केंद्र होते. ते तेलंगणा शेतकरी चळवळीचे कळस होते. स्थानिक जमीनदारांविरुद्ध शेतकऱ्यांनी हिंसक संघर्ष सुरू केला होता.

चळवळीच्या आयोजकांनी भावे यांची पोचमपल्ली येथे राहण्याची व्यवस्था केली होती, जिथे सुमारे ७०० कुटुंबे राहतात, त्यापैकी दोन तृतीयांश कुटुंबे भूमिहीन होती. भावे यांनी हरिजन वसाहतीला भेट दिली. दुपारपर्यंत गावकरी त्यांच्याभोवती जमू लागले. हरिजनांनी चाळीस कुटुंबांसाठी ८० एकर (३२ हेक्टर) जमीन, चाळीस ओली, चाळीस कोरडी अशी मागितली. भावे यांनी विचारले, जर सरकारकडून जमीन मिळवणे शक्य नसेल, तर गावकरी स्वतः काही करू शकत नाहीत का?

व्ही. रामचंद्र रेड्डी यांनी सुरुवातीला त्यांच्या ३,५०० एकर (१४ किमी २ ) जमिनीपैकी १०० एकर (४० हेक्टर) जमीन दान केली. नंतर, त्यांनी ८०० एकर दान केली. ते सामाजिक सुधारणांमध्ये सामील झाले. त्यांच्यानंतर, त्यांच्या मुलांच्या मदतीने भूदान ट्रस्ट चळवळीअंतर्गत जमीन दान चळवळ चालू राहिली. हैदराबादचे ७ वे निजाम मीर उस्मान अली खान यांनीही त्यांची १४,००० एकर वैयक्तिक जमीन भूदान चळवळीला दान केली.

राजा बहादूर गिरिवार नारायण सिंह, सीबीई आणि रांका (गढवा झारखंड) येथील राजा यांच्यासह इतर जमीन मालकांनी भूदान उपक्रमासाठी एकत्रित १०२,००१ एकर (४१२.७८ किमी २ ) एकर जमीन दान केली, जी भारतातील सर्वात मोठी देणगी आहे. नमुदग इस्टेटचे राजा बहादूर यांनीही भूदान उपक्रमासाठी १.०१ लाख एकर जमीन दान केली.

रामगढ राजचे महाराजा कामाख्या नारायण सिंह बहादूर यांनी २ लाख एकर जमीन विनोबा भावे आणि इतरांना बिहार भूदान यज्ञ कायद्यांतर्गत, खटल्याच्या संस्थेच्या आधी दान केली, जी कोणत्याही राजाची सर्वात मोठी देणगी ठरली. दरभंगा राजचे महाराजाधिराज कामेश्वर सिंह जी यांनी भूदान चळवळीत १.१७ लाख एकर जमीन दान केली.

विनोबा भावे यांच्या सूरजगड भेटीदरम्यान, त्यांचे स्वागत मुख्याध्यापक रामबिलास शर्मा यांनी केले, ज्यांनी १९५० च्या दशकाच्या उत्तरार्धात आणि १९६० च्या दशकाच्या सुरुवातीला झुनझुनू जिल्ह्यात भूदान चळवळीचा प्रसार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती.

या चळवळीचा प्रारंभिक उद्देश स्वेच्छेने देणग्या मिळवणे आणि भूमिहीनांना वाटणे हा होता परंतु लवकरच सर्व खाजगी जमिनीच्या १/६ भागाची मागणी करण्यात आली. १९५२ मध्ये, चळवळीने ग्रामदान (भेट म्हणून दिलेले गाव किंवा संपूर्ण गावाचे दान) ही संकल्पना व्यापक केली आणि जमिनीच्या सामान्य मालकीचा पुरस्कार करण्यास सुरुवात केली. ग्रामदान अंतर्गत येणारे पहिले गाव उत्तर प्रदेशातील हमीरपूर जिल्ह्यातील मंगरोथ होते . दुसरे आणि तिसरे ग्रामदान १९५५ मध्ये ओरिसामध्ये झाले.

ही चळवळ गावदान किंवा ग्रामदान चळवळीत विकसित झाली आणि भारतात आणि भारतात दोन्ही ठिकाणी सर्वोदय समाज (सर्व सामाजिक-आर्थिक-राजकीय व्यवस्थेचा उदय) स्थापन करण्याच्या व्यापक चळवळीचा एक भाग होती.

१९६० च्या दशकापर्यंत, चळवळीने गती गमावली होती. सर्वोदय समाज सामाजिक परिवर्तनासाठी दबाव निर्माण करणारी जनआंदोलन उभारण्यात अपयशी ठरला. तथापि, नैतिक द्विधा मनःस्थिती निर्माण करून, जमीनदारांवर दबाव आणून आणि भूमिहीनांना अनुकूल परिस्थिती निर्माण करून या चळवळीने महत्त्वपूर्ण योगदान दिले.

■ ■ ■

# बुलडोझर चालविणे म्हणजे बहादुरकी नव्हे



उत्तरप्रदेशच्या प्रयागराज विकास प्राधिकरणाने केलेली बुलडोझर कारवाई अमानवी, बेकायदेशीर आणि मानवी हक्कांना बाधा पोहोचविणारी आहे. कारवाईमुळे आपला विवेक डळमळीत झाला असून प्रशासनाने सहा आठवड्याच्या आत प्रत्येकाला १० लाखांची भरपाई द्यावी असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने १ एप्रिलला दिला.

न्या. अभय एस. ओक आणि न्या. उज्वल भुयान यांच्या न्यायालयाने कारवाईवर सुनावणी करताना म्हटले की, देशातील लोकांची निवासी घरे अशा प्रकारे पाडता येत नाही.आम्ही हे संपूर्ण प्रकरण बेकायदेशीर म्हणून नोंदवत आहोत.देशातील कोणतीही सरकार असो फक्त बुलडोझरची कारवाई केल्याने किंवा चालविल्याणे कोणीही मोठ होत नाही किंवा कोणतेही समाधान निघत नाही किंवा बुध्दीमान होत नाही किंवा बहादुर होत नाही. माणूस हा बुध्दीजीवीप्राणी आहे त्यामुळे आपल्या बुद्धीचा वापर विचारपूर्वक, जाणिवपूर्वक व योग्य व्हायला पाहिजे आणि त्याचा गैरवापर होऊ नये याकडेही तेवढेच तिक्ष्ण लक्ष देणे गरजेचे आहे. याचे जिवंत उदाहरण आपण प्रयागराजमध्ये पाहीले. ही बुलडोझरची घटना अंगावर शहारे आणणारी व १४० कोटी जनतेला स्तब्ध करणारी दिसून आली. या कारवाईत माणुसकीच्या संपूर्ण सिमा ओलांडल्याचे दिसून आले. उत्तर प्रदेशात झोपडपट्टीवरील बुलडोझर कारवाई दरम्यान पुस्तके छातीशी कवटाळून धावत घराबाहेर पडणाऱ्या शाळकरी मुलीचा व्हिडिओ पाहून सर्वांनाच धक्का बसला आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले.

प्रयागराजमधील कारवाई प्रकरणी सुनावणी करतांना न्यायालयाने समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात व्हायरल झालेल्या आंबेडकर नगरमधील जलालपूरा येथील झोपडपट्टीवरील कारवाईच्या या व्हिडिओची दखल घेतल्याने हे अमानवी कृत्य लक्षात आले. प्रयागराज विकास प्राधिकरणाने पाडकामाची कारवाई अमानवी पध्दतीने केली, असे निरीक्षण न्यायमूर्ती अभय ओक आणि उज्वल भुयान यांच्या खंडपीठाने नोंदवले. आपल्या देशात कायद्याचे राज्य आहे आणि नागरिकांची निवासस्थाने अशा प्रकारे पाडली जाऊ शकत नाहीत असेही सर्वोच्च न्यायालयाने सुनावले.

कोणतीही कारवाई असो त्याचा सखोल अभ्यास करूनच केली पाहिजे. देशातील राज्य सरकारांना वाटत असेल की ज्या-ज्या ठिकाणी अवैधरित्या झोपडपट्टया वसलेल्या आहेत. त्या-त्या ठिकाणची संपूर्ण शहानिशा सरकारने करावी व संपूर्ण झोपडपट्टी वासियांसाठी सर्वप्रथम राहण्याची व्यवस्था करावी जेणेकरून उत्तरप्रदेशातील घटनेचा पुनरावृत्ती होणार नाही. याचीही काळजी संपूर्ण राज्य सरकारांनी घेणे गरजेचे आहे. राज्य सरकारांनी देशातील बाहुबली समजणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांच्या घरावर बुलडोझर अवश्य चालविला पाहिजे. धक्कादायक बाब म्हणजे २५१ खासदारांवर गुन्हेगारी खटले दाखल आहेत, तरीही ते स्वतःला लोकप्रतिनिधी म्हणतात. असोसिएशन ऑफ डेमोक्रॅटिक रिफॉम्सच्या (एडीआर) अहवालात असे दिसून आले की देशातील ४५ टक्के आमदारांवर गुन्हेगारी खटले दाखल आहेत ही धक्कादायक बाब समोर आली आहे. अशाप्रकारे आजी-माजी आमदार-खासदारांवर जर गुन्हेगारी खटले असतील व त्यांच्याजवळ करोडोंची संपत्ती असेल तर देश कंगाल होणार नाही तर काय?

आज देशातील ८० टक्के आजी-माजी आमदार-खासदार-मंत्री यांच्या जवळ करोडोंची चल-अचल संपत्ती आहे. सोबतच खंडणी वसूलीसाठी अनेक आका सुध्दा यांनी पोसुन ठेवले आहेत. आज आपण यांचा विचार केला तर देशातील ८० टक्के मुठभर राजकीय पुढाऱ्यांजवळ करोडो रुपयांची चल-अचल संपत्ती आहे ही संपत्ती देशाच्या १४० कोटी जनतेला ५ वर्षे पुरेल इतकी आहे. परंतु कायदे-कानुन बनविणारे हेच असल्याने यांच्यावर कठोर कारवाई होत नाही किंवा बुलडोझर सुध्दा चालत नाही ही स्वतंत्र भारताची शोकांतिका आहे.न्या.अभय ओक व न्या.उज्वल भुयान यांच्या न्यायपीठाने सांगितले की घटनेच्या कलम-२१ नुसार निवाऱ्याचा मूलभूत अधिकार आहे. नागरिकांची घरे अशा प्रकारे पाडली जाऊ शकत नाहीत. म्हणजेच अन्न,वस्त्र आणि निवारा आवश्यक आहे.यातील निवारा किती महत्त्वाचा आहे ही बाब प्रयागराजच्या घटनेवरून लक्षात येते.देशातील राज्य सरकारांना खरोखरच बुलडोझर कारवाई करायची असेल तर माफिया राज चालविणाऱ्यांवर करावी, खंडणी वसूल करणाऱ्यांवर व त्यांना खतपाणी घालणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांवर करावी, भ्रष्टाचाऱ्यांवर करावी, भ्रष्ट अधिकाऱ्यांवर करावी. याचे स्वागत देशातील तळागाळातील संपूर्ण लोक करतील. गरीब व सर्वसामान्यांजवळ रहाण्यापुरते फक्त स्वतःचे घर असते किंवा किरायाने रहातात किंवा झोपडीत रहातात.

यांच्या तुलनेत राजकीय पुढारी, भ्रष्टाचारी यांचा विचार केला तर गरीब व सर्वसामान्य व्यक्ती शुन्य असल्याचे दिसून येते. कोणतीही बुलडोझर कारवाई करतांना सामाजिक बांधिलकी ठेवून करावी जेणेकरून कोणाचेही घर हिसकावल्या जाणार नाही किंवा कोणी उघड्यावर कोणी येणार नाही याची काळजी अवश्य घ्यावी. कारण निवाऱ्याचा मूलभूत अधिकार सर्वांनाच आहे हेही लक्षात घेतले पाहिजे.

■ ■



रमेश कृष्णराव लांजेवार
स्वतंत्र पत्रकार, नागपूर.
९९२१६९०७७९

# डालडा

हार्टॉग्ज कंपनीने १९२६ साली डालडा ह्य नावाची मक्तेदारी घेतली. अस्तित्वात आल्यापासून पाच वर्षांच्या आत शिवडीच्या फॅक्टरीत डालडा बनायला सुरुवात झाली. १९३७ साली प्रकाश टंडन नावाच्या एका भारतीयाला बोर्डावर घेऊन लिव्हरनी आपले हेतू स्पष्ट केले आणि त्यानंतर हिंदुस्थान लिव्हरच्या अश्वमेधाचा घोडा अडवायला कुणीच धजावलं नाही. स्वैंपाकघरात एकदा डालडा आला आणि नंतर कायमचा तेथेच राहिला.

डालडा या नावाचा एक वेगळाच किस्सा आहे. सुरुवातीला हे वनस्पती तूप भारतात आयात केलं जायचं ह्यडाडा अँड कंपनीह्ममार्फत. लिव्हरला स्वतःचा मालकी हक्क दाखवायचा होता. मग त्यात तडजोड म्हणून एल जोडून डालडा नाव तयार झालं.

डालडा म्हटल्यावर नाक मुरडणारी माणसं रांगेत उभं राहून डालडा आणायला लागली. तसं आपल्याकडे डालडा काही नवीन नव्हतं. पण त्याला स्वैंपाकघरात मान्यता नव्हती. पण नंतर हळुहळू तेल किंवा तूप म्हणजे वनस्पती तूप मिळणे, हेच परमोच्च भाग्याचे लक्षण आहे; हे कळल्यावर असल्या शंका मनात येणेच बंद झाले.

स्वैंपाकघरात एकदा डालडा आला आणि नंतर कायमचा तेथेच राहिला. याचे श्रेय जाते हिंदुस्थान लिव्हरच्या चिवट मार्केटिंगला. सुरुवातीला हातगाडीवर स्टोव्ह आणि कढईचा संसार मांडून एक माणूस डालड्यात पुऱ्या तळून दाखवायचा आणि जमलेल्या गर्दीला आग्रहाने खायला घालायचा. त्यानंतर डालड्यात बनवायच्या पाककृतींचं पुस्तकं पण आलं.

डालडा म्हणजे काय तर हायड्रोजिनेटेड तेल. तेलापासून बनवलेलं तूप. म्हणून वनस्पती तूप. दिसायला




साजूक तुपासारखं. रंगाने आकर्षक आणि चवीने एकदम बुद्रू. साधारण तेलाच्या रेणू शृंखलेतल्या रिकाम्या शिटा हायड्रोजनच्या रेणूंनी भरून काढल्या की झालं वनस्पती तूप तयार. पॅलॅडीयम नावाच्या एका धातूच्या मदतीने हे स्थित्यंतर सहजशक्य होते. कारण आकारमानाच्या नऊशे पट हायड्रोजनचे रेणू वाहून नेण्याची क्षमता या धातूत आहे.

हायड्रोजिनेशन केल्यावर तेलाचं जे काही होतं त्याला म्हणायचं वनस्पती तूप. त्यात थोडासा बदल करून- जीवनसत्त्वाची भर घालून हिंदुस्थान वनस्पती मॅन्युफॅक्चरिंग कंपनीने पहिल्यांदा डालडा भारतात आणला. नंतर या कंपनीचं नाव हिंदुस्तान युनिश्लिव्हर झालं.

१९६५-१९७१ ची दोन युद्धं झाली. सत्तर, एकाहत्तर, बहात्तरची वर्षे लागोपाठ अवर्षणाची गेली आणि डालडा पण काळ्या बाजारात गेलं. लोकसभेत डालडाच्या वाढत्या भावावर आणि दुर्भिक्षावर अनेक चर्चा झडल्या आणि डालडा रेशन कार्डावर मिळायला लागलं. राहणीमान बेचव झालं, पण तगून राहण्याची गरज त्यापेक्षा मोठी होती.

दादर स्टेशनला उतरल्यावर सामंतांच्या दुकानातल्या काचबंद पेटीतल्या लोण्याच्या प्रचंड आकारमानाच्या गोळ्याकडे बघून सुस्कारा सोडून लोक पुढे निघून जाताना बघितली आहेत. खानदेश-कोइंबत्तूर-बेळगाव ही लोण्याची घराणी आजही कसाबसा जीव तगवून उभी आहेत.

डालडाच्या स्पर्धेत अनेक नवीन ब्रॅण्ड आले आहेत. पत्र्याच्या डब्यातलं डालडा प्लॅस्टिकच्या पिशवीत मिळायला लागलं. नव्वदीच्या नंतर हेल्थकॉन्शस पिढी मिळवती झाली आणि नव्या मध्यमवर्गीय कुटुंबात डालडाची गरज संपली. कधी न ऐकलेल्या तेलबियांचं तेल घरात आलं. डालडाने पण डालडा ॲक्टिव्ह या नावाखाली पुन्हा एकदा स्वैंपाकघर काबीज करण्याचा प्रयत्न केला, पण तोपर्यंत नव्या सुनांनी आणि नव्या तेलांनी जम बसवला होता. या नव्या तेलाची जाहिरात करणाऱ्या कमनीय बाया कदाचित लिव्हर कंपनीला मिळाल्या नसतील. काही वर्षांपूर्वी लिव्हरनी डालडा ब्रॅण्ड विकून टाकला.

पामच्या झाडाचं चित्र असलेला डालडाचा पिवळा डबा हे कधीच न विसरता येणारे मार्केटिंग आयकॉन आहे आणि डालडाच्या रिकाम्या डब्यात रुजलेले तुळशीच्या रोपट्याचे चित्र म्हणजे आपल्या सामाजिक राहणीमानाच्या स्थित्यंतरात कसाबसा जीव धरून राहिलेल्या संस्कृतीचं आयकॉन आहे.

■ ■ ■

# शिक्षण कसे हवे?

वैधानिक दृष्टीने चारित्र्यनिर्मितीचे शिक्षण, त्यातून जीवननिर्मिती व मानवनिर्मिती, अन् त्यानुसारच विचारांची एकरूपता या पाच गोष्टींचे आजच्या विद्यार्थ्यांना शिक्षण मिळाल्यास अन् त्यांचे पालन विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी व पालकांनी केल्यास माणूस आदर्श होवु शकतो !

हल्लीचे शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांच्या डोक्यात कोंबलेली केवळ माहिती आहे, असे म्हणावयास हरकत नाही. आणि ही डोक्यात शिरलेली माहिती न पचल्यामुळे काहींच्या बाबतीत तर आपल्याला त्यांच्या सर्व जीवनभर गोंधळ उडत असलेला दिसून येतो.

असे होवु नये, असे आपल्याला वाटत असेल तर,जीवननिर्मिती, मानवनिर्मिती आणि चारित्र्यांची निर्मिती करणारे आणि त्यानुसार विचार एकजीव करणारे शिक्षण हवे आहे. विद्यार्थ्यांनी केवळ हे पाच विचार पचवले आणि आपल्या जीवनात त्यांचे पालन केले, तर तुम्ही ईतर कुठल्याही व्यक्ती पेक्षा जास्त शिक्षित असाल. यात शंका नाही. हेच शिक्षण हे आजच्या विद्यार्थ्यांच्या व पुढे राष्ट्राच्या आदर्शांना धरून असेल यातही तीळमात्र शंका नाहीत.

बरेच शिक्षकांच्या म्हणण्यानुसार, आजचा तरुण विद्यार्थी हा विनाशकारी होत चालला आहे. त्याला त्या दुष्प्रवृत्तीपासून परावृत्त करण्याकरता जगभरातील शिक्षणतज्ञांनी मूल्यशिक्षणावर (value education) अधिष्ठीत अभ्यासक्रम सुरू व्हावा असे सांगितले आहे.

त्यांच्यानुसार मूल्यशिक्षणामुळे विद्यार्थ्यांमधील आसुरी प्रवृत्तींचा नाश होऊन तो आदर्श नागरिक होईल, असा या शिक्षण शास्त्रज्ञांचा दावा आहे.

या दृष्टीने विचार केल्यास, भारतात जे जे क्रांतीकारक झाले, जे संत झाले, जे देशभक्त स्वातंत्र्यासाठी लढले आणि त्यासाठी हुतात्मा झाले, जे शास्त्रज्ञ झाले, जे समाजाच्या उन्नतीसाठीच जगले, ज्यांनी समाजाच्या उत्थानासाठी संघटना निर्माण करण्यास आपले जीवन वाहिले, त्या सर्वांचे पूर्ण चरित्र हे तरुण पिढीला, लहान मुलांना अभ्यासासाठी ठेवले पाहिजेत. यांच्या कथा तरुणांसमोर आल्या पाहिजेत. तरच भावी पिढीला भविष्याचे जीवन आदर्श मिळू शकेल.

आपले जीवन हे शुद्ध आचरणाचे, प्रामाणिक, पारदर्शी तसेच कष्ट आणि मेहनत करणारे अन् देशभक्तीपूर्ण असावे.त्यामुळे देशासाठी जगणे आणि मरणे, याची प्रेरणा मिळेल, असेच शिक्षण हवे, तरच देश वैभवशाली होईल.

त्यासाठीच आपल्याला चारित्र्यसंपन्न तरुण पिढी निर्माण करणे गरजेचे आहे.आणि त्यासाठी सत्य, प्रामाणिकपणा असलेले शिक्षण हवेत. आज देशातील आतंकवाद, भ्रष्टाचार, महागाई, लोकसंख्या विस्फोट, बेरोजगारी, पर्यावरण, पाणीटंचाई सारखे प्रश्न उद्या अराजक निर्माण करतील. त्याला चारित्र्य निर्माण करणारे शिक्षण हेच उत्तर आहे.

**उच्चशिक्षित असण्यापेक्षा सुसंस्कारांचे शिक्षण महत्त्वाचे**

सध्याची मुले आणि तरुण यांना हॅरी पॉटर वाचून संस्कारीत पिढी निर्माण होणार असे आपल्याला वाटत असेल तर कुठेतरी आपणच चुकीच्या विचार पद्धतीला घेवून पुढे जात तर नाही ना! हा प्रश्न प्रत्येकानी स्वतःला विचारण्यासारखा आहे. आणि त्या मिळालेल्या उत्तरातच जीवन आदर्श शोधण्यासारखे सुद्धा आहे.



प्रफुल्ल क. दाते

■ ■ ■

## नाथ संप्रदायाचे आद्यनाथः श्री मच्छिंद्रनाथ

नाथ संप्रदाय हा भारतातला शैव संप्रदाय आहे. नाथ संप्रदायांचा काळ हा दहाव्या ते बाराव्या शतकाच्या आसपासचा आहे .बरेच संशोधक हा काळ वेगवेगळा समजतात. नाथ शब्दाचा अर्थ रक्षण करता किंवा स्वामी असा होतो. आदिनाथ म्हणजे शिव, महादेवापासून याचा उगम झाला म्हणून त्याला नाथ संप्रदाय नाव मिळाले.

या नाथ संप्रदायाची व्याप्ती संपूर्ण भारतभर आहे. नवनारायणांनी नवनाथांच्या रूपात अवतार घेतला. कवी नारायण यांनी माशाच्या ( मच्छी) पोटी जन्म घेतला. त्यामुळे धमार्चा उदय होईल ,लोक न्यायाने आणि सत्याने राहतील यासाठी हा अवतार होता. नाथ संप्रदायाची स्थापना मच्छिंद्रनाथांनी केली आणि गोरक्षनाथांनी ती पुढे वाढवत नेली.. नवनाथांची दीक्षा घेतलेल्या व्यक्तीला आपल्या नावासमोर नाथ शब्द लावता येतो. नवनाथ म्हणजे, मच्छिंद्र नाथ हे आद्य प्रवर्तक दुसरे गोरक्षनाथ( मच्छिंद्रनाथांचे शिष्य) आणि तिसरे गहिनीनाथ. या गहिनीनाथांमुळे वारकरी संप्रदायाची पताका रोवली गेली. कारण गहिनीनाथ हे निवृत्तीनाथांचे गुरु होते. आणि निवृत्तीनाथ हे ज्ञानेश्वर महाराजांचे गुरु होते. त्यामुळे वारकरी संप्रदायाचे मूळ हे नाथ संप्रदायात आहे.

चौथे जालिंदरनाथ. जालिंदरनाथ हे मच्छिंद्रनाथांचे गुरुबंधू आणि थोर सिद्ध होते. पाचवे कानिफनाथ म्हणजे यांचा जन्म हत्तीच्या कानातून झाला. त्यांनी धमार्चे आणि संस्कृतीचे रक्षण केले. सहावे आहे भर्तरी नाथ. सातवे रेवणनाथ. रेवा नदीच्या काठी बाळ रूपात मिळाले. आठवे नागनाथ यांना अग्निहोत्र नारायणाचा अवतार म्हटले गेले. नववे आहे चर्पटीनाथ. हे गोरक्षनाथांचे शिष्य होते.

हा नाथ संप्रदाय श्री दत्त संप्रदाय म्हणून ओळखला जातो. दत्तगुरूंनी श्री मच्छिंद्रनाथांचे गुरूपद स्वीकारले आणि त्यांना उपदेश केला. त्यानंतर मच्छिंद्रनाथांनी भारतभर भ्रमण करून नवनाथ एकत्र आले आणि त्यांनी शिष्य परंपरा पुढे चालू ठेवली आणि जगात लोकांचे कल्याण केले. मच्छिंद्रनाथ तीर्थक्षेत्रासाठी निघाले. तीर्थक्षेत्राच्या भ्रमंतीवर निघाले असताना वणी येथील सप्तशृंगी गडावर पोहोचले व आई सप्तशृंगीला पाहून नतमस्तक झाले आणि तिच्या आज्ञेने आणि आशीर्वादाने याच ठिकाणी त्यांनी शाबरी विद्येचे कवित्व केले. त्यासाठी सात दिवसांचे अनुष्ठान केले. मच्छिंद्रनाथांच्या शाबरी विद्येची शक्ती एवढी होती की साक्षात हनुमंताला सुद्धा युद्धात हार मानावी लागली होती.

मच्छिंद्रनाथांनी भारतभर धर्माचा प्रसार- प्रचार केला. शिष्य परंपरा वाढवली. ते देवीचे उपासक होते .ज्या कायासाठी मच्छिंद्रनाथांनी अवतार घेतला, ते कार्य संपूवन त्यांनी मायंबा येथे संजीवन समाधी घेतली. चैत्र कृष्ण पंचमी ही मच्छिंद्रनाथांची पुण्यतिथी आहे. त्यांच्या चरणी नतमस्तक होऊया.

■ सौ. माधवी पत्की, नागपूर.

**वाचक लिहितात**

## यापलिकडे राजकारण नाही का?

देश आणि राज्यातले राजकारण कोणत्या स्तराला जात आहे? युवा पिढीला हे राजकारणी कोणता संदेश देवू इच्छित आहेत? हे समजायला मार्ग नाही. टीव्हीवर बातम्यांचे चॅनल सुरू करा, एकदुसऱ्यांवर नेत्यांनी घेतलेले तोंडसुख तेवढे दिसते. डिबेट पहा, एकमेकांचे कपडे फाडण्यात पुढाऱ्यांना आनंद येतो. वर्तमानपत्र उघडले की याचे त्याला शिव्याशाप आणि त्याच्याकडून याचा उद्धार, एवढेच काय ते वाचायला मिळते.

उद्धव ठाकरे यांची शिवसेना दुभंगल्यापासून स्वतः उद्धव ठाकरे, संजय राऊत, आदित्य ठाकरे सत्ताधाऱ्यांवर तूटून पडताहेत. दुसरीकडे, एकनाथ शिंदे स्वतः आणि त्यांच्या गटाचे नेते तसेच भाजपाचे पुढारी उद्धव ठाकरे गटाचे कपडे उतरवण्यात धन्यता मानतात. त्यांनी हिंदुत्व सोडले, त्यांचे हिंदुत्व बेगडी... इतकेच काय ते तुणतुणे वाजवले जाते. प्रश्न हा पडतो की, केवळ हिंदुत्व हाच या देशासमोरचा सर्वात मोठा प्रश्न आहे का? देशात आणि राज्यात इतर दुसऱ्या कोणत्याच समस्या उरल्या नाहीत का? बेरोजगारी, शेतकरी आत्महत्या, नवे प्रकल्प उभे न राहणे, गरीब आणि निराधारांचे प्रश्न बासनात गुंडाळून केवळ एकदुसऱ्यावर चिखलफेक करणाऱ्या या सर्वपक्षीय नेत्यांची कीव येते.

■ विशाल सोनकांबळे, नागपूर.

## उष्माघातापासून बचावासाठी करा घरगुती उपाय

उन्हाळ्याला सुरूवात झाली आहे. उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये कडक उन्हामुळे अनेकांना उष्मघाताच्या समस्या होतात. उष्मघातामुळे अनेक लोकांना खूप त्रास होतो. उन्हाळा सुरू होताच तुम्हाला अनेक प्रकारच्या समस्या होतात.

वातावरणातील उष्णतेमुळे, शक्तपणा जाणवतो किंवा उन्हामुळे शरीर डिहायड्रेट होते आणि कधीकधी असे होते की एखाद्याला रुग्णालयात दाखल करावे लागते. अशा परिस्थितीत, काही गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत.



उन्हाळ्यात तुमच्या आहाराकडे विशेष लक्ष देणे गरजेचे असते. आहार तज्ञांच्या नुसार, उन्हाळा सुरू होताच दिवसभरात ४-५ लिटर पाणी पिणे आरोग्यासाठी फायदेशीर ठरते. तुमच्या शरीराला हायड्रेटेड ठेवण्यासाठी जास्तीत जास्त फळांचा आहारात समावेश करा.

**सूर्यकिरणे थेट डोक्यावर पडली तरच स्ट्रोकचा धोका**

उष्माघातापासून बचाव करण्यासाठी सर्वप्रथम, जेव्हा तुम्ही कुठेही बाहेर जाल तेव्हा तुमचे डोके झाकून घ्या. दुपारच्या सूर्यप्रकाशाचे तीव्र सूर्यकिरणे थेट डोक्यावर पडली तरच स्ट्रोकचा धोका खूप जास्त असतो.

दुपारी सॅलड आणि डाळी यासारख्या गोष्टी जास्त खा. या ऋतूत पपई आणि टरबूज सर्वात फायदेशीर असतात. दररोज कच्चा कांदा खा आणि दर तासाला किमान एक ग्लास पाणी प्यायला विसरू नका.

भाज्यांमध्ये, भोपळा किंवा हिरव्या पालेभाज्या सारख्या भाज्या खाण्याचा प्रयत्न करा. कारण त्यात ९०% पाणी असते. जास्त धान्य खाऊ नका. सॅलडने पोट भरण्याचा प्रयत्न करा. भोपळा आणि पालकाचा रस तसेच सत्तू पिऊ शकता. सफरचंदाचा रस घेवू शकता.

उन्हाळ्यात बाहेर जाता तेव्हा तुमचे डोके झाकून ठेवा. जर गाडी चालवत असाल तर गाडी चालवताना हेल्मेट घाला, बाहेरून घरी आल्यानंतर लगेच थंड पाणी पिऊ नका. तुमच्या शरीराला खोलीच्या तापमानावर थोडा आराम द्या. त्यानंतरच पाणी प्या. जर तुम्ही या गोष्टी लक्षात ठेवल्या तर तुम्ही उष्माघातापासून नक्कीच सुरक्षित राहाल. त्यासोबतच प्रत्येक अर्ध्या तासाने पाणी प्यावे.

■ ■ ■

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### रोड रुंदीकरण समस्या

वाढती लोकसंख्या व
वाहनांचे वाढते प्रमाण
प्रशस्त रोड असावेत
ही काळाची गरज जाण ..

कराल आज दुर्लक्ष
तर भोगाल त्याची फळे
अपघात होतील असंख्य
क्रासिंगला येतील अडथळे ..

रोज - रोटी कुणाचीही
शासनाने घेऊ नये हिरावून
भाडेपट्टयाने पर्यायी जागा
द्यावी उपलब्ध करून .. !

## एचडीएफसी बँक परिवर्तनच्या ग्रामीण विकास उपक्रमांतर्गत
# २९८ सीमावर्ती गावांना सामावून घेण्यात आले

**मुंबई, १७एप्रिल :** एचडीएफसी बँक या भारतातील सर्वात मोठ्या खाजगी क्षेत्रातील बँकेने आपल्या सीएसआर शाखा परिवर्तन अंतर्गत ग्रामीण विकास उपक्रमांतर्गत देशभरातील २९८ सीमावर्ती गावांना सामावून घेतले आहे. हे गावांचे समूह आसाम, अरुणाचल प्रदेश, बिहार, गुजरात, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मीर, लडाख, राजस्थान, सिक्कीम, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड या राज्यांच्या सीमावर्ती भागात वसलेली आहेत. येत्या काही वर्षांत अशा आणखी १५० सीमावर्ती गावांपर्यंत आपली पोहोच वाढविण्याची बँकेची योजना आहे. हे उपक्रम सीमा क्षेत्र विकास कार्यक्रम आणि व्हायब्रंट व्हिलेजिस प्रोग्राममध्ये नमूद केलेल्या राष्ट्रीय विकास ध्येयांशी सुसंगत आहेत.



हिमालयाच्या उत्तर आणि ईशान्य दिशेकडील आणि देशाच्या पश्चिमेस वाळवंटी प्रांतांच्या सीमेवर वसलेल्या गावांना बऱ्याचदा खडतर भूभाग, आवश्यक सेवांपर्यंत मर्यादित पोहोच आणि त्यांच्या दुर्गम जागांमुळे आर्थिक असुरक्षितता यांसारख्या समस्यांना तोंड द्यावे लागते. या प्रदेशात गरजेनुसार कार्य करून परिवर्तनने येथील सुमारे पाच लाख लोकांच्या जीवनावर सकारात्मक परिणाम केला आहे.

या क्षेत्रात बँकेने दोन मुख्य प्रकारचे प्रकल्प लागू केले आहेत:

१) सर्वांगीण ग्रामीण विकास कार्यक्रम : याच्या अंतर्गत ३६-४८ महिन्यांच्या कालावधीत १५-२० जवळपासच्या गावांच्या समूहावर लक्ष केंद्रित करण्यात येते. यात ग्रामीण विकास, शिक्षण, कौशल्य विकास, आर्थिक समावेशकता, आरोग्य आणि स्वच्छता आणि नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन सारख्या विविध पैलूंचा समावेश आहे.

२) फोकस्ड डेव्हलपमेंट प्रोग्राम : हा उपक्रम हस्तक्षेपाच्या विशिष्ट क्षेत्रांना लक्ष्य बनवतो, ज्यामुळे एका क्षेत्रात सकेंद्रित परिणाम दिसतो.

एचडीएफसी बँकेचा परिवर्तन उपक्रम विविध सीमावर्ती प्रदेशात राहणाऱ्या ग्रामीण समुदायांना सक्षम बनविण्याबाबत वचनबद्ध आहे, जसे की- अरुणाचल प्रदेशातील लोअर दिबांग व्हॅली आणि शी योमी; आसाममधील बक्सा आणि उदलगुडी; बिहारमधील किशनगंज, पश्चिम चंपारण आणि मधुबनी; गुजरातमधील बनासकांठा, कच्छ आणि पाटण; लडाख; मणिपूरमधील चंदेल; मेघालयातील ईस्ट जयंतिया हिल्स; पंजाबातील फाझिलका आणि पठाणकोट; राजस्थानातील बाडमेर; सिक्कीममधील ग्यालशिंग वेस्ट आणि पेक्योंग; उत्तर प्रदेशातील पिलिभीत; आणि उत्तराखंडमधील चमोली.

प्रस्तुत उपक्रमाविषयी बोलताना एचडीएफसी बँकेचे डीएमडी कैझाद भरूचा म्हणाले, टेक्नॉलॉजी-सक्षम शिक्षण, सुधारित कृषी उत्पादकता, अक्षय ऊर्जा आणि आजीविकेच्या संधींपर्यंत पोहोच प्रदान करून आम्ही भारताच्या सीमावर्ती गावांमध्ये अर्थपूर्ण प्रभाव निर्माण करण्याबाबत वचनबद्ध आहोत. राष्ट्रीय विकास लक्ष्यांशी सुसंगत राहून आम्ही स्थानिक समुदाय, स्वयंसेवी संस्था आणि सरकारी संस्थांशी भागीदारी करतो आणि असे समर्थ, आत्मनिर्भर आणि ऊर्जावान समुदाय घडवतो, जे देशाच्या आर्थिक आणि सामाजिक जडणघडणीत योगदान देतात.

एचडीएफसी बँकेचे कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटीचे प्रमुख नुसरत पठाण म्हणाले, ग्रामिक विकासाप्रती एक सर्वंकष दृष्टिकोन असणे हे केवळ इष्ट नाही, तर त्याची आत्यंतिक गरज आहे, विशेषतः सीमावर्ती भागांमध्ये. आम्ही याची खातरजमा करतो की, एका क्षेत्रातील प्रगती इतर क्षेत्रांमधील सकारात्मक परिणामांना मजबूती देईल आणि ते परिणाम वाढवेल आणि त्यायोगे आमच्या कार्याचा प्रभाव जास्तत जास्त दिसेल.

# आयडीएफसी फर्स्ट बँक बोर्डाने ७,५०० कोटी रुपयांच्या निधी संकलनाला मान्यता दिली

**मुंबई, १७ एप्रिल :** आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या संचालक मंडळाने आज झालेल्या बैठकीत जागतिक वाढीच्या गुंतवणूकदार वॉरबर्ग पिंकस एलएलसीची संलग्न कंपनी करंट सी इन्व्हेस्टमेंट्स बी.व्ही. ला अंदाजे रु.४,८७६ कोटी रुपयांच्या इक्विटी कॅपिटल (सीसीपीएस) आणि अबू धाबी इन्व्हेस्टमेंट अथॉरिटी (एडीआयए) ची पूर्ण मालकीची उपकंपनी असलेल्या प्लॅटिनम इन्व्हिक्टस बी २०२५ आरएससी लिमिटेडला अंदाजे रु.२,६२४ कोटी रुपयांच्या इक्विटी कॅपिटल (सीसीपीएस) ला मान्यता दिली. प्रस्तावित इश्यूज शेअरहोल्डर आणि नियामक मंजुरींच्या अधीन आहेत.

गेल्या सहा वर्षांत, आयडीएफसी फर्स्ट बँकेने पायाभूत सुविधांवर लक्ष केंद्रित केलेल्या डीएफआयच्या वारशापासून ते आधुनिक, तंत्रज्ञानावर आधारित, संपूर्ण भारतातील, सार्वत्रिक बँक बनण्यात यशस्वी परिवर्तन घडवून आणले आहे. या प्रक्रियेत, त्यांनी भारतातील एक आघाडीची खाजगी क्षेत्रातील बँक बनण्यासाठी वितरण, तंत्रज्ञान आणि प्रतिभेमध्ये लक्षणीय गुंतवणूक केली आहे. या काळात, ठेवींमध्ये ६ पट वाढ झाली, कर्जे आणि कर्जे दुप्पट झाली आणि कॅसा गुणोत्तर ८.७% वरून ४७.७% पर्यंत लक्षणीयरीत्या सुधारले आहे. आर्थिक वर्ष १९ मध्ये १,९४४ कोटी रुपयांचा तोटा होता, तो आर्थिक वर्ष २४ मध्ये २,९५७ कोटी रुपयांच्या नफ्यात पोहोचला. तथापि, मायक्रोफायनान्समधील उद्योगव्यापी आव्हानांमुळे आर्थिक वर्ष २५ च्या ९ महिन्यांत नफा कमी झाला, ज्याचा बँकेने चांगला सामना केला आहे. या निधी उभारणीसह, एकूण भांडवली पर्याप्तता १६.१% वरून १८.९% पर्यंत वाढेल (३१ डिसेंबर २०२४ रोजी बँकेच्या भांडवली स्थितीवर मोजले जाणारे सीईटी-१ गुणोत्तर १६.५%), बँकेचा ताळेबंद मजबूत करेल आणि मजबूत आणि स्वयंपूर्ण नफा वाढीसाठी ती स्थानबद्ध करेल.

आयडीएफसी फर्स्ट बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ व्ही. वैद्यनाथन म्हणाले, पहिल्या दिवसापासूनच, आम्ही भारतात जागतिक दर्जाची बँक उभारण्याच्या दीर्घकालीन दृष्टिकोनासह बँकेचा पाया रचला आहे. आम्ही ग्राहकांसाठी सहानुभूतीची संस्कृती निर्माण करत आहोत आणि उच्च दर्जाची ग्राहक सेवा देण्याचा प्रयत्न करत आहोत. आम्ही तांत्रिकदृष्ट्या प्रगत आहोत आणि अत्याधुनिक सेवा देत राहतो.

बँकेने नफ्यात पाऊल ठेवले आहे आणि आता ती एका महत्त्वाच्या टप्प्यावर आहे, जिथे आमची उत्पन्न वाढ ओपेक्स वाढीपेक्षा सातत्याने जास्त राहण्याची अपेक्षा आहे, ज्यामुळे ऑपरेटिंग लीव्हरेजमध्ये सुधारणा होईल. गुंतवणुकीच्या टप्प्यात असलेले अनेक व्यवसाय मोठ्या प्रमाणात नफा कमावतील अशी आम्हाला अपेक्षा आहे.

वॉरबर्ग पिंकस परत येणे आणि एडीआयए च्या पूर्ण मालकीच्या उपकंपनीचे आमचे भागधारक म्हणून स्वागत करणे खूप छान आहे. आमच्यावर आणि आमच्या भविष्यातील विकास योजनांवर विश्वास ठेवल्याबद्दल आणि अस्थिर जागतिक परिस्थितीतही आमच्यात गुंतवणूक केल्याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतो. ग्राहकांना आवडणारी आणि मजबूत युनिट इकॉनॉमिक्सद्वारे समर्थित एक मजबूत, आदरणीय फ्रँचायझी तयार करूनच आम्ही आमच्या भागधारकांना शाश्वत दीर्घकालीन परतावा देऊ असा आमचा विश्वास आहे.

विशाल महादेविया, व्यवस्थापकीय संचालक, प्रमुख आशिया प्रायव्हेट इक्विटी आणि जागतिक सह-प्रमुख वित्तीय सेवा, वॉरबर्ग पिंकस म्हणाले, आम्हाला विश्वास आहे की भारतीय बँकिंग क्षेत्र एक रोमांचक संधी सादर करते आणि दीर्घकालीन वाढीसाठी सज्ज आहे. वॉरबर्ग पिंकसमध्ये, अपवादात्मक संघांसोबत भागीदारी करण्याचा आमचा दीर्घ इतिहास आहे. आम्ही आयडीएफसी फर्स्ट बँक टीमला त्यांच्या सुरुवातीच्या काळापासून एक दशकाहून अधिक काळ ओळखतो आणि बँकेची उभारणी जवळून पाहिली आहे. वाढीच्या पुढील टप्प्यात आणि शाश्वत आरओई सुधारणांमध्ये त्यांना पाठिंबा देण्यासाठी आयडीएफसी फर्स्ट बँक टीममध्ये पुन्हा गुंतवणूक करण्यास आम्हाला उत्सुकता आहे.

एडीआयएच्या प्रायव्हेट इक्विटीज विभागाचे कार्यकारी संचालक हमद शाहवान अल धाहेरी म्हणाले, आयडीएफसी फर्स्ट बँकेने भारतातील आघाडीच्या खाजगी क्षेत्रातील बँकांपैकी एक म्हणून स्वतःला दृढपणे स्थापित केले आहे, ज्याला अनुभवी व्यवस्थापन पथकाचे पाठबळ आहे. गेल्या काही वर्षांत त्यांनी त्यांचे तंत्रज्ञान आणि शाखा पायाभूत सुविधांचा विस्तार केला आहे आणि भविष्यासाठी ते चांगल्या स्थितीत आहे. ही गुंतवणूक बँकेच्या सतत वाढीला पाठिंबा देण्यासाठी आहे, ज्यामुळे देशातील वित्तीय उत्पादनांची वाढती मागणी पूर्ण करता येईल.

## सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाच्या संकेतस्थळाचे गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्या हस्ते उद्घाटन!

**पणजी (गोवा), १७ एप्रिल :** सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांचा ८३ वा जन्मोत्सव आणि सनातन संस्थेचे रौप्य महोत्सवी वर्ष या निमित्ताने फर्मागुडी, फोंडा, गोवा येथे १७ ते १९ मे २०२५ या कालावधीत सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाच्या SanatanRashtraShankhnad.in या इंग्रजी भाषेतील संकेतस्थळाचे उद्घाटन गोवा राज्याचे मुख्यमंत्री श्री. प्रमोद सावंत यांच्या हस्ते पर्वरी, गोवा येथील मुख्यमंत्री कार्यालयात करण्यात आले.



या वेळी मुख्यमंत्र्यांनी संकेतस्थळाचे अवलोकन केले, तसेच कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी या सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाच्या स्वागत समितीतील पू. पृथ्वीराज हजारे, सनातन संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. चेतन राजहंस, हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. रमेश शिंदे, तसेच श्री. नारायण नाडकर्णी, श्री. मधुसूदन कुलकर्णी आणि अधिवक्ता राजेश गावकर असे उपस्थित होते.

या संकेतस्थळावर सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाविषयी माहिती उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सध्या सनातन राष्ट्राचा उद्देश; सनातन राष्ट्राचा शंखनाद करताना भगवान श्रीकृष्णाचे बोधचिन्ह; सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांचा परिचय; सनातन संस्थेची माहिती; कार्यक्रमाला उपस्थित रहाणारे संत, महंत, विविध राज्यांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, प्रतिष्ठित व्यक्ती यांची माहिती; सांस्कृतिक कार्यक्रम; लोककला आदींची चित्रे प्रातिनिधिक चित्रे ठेवण्यात आली आहेत. पुढे कार्यक्रमाच्या दृष्टीने वेळोवेळी अधिकची माहिती या संकेस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच सनातन संस्थेच्या वतीने या महोत्सवासाठी धर्मदान करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## वीर हनुमान: एका आईच्या प्रेमाची कसोटी, मारुतीसाठी अंजनीचे बलिदान!

**मुंबई, १७ एप्रिल :** सोनी सबवरील वीर हनुमान मालिकेत छोट्या कुतुहलाने भरलेल्या आणि व्रात्य मारूतीचे एका बलशाली, दिव्य योद्ध्यात रूपांतर होण्याची कहाणी उलगडत आहे. पुराणकथा, ॲक्शन आणि भावना यांचा सुंदर गोफ विणत ही मालिका भारताच्या अत्यंत प्राचीन कथेला आकर्षक स्वरूपात प्रस्तुत करते. सर्वांनाच आकर्षित करणाऱ्या या मालिकेत आन तिवारी बाल मारुतीची भूमिका करत आहे, सायली साळुंखे अंजनीची, आरव चौधरी केसरीची तर माहिर पांधी वाली आणि सुग्रीव या दोघांची भूमिका करताना दिसत आहे. अलीकडच्या भागांमध्ये प्रेक्षकांनी पाहिले की आपल्या शक्तींवर प्रभुत्व प्राप्त करण्याच्या मारुतीची प्रयत्नांत विघ्न आणण्याचा वालीचा कुटिल कट त्याच्यावरच उलटतो, जेव्हा मारुती करुणा आणि सुजाणता यांचा पक्ष घेऊन हिंसेचा विरोध करतो आणि आपल्या वडिलांना म्हणजे केसरीला कर्तव्यापेक्षा सहानुभूतीला प्राधान्य देण्याची गळ घालतो.



आगामी भागांमध्ये, मारुतीच्या प्रवासाला एक भयानक वळण मिळते कारण वाली कालदंताला मारुतीचे अपहरण करून त्याला पाताळात आणण्याची आज्ञा देतो. कालदंत एक मायावी रूप घेऊन मारुतीला भुलवतो आणि तलातलाच्या अंधाऱ्या राज्यात त्याला अडकवतो. मारुती स्वतःकडे असलेल्या आठ सिद्धींपैकी अणिमा सिद्धीचा उपयोग करून सूक्ष्म रूप धरण करतो आणि कालदंताच्या शरीरात जाऊन त्याला हरवतो. पण, हा विजय त्याला खूप महागात पडतो, कारण तो पुन्हा आपल्या मूळ रूपात येऊ शकत नाही. याचा फायदा घेऊन पातालकलीचे सामर्थ्य लाभलेला कालदंत मारुतीला असा शाप देतो की, त्याच्या आईने, अंजनीने आपल्या जीवनाचे बलिदान दिले, तरच मारुती आपल्या मूळ रूपात येऊ शकेल.

अंजनी आपल्या मुलासाठी हे मोठे बलिदान देईल का की हनुमान आपल्या आईचा जीव वाचवण्यासाठी सदैव सूक्ष्म रूपात राहणे पसंत करेल?

अंजनीची भूमिका करणारी सायली साळुंखे म्हणते, मला वाटते, एक अभिनेत्री म्हणून प्रत्येक भूमिका मला पटकथेच्या पलीकडे जाऊन काही तरी शिकवते. वीर हनुमान मालिकेत अंजनीची भूमिका करण्याचा अनुभव तर विशेषच आहे. एक माता म्हणून अंजनीचे प्रेम आणि तिचा त्याग आपल्याला हेलावून सोडतो. मी जेव्हा हे दृश्य केले की, जेव्हा अंजनीला हे समजते की तिने स्वतःच्या जीवाचे बलिदान दिले तरच हनुमानाला त्याचे मूळ रूप परत मिळेल, तेव्हा ते माझ्या अंतःकरणाला भिडले. मला माझ्या आईची प्रकर्षाने आठवण झाली आणि हे आठवले की माझ्या सगळ्या सुख-दुःखात ती कशी माझ्या पाठीशी निःस्वार्थपणे उभी राहिली आहे. त्या व्यक्तिगत आठवणीमुळे त्या दृश्यातील भावना फारच अस्सल स्वरूपात व्यक्त झाल्या आहेत. अंजनी आणि मारुती यांच्यातील नाते इतके निर्मळ आहे! आणि मला ते पडद्यावर साकारण्याची संधी मिळाल्याबद्दल माझ्या मनात कृतज्ञता आहे. आम्ही ज्या भावना, जे प्रेम व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे, त्या भावना प्रेक्षकांच्या हृदयाला देखील भिडतील असे वाटते.

## अखिल भारतीय मारवाडी महिला परिषद नागपूर शाखेने वर्धमान नगर चौकात चप्पल आणि टॉवेल वाटप



**नागपूर, १७एप्रिल :** यावर्षीही, अखिल भारतीय मारवाडी महिला संमेलन नागपूर शाखेने नागपूरच्या कडक उन्हापासून ये-जा करणाऱ्यांना दिलासा देण्यासाठी वर्धमान नगर चौकात चप्पल आणि टॉवेलचे वाटप केले. येणाऱ्या-जाणाऱ्यांना ताक, फळे, टरबूज, काकडी इत्यादींचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून माजी नगरसेविका आणि ललिता पब्लिक स्कूलच्या संचालिका चेतना जी टांक उपस्थित होत्या. संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती किरण सराफ आणि सचिव श्रीमती रजनी अग्रवाल यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. दरवर्षी उन्हाळ्यात वर्धमान नगर चौकातील पिण्याच्या पाण्याच्या स्टॉलवर कडक उन्हापासून आराम मिळावा म्हणून संस्थेकडून हा प्रकल्प हाती घेतला जातो.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्षा सौ.किरण सराफ, सचिव रजनी अग्रवाल, उपाध्यक्ष माया शर्मा, सुषमा अग्रवाल, पुष्पा अग्रवाल, उमा गोयल, निशा बाजोरिया, स्वाती अग्रवाल, निर्मला गोयंका, शीतल गोयल, सुनैना शर्मा, शीतल अग्रवाल, रचना अग्रवाल, जयश्री वैरागी, जयश्री वैशाख आदी उपस्थित होते.

## आनंद इंगळे आणि श्वेता पेंडसे 'या' नाटकातून रंगभूमीवर पहिल्यांदाच येणार एकत्र

**मुंबई, १७ एप्रिल :** मराठी रंगभूमीला गौरवशाली परंपरा लाभली आहे. अनेक प्रतिभावान नाटककारांनी, लेखक -दिग्दर्शकांनी आपल्या वैविध्यपूर्ण नाट्यकृतींनी प्रेक्षकांची मने जिंकत रंगभूमीचा एक काळ गाजवला. तेव्हाची अनेक नाटकं आज इतक्या वर्षानंतरही नाट्य रसिकांच्या आणि निर्माता- दिग्दर्शकांच्या मनावर गारुड करून आहेत. यातील काही नाटकांना पुनरुजीवीत करण्याचे धाडस आजचे काही निर्माते करताना दिसताहेत. जुने ते सोने या उक्तीप्रमाणे काही जुन्या नाटकांचे पुनरुज्जीवन करून ती नव्या संचात सादर केली जात आहेत. अशा या क्लासिक नाटकांच्या निमित्ताने प्रेक्षकवर्ग पुन्हा मराठी नाटकांकडे वळू लागला आहे. या यादीत शेखर ढवळीकर लिखित आणि विजय केंकरे दिग्दर्शित नकळत सारे घडले या नाटकाचा समावेश झाला आहे. प्रत्येक पिढीचं एक मत असतं, एक दृष्टिकोन असतो. कोण बरोबर? कोण चूक? पिढ्यांमधल्या वाढलेल्या अंतराचा हा तिढा सोडवायचा तरी कसा? यावर भाष्य करत नकळत सारे घडले मनोरंजक नाट्य आपल्या प्रत्येकालाच स्वतःकडे - विविध नाते संबंधांकडे आणि एकूणच आपल्या मूल्यव्यवस्थेकडे पहायची एक निराळी दृष्टी देते.

## आज का अंदाज

शुक्रवार १८ एप्रिल २०२५

### पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ३ | ६ | ९ | २ | ५ | ६ | ७ |
| ११० | १४८ | १५० | १३५ | १२९ | २३० | २४० | १२४ |
| २२८ | ३४६ | २६८ | ३६० | २४६ | ३५७ | ३६७ | २७८ |
| ३३६ | ६७० | ३३० | ५६८ | ५८९ | ४५६ | ४४८ | ३७७ |
| २५ | ३५ | ६१ | ९१ | २३ | ५३ | ६१ | ७१ |
| २७ | ३७ | ६० | ९४ | २० | ५० | ६४ | ७४ |
| २८ | ३८ | ६४ | ९० | २६ | ५६ | ६९ | ७९ |

**१८ एप्रिल : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| १० | ४० | ७९ | ८९ |
| १२ | ४२ | ७३ | ८३ |
| १६ | ४६ | ७५ | ८५ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## दीपिका कक्कडनं पहिल्या लग्नातून झालेल्या मुलीला सोडलं? नवरा शोएबनं सांगितलं सत्य

**मुंबई, १७ एप्रिल :** छोट्या पडद्यावरील अभिनेता शोएब इब्राहिम आणि त्याची पत्नी दीपिका कक्कड हे नेहमीच चर्चेत असतात. त्यांचे व्लॉग्स हे चांगलेच चर्चेत राहतात. या व्लॉगमध्ये ते त्यांचं आयुष्य आणि काय काय करतात ते दाखवताना दिसतात. तर नुकताच त्यांनी एक व्लॉग शेअर केला असून त्यात त्यांनी चाहत्यांना किंवा त्यांच्यावर प्रश्न उपस्थित करणाऱ्या लोकांना सडेतोड उत्तर दिली आहेत. त्यावेळी अनेकांनी म्हटलं की दीपिकानं आधीच्या लग्नातून झालेल्या मुलीला सोडलं होतं. अशा अनेक रिपोर्ट आल्या आहेत ज्यात दावा करण्यात आला आहे की तिनं कधीच तिच्या पहिला बाळाविषयी काही चर्चा केली नाही. मात्र, दोघांनी या सगळ्या अफवा असल्याचं म्हटलं आणि दीपिकाची कोणतीही मुलगी नाही असं सांगितलं.

दरम्यान, सततच्या चाहत्यांच्या प्रश्नांमध्ये शोएब इब्राहिमनं एका अशा प्रश्नाचा उल्लेख केला जो त्यांना गेल्या अनेक वर्षांपासून सतवत आहे. त्यांनी सांगितलं की कधी-कधी यामुळे खूप चिडचिड होते. कोणी असं कसं सांगू शकतं? त्यानंतर त्यांनी एका चाहत्यानं विचारलेला प्रश्न वाचला, त्यात म्हटलं होतं की दीपिकाला पहिल्या लग्नातून एक मुलगी आहे. तर त्यावर तुम्ही उत्तर का देत नाही आहात?

## राशीभविष्य

**मेष :** आर्थिक व्यवहारात काळजी घ्या. नोकरी मिळवण्याचे प्रयत्न यशस्वी होतील. अनपेक्षित लाभ होऊ शकतो. व्यावसायिक प्रवास यशस्वी होईल. घरात सुख-शांती राहील.

**वृषभ :** आज तुम्हाला एखाद्या नातेवाईकाकडून चांगली बातमी मिळेल. कर क्षेत्रात कनिष्ठ अधिकारी आणि उच्च अधिकाजयांशी जवळीक वाढेल. बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणाजया लोकांना बढती मिळेल.

**मिथुन :** कुटुंबातील शुभ कार्यक्रमात भाग घ्याल. भेटवस्तू मिळतील. धोकादायक कामे टाळा. प्रवास आनंददायी राहील. नोकरीत अधीनस्थांना फायदा होईल. व्यवसायात नवीन करार होतील.

**कर्क :** आज तुम्हाला व्यावसायिक संपर्कांचा फायदा होईल. तुम्हाला कुठेतरी अनपेक्षित लाभ मिळू शकतो. व्यवसायात वाढीसाठी हा काळ योग्य आहे. इतर चांगले साहित्य आणि कपडे मिळण्याची शक्यता आहे.

**सिंह :** घरात लग्नाची बोलणी सुरु होऊ शकतात. तुमच्यासाठी लग्नाचे प्रस्ताव येऊ शकतात. जर विवाहित असाल, तर पार्टनरसोबत बाहेर फिरायला जाण्याचा विचार कराल. अनपेक्षित लाभ होऊ शकतो.

**कन्या :** .स्टार्टअपमध्ये गुंतवणूक केली असेल, तर त्यातून चांगला नफा मिळण्याची शक्यता आहे. ते आशावादी राहतील. मित्रांबरोबरचे संबंध मधुर होतील. शासकीय अडचणी येऊ शकतात. वाद टाळा.

**तुळ :** कला, संगीत आणि माध्यमांमध्ये काम करणाजया व्यक्तींना कोणाचे तरी सहकार्य मिळेल. राजकारणात काम करणाजयांनी जपून काम करण्याची गरज आहे. एखाद्या प्रभावशाली व्यक्तीची मदत मिळेल.

**वृश्चिक :** घरातील एखादा सदस्य तुमच्यासाठी काहीतरी खास बेत आखेल. डोळ्यांना त्रास होऊ शकतो. आरोग्यावर खर्च होईल. कर्ज घ्यावे लागेल. इतरांच्या भांडणात पडू नका. वाद वाढवू नका.


**धनु :** नोकरीसंबंधी कामासाठी विदेशात जाण्याची संधी मिळू शकते. कुटुंबात तुमच्याबद्दल उत्साहाचे वातावरण राहील. कृषी क्षेत्रात प्रगती होईल. मित्र आणि नातेवाईकांची भेट होईल.

**मकर :** प्रेमसंबंधात अनुकूलता राहील. घरात पाहुण्यांचे आगमन होईल. गोड बातमी मिळेल. आत्मविश्वास वाढेल. अपेक्षित कामांना विलंब होईल. कुटुंबातील शुभ कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी मिळेल.

**कुंभ :** समाजात प्रतिमा सुधारेल. त्यांच्याबद्दल आदर वाढेल. कुटुंबातील सदस्यांसोबत बाहेर जाण्याचा विचार करु शकता. त्रास, भीती आणि बेचैनीचे वातावरण निर्माण होऊ शकते.

**मीन :** क्रीडा जगताशी संबंधित लोकांना लक्षणीय यश मिळेल. व्यवसाय ठीक चालेल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. घरात मतभेद संभवतात. व्यवसायात कठोर परिश्रम फायदेशीर ठरतील.

## शब्दकोडे क्रमांक २०८८




**आडवे शब्द:-**
१) शाळेचे प्रमुख
५) सूर्याचे एक नाव
७) रागावलेला
११) सापाने त्यागलेली त्वचा
१२) सुळे
१४) प्रशाला
१५) नंतर
१६) नेता, चित्रपटाचा हिरो
१७) नूतन
१८) चुणीदार पट्टी
१९) जानकीपती
२०) खरकट्याचा ढीग
२३) सूर्य
२५) रजनी
२७) जन्ममृत्यू
३०) सेवक
३२) पंजाब मधील दोन नद्यांची नावे
३४) बारीक झणझण
३६) मृत्यू
३७) व्याज आकारणीतील द.सा.द.शे.
४१) मयूर
४२) निमग्न
४३) यज्ञ
४४) कबूतर
४५) रतिचा पती
४७) उद्याच्या नंतरचा दिवस
४८) अथवा, किंवा
४९) शर्त, परंतु, अट
५०) एक रंगीत कंदमूळ
५१) कोथिंबीरीचे बी
५२) पाणी
५४) झाडाभोवतीचा कट्टा
५५) निर्धन झालेला, दरिद्री
५६) कच्चाच्या विरुद्ध
५८) खांदा, खांद्याचा सांधा
६०) बुद्धीने कमी असलेला
६१) मीठ
६२) उसनवार
६६) निष्णात(गुन्हेगार)
६८) अफवा
६९) एक द्विदल धान्य
७०) झकास
७१) लेखणी
७२) प्रस्थान करणे
७३) वेल
७५) पुरुष
७६) चांदी
७७) गाणे
७८) गुणांची चाहा करणारा

**उभे शब्द:-**
१) ज्याला बोलता येत नाही असा
२) सुप्रसिद्ध
३) घागरा
४) रेशमी धोतर
५) शपथ
६) रविवार
७) कलकत्त्याचे नवीन नाव
८) चरण
९) तालुक्यातील सरकारी महसुलीचे काम बघणारा अधिकारी
१०) मोठे गाव
१३) दृष्टीभेट
१८) स्वयंपाक घरातील एक छिद्राचे साहित्य
१९) वंदनाचा एक शब्द
२१) टप्प्याटप्प्याने केलेला प्रवास
२२) हजार शेराचे वजन
२४) कापड विणून तयार करणारा
२६) बैलाच्या नाकात ओवलेली दोरी
२८) मोठे घर, राजवाडा
२९) विरोध, प्रतिबंध
३१) सवतीबद्दलचा आकस
३३) वीरगती
३५) बटाटा वा साबुदाण्याचा तळलेला रूचकर पदार्थ
३८) उपकरण
३९) एखादा घोटाळा दाबून टाकणे दाबणे
४०) एक प्रकारचा लांब अंगरखा
४४) डोळ्यावरील उघडझापीचा अवयव
४६) किंमत
५०) छ. शिवाजी महाराजांना राज्याभिषेक करणारा ब्राह्मण
५१) हादरा, धडक
५३) पहारेकरी
५४) बसण्याची फळी
५६) अनुमती, मान्यता
५७) गावाची हद्द
५९) हवा, वारा
६२) पिता
६३) नूतन, जुनाच्या विरुद्ध
६४) शिक्षक
६५) दहावी रास
६६) मृत्यू नसलेला
६७) निकट, जवळ
७०) चिंतन
७४) दह्याचे पातळसर पेय

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# अचलपूर परिसरात मध्यप्रदेशातून होताहे मुरुमाची अवैध तस्करी

## ओव्हरलोड ट्रकची जीवघेणी वाहतूक ■ महसूल व पोलिस प्रशासनाचे दुर्लक्ष

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर, (दि. 17) -** नजीकच्या मध्यप्रदेश सिमेतून अचलपूर, चांदुर बाजार तालुक्यात मोठ्या प्रमाणात अवैधरीत्या मुरुमाची तस्करी करण्यात येत आहे. या तस्करांनी अक्षरश: दोन्ही तालुक्यांमध्ये हैदोस घातला आहे. ओव्हरलोड ट्रकमधून राजरोसपणे मुरुमाची जीवघेण्या पद्धतीने वाहतूक सुरु असताना पोलिस आणि महसूल प्रशासनातील अधिकारी आणि कर्मचारी या गंभीर प्रकाराकडे दुर्लक्ष करित असल्याचे दिसून येते.



चांदूर बाजार व अचलपूर तालुक्यालगत मध्यप्रदेश राज्यात येणाऱ्या धापोळा भागात मुरूम खदानी असून तेथून तस्करी करुन ट्रकद्वारे मुरूम अचलपूर, परवाडा, चांदुर बाजार परिसरात आणला जात आहे. मध्य प्रदेशातील बैतुल खनिक्रम विभागाने दिलेल्या रॉयल्टीच्या नावावर परतवाडा, अचलपूर व चांदूरबाजार तालुक्यात पोलीस प्रशासनाच्या डोळ्यासमोर ओवरलोड ट्रकची वाहतूक सुरू आहे. खरपीवरुन वाहतूक करणाऱ्या या वाहनांकडे क्षेत्रीय मंडळ अधिकारी व महसूल प्रशासन कानाडोळा करीत आहे. रॉयल्टी एक तर फेऱ्या अनेक अशा पद्धतीने हे ओव्हरलोड मुरुमाचे ट्रक दिवसभर धावत असतात.

मध्यप्रदेश मधील रॉयल्टी तपासणार कोण याचाच गैरफायदा घेत ऑनलाइन रॉयल्टीच्या नावावर दिवसाढवळ मुरुमाची तस्करी महसूल प्रशासनाच्या नाकावर टिच्चून होत आहे. दुसरीकडे बैतूल जिल्ह्यातील भैसदही उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांचे पथक बेपत्ता असून महाराष्ट्राची सीमा ओलांडून ही वाहने मुरुमाची तस्करी करित असताना धापोळा येथील खदानीची तपासणी करणार कोण, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

### नायब तहसीलदारांची भूमिका संशयास्पद

मध्यप्रदेशातील धापोळा येथील मुरूम वाहतुकीची रॉयल्टी प्राप्त असलेल्या चालक-मालकासोबत संगणमत करून मुरूम तस्कर हा गैरप्रकार खुलेआम करित आहेत. कोणाला न घाबरता ओवरलोड मुरुमाच्या वाहनांची वाहतूक सुरू आहे. या प्रकाराला आळा घालण्यासाठी कोणतेही पाउल न उचलता कानाडोळा करण्याच्या नयाब तहसीलदाराच्या भूमिकेबाबत संशय व्यक्त केला जात आहे.

### अधिकाऱ्यांच्या अंगावर वाहने चढविण्याचा प्रकार

जिल्ह्यात गौन खनिजाची मोठ्या प्रमाणात तस्करी सुरु असून या तस्करांची हिंमत प्रचंड वाढली आहे. ते कोणालाही जुमानत नाहीत. कोण्या अधिकाऱ्याने त्यांना रोखण्याचा व कारवाई करण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्यावर जीवघेणा हल्ला करण्यासही ते मागेपुढे पाहत नाहीत, असे काही घटनांतूत निदर्शनास आले आहे. भातकुलीचे तहसीलदार अजित कुमार येळे यांच्या अंगावर वाळूने भरलेल्या मिनी ट्रक चालकाने अंगावर नेउन त्यांना जिवे मारण्याचा प्रयत्न केला होता. अशा घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या तस्करांवर कठोर कारवाईची गरज असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

# पोटे अभियांत्रिकीत माजी विद्यार्थ्यांचा मेळावा



## जुने मित्र आठवणींत रमले

## प्रविण पोटे यांनी केले मार्गदर्शन



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 17) -** पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन महाविद्यालयातील माजी विद्यार्थ्यांचा मेळावा स्वामी विवेकानंद ऑडिटोरिअम येथे नुकताच आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात कामानिमित्त देशभर विखुरेलेले महाविद्यालयाचे असंख्य माजी विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यांनी या मेळाव्याच्या निमित्ताने आपल्या महाविद्यालयीन जीवनातील जून्हा आठवणींना उजाळा दिला.

महाविद्यालयाचे असंख्य विद्यार्थी विदेशात तसेच देशात दिल्ली, पुणे, मुंबई, बंगलोर, हैद्राबाद, नागपूर येथे विविध नामवंत कंपन्यांमध्ये उच्च पदावर कार्यरत आहेत. त्यांचे आपल्या वर्गमीत्रांशी पुन्हा मनोमिलन होण्यासाठी आणि त्यांचे व्यावसायिक देवाणघेवाण करण्यासाठी एक व्यासपीठ महाविद्यालयाच्या वतीने या माजी विद्यार्थी मेळाव्याच्या निमित्ताने उपलब्ध करण्यात आले. या विद्यार्थी पुनर्मिलनामध्ये महाविद्यालयाच्या स्थापने पासून तर आज पर्यंतच्या पदवीधरांचा सहभाग होता. सर्वांसाठी हा संस्मरणीय अनुभव ठरला. महाविद्यालयाच्या अल्युमिना असोसिएशनच्यावतीने मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. विविध कंपनीमध्ये उच्च पदावर असणारे कंपनीचे सीईओ, संचालक, आयटी मॅनेजर, नेटवर्क ॲडमिनिस्ट्रेटर, डेटाबेस ॲडमिनिस्ट्रेटर, सिस्टीम ॲनालिस्ट, डेव्हलपर, प्रोडक्ट मॅनेजर, सिस्टम आर्किटेक्ट, सर्व्हिस इंजिनिअर अशा अभियांत्रिकी, एमबीए, एमसीए शाखेतील 300 पेक्षा अधिक माजी विद्यार्थ्यांनी या मेळाव्याला उपस्थिती दर्शवली.

कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष प्रवीण पोटे पाटील आणि उपाध्यक्ष श्रेयसदादा पोटे पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी संचालक डॉ. पी. एम. खोडके, प्रा. मोनिका जैन, प्राचार्य डॉ. पी. एम. जावंधिया, उपप्राचार्य डॉ. मो. झुहेर, सर्व महाविद्यालयाचे डीन्स, सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमची रूपरेषा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एम जावंधिया यांनी मांडली. माणूस जगाच्या पाठीवर कुठेही गेला आणि कितीही मोठा झाला तरी त्याचा महाविद्यालयाशी असलेला ऋणानुबंध तुटत नाही. माजी विद्यार्थी मेळाव्याच्या निमित्तानं जुने सवंगडी भेटतात आणि आठवणींना उजाळा मिळतो, असे संस्थेचे संचालक डॉ. पी. एम. खोडके यावेळी बोलताना म्हणाले. संस्थेचे अध्यक्ष माजी राज्यमंत्री प्रवीण पोटे पाटील यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. येणाऱ्या काळातील रोजगार आणि त्याकरिता लागणारे माजी विद्यार्थ्यांचे सहकार्य किती आवश्यक आहे, याबद्दल त्यांनी मत प्रदर्शन केले. तसेच कोणत्याही क्षेत्रात काम करत असताना आपले अस्तित्व निर्माण करा, असे आवाहन त्यांनी केले. सर्व माजी विद्यार्थ्यांनी आपला परिचय दिल्यावर शिक्षण घेत असतानाच्या काही गमतीदार आणि चांगल्या आठवणींना उजाळा दिला. यात एकत्रितपणे केलेला अभ्यास, शिक्षकांचा विद्यार्थ्यांवरील वचक, शाळेतील क्रीडा स्पर्धा, शिक्षकांनी दिलेली अनमोल मार्गदर्शन, स्नेहसंमेलन आणि त्यातील सांस्कृतिक कार्यक्रमाची धूम, महाविद्यालयाचे विदेश दौरा अशा विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. या मेळाव्यासाठी महाविद्यालयाची अल्युमिना संयोजक समिती, प्राध्यापक सदस्य आणि विद्यार्थी स्वयंसेवक यांचा समावेश असून, कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्वांनी अथक परिश्रम घेतले. यासाठी विविध माध्यमांचा वापर करून सर्व माजी विद्यार्थ्यांना आमंत्रणे पाठवली गेली. माजी विद्यार्थ्यांचा प्रतिसाद कौतुकास्पद होता.

# निदानजी महाराज हनुमान मंदिरात महाप्रसाद

## शेकडो भाविकांनी घेतला लाभ



**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी ,(दि.17)** - अंजनगाव बारी येथील पुरातन निदानजी महाराज देवस्थानच्या हनुमान मंदिरात हनुमान जयंती उत्सव विविध कार्यक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानित्ताने संस्थानच्यावतीने भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. परिसरातील शेकडो भाविक-भक्तांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला.



निदानजी महाराज संस्थानला 500 वर्षाची परंपरा लाभली आहे. दरवषर्भ येथे हनुमान जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यावेळी हंगामी अध्यक्ष विनोबा कदम यांच्या मार्गदर्शनात हनुमान जन्मोत्सवानिमित्य भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. यावेळी गावातील संस्थानची पंचकमेटी, समस्त गावकरी मंडळी व कार्यकर्त्यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. तत्पूर्वी शुक्रवार 11 एप्रिल रोजी रात्री 9 ते सकाळी 6 पर्यंत अवधुती भजन तुलसीदासजी कुंभलकार यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले. तसेच शनिवार 12 एप्रिलला गुरुदेव भजन मंडळाने गोपालकाला, दहिहांडी केली. दुपारी महाप्रसाद ग्रहण करण्यासाठी शेकडो भाविकांनी हजेरी लावली होती.

# मोर्शीची मनस्वी मेंढे चित्रकला स्पर्धेत सुयश

## जिल्ह्यातून तिसरी येण्याचा मान



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, (दि. 17)** सकाळ एन. आय. ई. च्या वतीने राज्यव्यापी चित्रकला स्पर्धेचे आयोजन नुकतेच अमरावती जिल्हयातील 24 केंद्रावर करण्यात आले होते. या स्पर्धेत जिल्हयातील सहभागी विजयी स्पर्धकांचा जिल्हास्तरीय निकाल जाहीर करण्यात आला आहे. या स्पर्धेमध्ये लोणी येथील श्रीमती रामप्यारीबाई चांडक विद्यालयातील वर्ग 6 वी ची विद्यार्थीनी मनस्वी आशिष मेंढे हिने सर्वसाधारण गट क मधून अमरावती जिल्हयातून तृतीय क्रमांक पटकावून एक नवा इतिहास निर्माण केलेला आहे. ग्रामिण भागातील विद्यार्थांच्या सुप्तगुणातील सप्तरंग ओळखुन विद्यार्थांच्या अंतर्भुत कलेला सदैव प्रोत्साहीत करून विद्यार्थांचे नाव राज्य तसेच राष्ट्रीय स्तरावर घेवून जाण्यात श्रीमती रामप्यारीबाई चांडक विद्यालय सदैव अग्रेसर राहिलेले आहे.

मनस्वी आपल्या यशाचे श्रेय तीचे आईवडील तसेच शाळेचे कला शिक्षक डी. एस. मसराम सर यांना देते. या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक एस. व्ही. खोडे, पर्यवेक्षक व्ही. एच. चिमोटे तसेच सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले. जागतीक कलादिनाचे औचित्य साधून मनस्वी व तीची आई दिपाली यांचा सत्कारही करण्यात आला.

# पीडीएमसीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 17)** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 134 वी जयंती श्री शिवाजी शिक्षण संस्था व्दारा संचालित डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. यावेळी रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. वसंत लुंगे, डॉ. गणेश पुंडकर, डॉ. प्रमोद भिसे, डॉ. सुषमा पांडे, डॉ. स्वप्नील मोहोड, विद्यार्थी प्रतिनिधी अजित पाटील प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन, हारार्पण व दीपप्रज्वलन करून अभिवादन व आदरांजली अर्पण करण्यात आली. अतिर्थीनी आपल्या भाषणातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# 34 वर्षीय युवकाचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन



**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर, (दि. 17)** दर्यापूर शहरातील बाभळी परिसरातील रहिवासी संदीप सुभाषराव कडू या 34 वर्षीय युवकाचे 16 एप्रिल रोजी मध्यरात्री हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. राहत्या घरीच संदीपला हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि काही वेळातच त्याचा मृत्यु झाला. अल्पवयात संदीप कडू याचा असा अकस्मित मृत्यु झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. सदीपच्या पश्चात त्याच्या कुटुंबात आई, वडील, एक भाऊ, एक बहीण आणि आप्त परिवार आहे. त्याच्या पार्थिवावर आज हिंदू स्मशानभुमी येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी गणमान्य नागरिक उपस्थित होते.

# शोभाताई किसनराव झिमटे यांचे निधन



**अमरावती** - गायत्री कॉलनी येथील रहिवासी तसेच विभागीय माहिती कार्यालयातील छायाचित्रकार मनिष किसनराव झिमटे यांच्या मातोश्री सौ. शोभाताई किसनराव झिमटे, वय 56 वर्षे यांचे दीर्घ आजाराने 16 एप्रिल 2025 रोजी दुखद निधन झाले. हिंदू स्मशान भूमीत त्यांच्यावर 17 एप्रिलला अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती श्री. किसनराव झिमटे, मुले मनिष झिमटे, आशिष झिमटे, स्नुषा प्रियंका झिमटे, माधुरी झिमटे, तीन नातवंड असा खूप मोठा आप्त परिवार आहे. मनीष झिमटे यांच्या मातोश्रीचे अचानक निधन झाल्यामुळे नातेवाईकांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.

# आम्ही लग्नाळू! हुंडा नको, सोनंही नको; मामा फक्त पोरगी द्या..!

## लग्न जुळवण्यासाठी जिवाचे रान करताहेत उपवर व नातेवाईक

**नितीन दुर्बुडे**

**पथ्रोट, (दि. 17)-** गेल्या काही वर्षांत ग्रामीण भागात लग्न जुळवण्यात अनेक अडचणी येत आहेत. शेतक ?यांच्या घरात नांदायला सून मिळणे कठीण झाले आहे. मुलांच्या लग्नाचे वय वाढत चालले असून, अनेक जण चाळिशीच्या पार गेले आहेत, तर अनेकांनी लग्न जुळण्याची आशा सोडून दिली आहे.



त्यामुळे ग्रामीण भागातील विवाहेच्छुक तरुण व्यसनांच्या आहारी जाऊन नैराश्याकडे झुकत चालले आहेत. तरीही अनेक जण संयम ठेवून लग्न जुळवण्यासाठी जिवाचे रान करताना दिसत आहेत. एकूणच हुंडा नको, सोनं नको, फक्त पोरगी द्या मला..! अशी आर्त हाक आता लग्नाळू मुले देत आहेत.

सध्या लग्न जुळवण्यासाठी निर्माण झालेल्या बिकट परिस्थितीत नात्यागोत्यातील मुलींसोबत लग्न जुळवून घेण्याकडे उपवर मुलांच्या पालकांचा कल वाढला आहे. काही ठिकाणी नोकरी, व्यवसाय, गाडी, बंगला सर्वकाही असूनही मुलींच्या तसेच त्यांच्या पालकांच्या अवास्तव अपेक्षेमुळे अनेकांचे विवाह रखडले आहेत.

त्यातच शेतकरी मुलांची चांगलीच फरपट होत असून, त्यांना मुलगी मिळणे अत्यंत कठीण झाले आहे. सध्या नोकरदारांसह व्यावसायिकांना मुलींच्या कुटुंबीयांकडून प्राधान्य दिले जात आहे. त्यामुळे 'शेतकरी नवरा नको ग बाई' असे मुली म्हणतात. सध्या उपवर मुला-मुलींसाठी स्थळ शोधण्याच्या कार्यक्रमाला वेग आला आहे. भावी जोडीदार निवडताना मुलींना नोकरीसह मुलाकडे शेतीही हवी असते. मात्र, शेतकरी नवरा त्यांना नको आहे. त्यामुळे ग्रामीण भागात सामाजिक समस्या जटिल झाली आहे. शिकलेल्या मुली व त्यांचे पालक शिकलेला व सरकारी नोकरी व घरी थोडीफार शेती असलेल्या मुलांनाच पसंती देत आहेत. खासगी नोकरी आणि सध्या कमी पगार असला असला तरी चालेल; पण तो शहरात राहणारा असावा, अशी अपेक्षाही व्यक्त होत आहे.

जुन्या काळामध्ये उत्तम शेती, मध्यम व्यापार तर कनिष्ठ नोकरी समजली जायची. आता मात्र उत्तम नोकरी, मध्यम व्यापार आणि शेतीला कनिष्ठ दर्जा दिला जात आहे. पूर्वी ग्रामीण भागातील तरुण वधू-वर सूचक केंद्रामध्ये नोंदणी करीत नव्हते. मात्र, आता वधू मिळत नसल्याने समाजातील वधू-वर सूचक केंद्रामध्ये नोंदणी वाढली आहे. समाजातील मुलींचे प्रमाण कमालीचे कमी झाले आहे. परिणामी, ग्रामीण भागातील तरुणांना एजंटांची मदत घ्यावी लागत आहे.

### शेतकरी मुलांची लग्नासाठी कुचंबणा

सध्या ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबातील मुलींच्याही अपेक्षा वाढल्या आहेत. उच्चशिक्षित, नोकरी असलेला, निर्व्यसनी पती मिळावा, अशी त्यांची इच्छा असते. त्यामुळे शेतकरी, शेतमजूर वरांची कुचंबणा होताना दिसून येत आहे, असे एका वधू-वर सूचक केंद्राच्या संचालकाने सांगितले.

### मुलींच्या पालकांचा लग्नाचा खर्च वाचतोय

हुंडा देणे-घेणे कायद्याने गुन्हा आहे. तरीही समाजात आत्तापर्यंत देण्या-घेण्याच्या नावाखाली हुंडा घेतला जात असल्याची वस्तुस्थिती आहे. मुलींच्या कुटुंबाकडून यापूर्वी भरमसाट हुंडा घेतला जात होता. त्यामुळे अनेक मुलींच्या पालकांचे दिवाळे निघायचे. मात्र, सध्या मुली कमी झाल्याने दोन्ही बाजूंचा लग्नाचा खर्च करून मुलींच्या वडिलांना काही लाख रुपये देण्यासही अनेक पालक तयार आहेत. विशेषत: ग्रामीण भागात अशा पद्धतीने अनेक विवाह पारही पडले आहेत.

### लग्न जमवताना फसवणुकीच्या प्रकारांत वाढ

लग्नासाठी मुलगी मिळत नसल्याने ग्रामीण भागात अनेक तरुणांची फसवणूक होण्याचे प्रमाणही वाढले आहे. फसवणूक करणा ?या अनेक टोळ्या सक्रिय झाल्या आहेत. पैसे, दागिने घेऊन लग्नाच्या दुस ?या दिवशीच वधू पसार होण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे 'आधीच हौस त्यात पडला पाऊस' अशी लग्नाळू तरुणांची अवस्था झाली आहे.

# जनता विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी



**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी, (दि. 17) -** अंजनगाव बारी येथील जनता विद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती 14 एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक विनोद मुगल हे होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून पर्यवेक्षक गजेंद्र अवघड, सामाजिक समता सप्ताहाचे प्रसिद्धी प्रमुख पवन इंगोले, शिक्षक दिगंबर करडे, मंगेश ढेकन, वैशाली ठाकरे प्रामुख्याने उपस्थित होते.


यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. ज्येष्ठ शिक्षक हरिभाऊ रामटेके यांच्यासह प्रमुख पाहुण्यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकणारी भाषणे झालीत. विद्यार्थ्यांनीही बाबासाहेबांवर समयोचित विचार व्यक्त केले. विनोद मुगल यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला राज्यघटनेमधून दिलेल्या मूलभूत अधिकारांविषयी माहिती सांगितली. शिक्षक राजुदास राठोड यांनी बाबासाहेबांवर आधारित गीत सादर केले. विद्यार्थ्यांनी बाबासाहेबांच्या जीवन कार्यावर निबंध लिहून आणले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिगंबर करडे यांनी तर संचालन अंशिका हरिदास साठवणे यांनी केले. ईश्वरी दातीर हिने आभार मानले. कार्यक्रमाच्या आयोजनाची जबाबदारी अमोल डवरे यांनी सांभाळली.

# अस्मिता

## ग्लिटर मेकअप करताना...

सध्या ग्लिटर मेकअपचा ट्रेंड आहे. हा मेकअप योग्य पद्धतीने केला तरच शोभून दिसतो. ग्लिटर म्हणजे चकमक आणि झगमग. पण या मेकअपमुळे चेहरा खूप चमकदार दिसणार नाही याबाबत दक्ष रहायला हवं. त्यासाठी उपयुक्त ठरणारे काही मुद्दे.

✽ चेहऱ्याच्या कोणत्याही एका भागावर ग्लिटर मेकअप करा. म्हणजे तुम्ही ग्लिटर आयलायनर किंवा आयशॅडो लावणार असाल तर स्पार्कली म्हणजेच चकाकत्या लिपग्लॉसचा वापर करू नका. संपूर्ण चेहऱ्यावर ग्लिटर वापरू नका.



✽ ग्लिटर वापरताना वेळेचं भान ठेवा. सकाळच्या वेळी ग्लिटर शोभून दिसणार नाही. रात्रीच्या वेळी गडद रंगाच्या पेहरावावर ग्लिटर मेकअप शोभून दिसेल.

✽ बाजारात ग्लिटर मेकअपची बरीच व्हरायटी मिळते. पण नेहमी चांगल्या प्रतीची ग्लिटर उत्पादनं वापरायला हवीत. ग्लिटर आयशॅडो वापरायची असेल तर प्रेस्ड ग्लिटर आयशॅडो निवडा. यासोबतच ग्लिटर आयलायनरनेही चेहऱ्याचं सौंदर्य खुलतं. पण पहिल्यांदाच ग्लिटर मेकअपचा वापर करणार असाल तर सावधगिरी बाळगा. लूझ ग्लिटरचा वापर शक्यतो टाळा. लूझ ग्लिटर संपूर्ण चेहऱ्यावर पसरू शकतं. तसंच ग्लिटर मेकअप करताना ग्लिटर बेसचा वापर करा. यामुळे तुम्हाला परफेक्ट लूक मिळेल.

ब्युटी टॉक

✽ डोळ्यांवर ग्लिटर मेकअप केल्यानंतर आसपास पसरलेलं ग्लिटर स्वच्छ करून मगच उर्वरित चेहऱ्याचा मेकअप करा.

✽ ग्लिटर मेकअप काढतानाही काळजी घ्यायला हवी. हा मेकअप हलक्या हाताने काढा. चेहऱ्याचा मेकअप काढताना स्क्रब वापरू नका. तसंच आधी डोळ्यांचा मेकअप काढा.



## दिव्याच्या दारी केशराचे मळे

मानिनी

नागपूरच्या अक्षय आणि दिव्या होले यांनी २०२० मध्ये अशी शेती सुरु केली, ज्यामुळे त्यांचे जीवनच बदलून गेले. यातून त्यांना कोट्यवधी रुपयेही मिळाले. या दोघांनी ४०० चौरस फूटांच्या लहान खोलीत हायड्रोपोनिक तंत्रज्ञानाचा वापर करून केशरची लागवड सुरु केली. या तंत्रद्वारे खोलीत काश्मीरसारखी थंड आणि धुक्याची परिस्थिती निर्माण केल्यामुळे केशर वाढवणे शक्य झाले. आता ते केशराच्या शेतीतून दरवर्षी ५० लाख रुपये कमवत आहेत. या अनोख्या प्रयोगाची दखल घ्यायला हवी.

अक्षय आणि दिव्या होले यांनी केशराची लागवड करण्याचा निर्णय घेतला तेव्हा त्यांना भारतात केशरची मागणी खूप जास्त परंतु उत्पादन कमी असल्याचे ठाऊक होते. त्यामुळेच सर्वप्रथम या पिकाविषयी समजून घेण्यासाठी दोघेही काश्मीरला गेले. तिथे अडीच महिने घालवले आणि अनुभवी शेतकऱ्यांकडून केशर लागवडीबद्दल तपशीलवार जाणून घेतले. नंतर त्यांनी १०० केशर बियाण्यांपासून व्यवसायाची सुरुवात केली. या बियाणांचे वजन अवघे एक किलो होते. पहिल्या वर्षी त्यांना फक्त काही ग्रॅमच केशर मिळाले. पण दोघांनीही हार मानली नाही. पुढे कष्टाचे चीज झाले आणि हळूहळू केशराचे पीक वाढू लागले.


त्यानंतर या दोघांनी अधिक बियाणे खरेदी केले आणि शेतीचा विस्तार केला. त्यांनी ३५० किलो बियाण्यांमध्ये गुंतवणूक केली आणि पुढच्या कापणीत सुमारे १,६०० ग्रॅम केशर मिळवले. या यशाने प्रोत्साहित होऊन त्यांनी नागपूरमधील हिंगणा येथे ४८० चौरस मीटरचे आणखी एक युनिट देखील वसवले. आता त्याचे वार्षिक उत्पन्न ४० ते ५० लाख रुपयांच्या दरम्यान आहे. यातून ते स्वतःच यशस्वी झाले नाहीत तर १५० पेक्षा अधिक लोकांना केशर लागवडीचे प्रशिक्षणही दिले. यापैकी २९ लोकांनी स्वतःची केसर युनिट्स स्थापन केली आहेत. यासाठी ते प्रति प्रशिक्षण १५,००० रुपये घेतात. म्हणजेच त्यांच्या उत्पन्नाचा हा स्रोतही वाढतो आहे.

अक्षय आणि दिव्या यांनी एक भक्कम व्यवसाय मॉडेल तयार केले आहे. गेल्या वर्षी त्याच्या आणि भागीदारांच्या युनिट्सनी मिळून ४५ किलो केशरचे उत्पादन घेतले. १०० चौरस फुटांचे युनिट उभारण्यासाठी सुमारे १० लाख रुपये खर्च येतो आणि त्यातून वार्षिक पाच लाख रुपयांचे उत्पन्न मिळू शकते. ही एकदाच होणारी गुंतवणूक आहे कारण बियाणे एकदाच खरेदी करावे लागते. एका बी पासून तीन ते पाच फुले मिळतात आणि प्रत्येक फुलात केशराचे तीन धागे असतात.

या दोघांनी आतापर्यंत १.३ कोटी रुपये कमावले आहेत. या सगळ्यात केशराची गुणवत्ता राखणे हे त्यांच्या यशाचे रहस्य म्हणायला हवे. काश्मीरच्या केशर संस्थेने त्यांच्या केशरला प्रतवारी दिली आहे. हे केशर ६३० रुपये प्रति ग्रॅम दराने विकले जाते.

ऑगस्ट ते डिसेंबर दरम्यान केशराची कापणी केली जाते आणि उर्वरित वेळ बियाणे वाढवण्यात जातो. एकूणच हायड्रोपोनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पिकवल्या जाणाऱ्या केशराचा व्यवसाय खूपच फायदेशीर ठरत आहे. तंत्रज्ञानाचा योग्य वापर केला तर कोणत्याही कठीण परिस्थितीत यश मिळवता येते, हेच या दोघांच्या यशावरून सिद्ध होते.

## स्वत:ला सक्षम बनवा



मैत्रिणींनो, कॉर्पोरेट विश्वात वावरताना आपण मागे पडता कामा नये. भारतातच नाही तर जगभरातच महिलांबाबत दुजाभाव होतो. त्यांना अनेक संधी नाकारल्या जातात. हे टाळण्यासाठी आपण अस्तित्वाची जाणीव करून देणं गरजेचं आहे. स्पष्टपणे व्यक्त होणं गरजेचं आहे. यासाठी नेमकं काय करायला हवं, याविषयी...

✽ ऑफिसमध्ये स्वत:चं नाणं खणखणीत वाजवायला हवं. यासाठी वैयक्तिक ब्रँड तयार करणं गरजेचं आहे. बोलणं, वागणं, कपडे यातून आपली प्रतिमा तयार होत असते. त्यामुळे फक्त मीटिंग किंवा महत्त्वाच्या प्रसंगीच छाप तयार होऊन जाऊ नये. तुम्ही दररोजच अप टू डेट असायला हवं.

स्कील डेव्हलपमेंट

✽ ऑफिसमध्ये अजिबात मागे राहू नका. स्वत:हून जबाबदाऱ्या स्वीकारा. काही आव्हानं स्वत: पदरात पाडून घ्या. यामुळे तुमचा ठसा उमटेल.

✽ स्वत:बद्दल अवाजवी अपेक्षा बाळगणं चुकीचं आहे तसंच स्वत:च्या क्षमतांबद्दल संशय बाळगणंही योग्य नाही. आत्मविश्वासाने निर्णय घ्या. नवी जबाबदारी पेलताना स्वत:वर पूर्ण विश्वास ठेवा.

✽ कंपन्यांमधली उच्च पदं भूषवणाऱ्या महिलांची संख्या तशी कमी आहे. पण ती मिळवण्यासाठी महिलांनीच पुढाकार घ्यायला हवा. वरच्या पदावर गेल्यानंतर काही कठोर निर्णय घ्यावे लागतात. त्याची तयारी ठेवा. त्या दृष्टीने स्वत:ला सक्षम बनवा.

✽ कंपनीतल्या इतर महिलांच्या आधारस्तंभ बना. त्यांना मार्गदर्शन करा. त्यांना वर आणण्याचा प्रयत्न करा. यामुळे कंपनीत समानता वाढीस लागू शकेल.

## करवंटीचा उपयोग काय?

उन्हाळ्यात शरीरातील पाण्याची पातळी योग्य राखण्यासाठी अनेकजणी नारळ पाणी पितात. त्यासाठी घरात शहाळी आणली जातात. मात्र नारळपाणी प्यायल्यानंतर नारळाचे कवच फेकून देऊ नका. पण त्याचा पुनर्वापर केल्याने केवळ पर्यावरणालाच मदत होत नाही तर घर सजवण्यापासून ते आरोग्यासाठी फायदे मिळवण्यापर्यंत अनेक प्रकारे नारळाचे बाह्यकवच उपयुक्त ठरते.

**सजावटीच्या वस्तू तयार करा**

तुम्ही सर्जनशील असाल तर नारळाच्या करवंटीपासून सजावटीच्या सुंदर वस्तू बनवू शकता. यातून दिवा, वाटी, दागिन्यांचा डबा, फुलदाणी किंवा भिंतीवर लावण्यासाठी शो पीस बनवता येईल. यासाठी नारळाचे कवच पूर्णपणे स्वच्छ करा आणि आवडीच्या रंगाने रंगवा.

**बायो-डिग्रेडेबल चमचे आणि स्ट्रॉ बनवा**

नारळाच्या कवचापासून तुम्ही विघटनशील चमचे आणि स्ट्रॉ देखील बनवू शकता. हे करण्यासाठी नारळाच्या कवचाचे छोटे तुकडे करा. गुळगुळीत करण्यासाठी सँडपेपरने घासून घ्या. आता गरजेनुसार त्याला चमच्याचा वा इतर लहान उपयुक्त वस्तूंचा आकार देता येईल.



स्मार्ट टॉक

**नैसर्गिक कंगवा तयार करा**

नारळाचे कवच नैसर्गिकरित्या मजबूत असल्यामुळे तुम्ही ते कंगवा किंवा ब्रश म्हणून वापरू शकता. ते केसांसाठी उपकारक ठरते. हे करण्यासाठी नारळाच्या कवचाचे छोटे तुकडे करा आणि नंतर त्याला कंगव्याचा आकार द्या.

**बायो-डिग्रेडेबल बागेतील भांडी बनवा**

बागकामाची आवड असेल तर तुम्ही नारळाच्या कवचापासून भांडी आणि डबे बनवू शकता. यासाठी नारळाच्या कवचाचे अर्धे तुकडे करून लहान छिद्रे पाडा. यातून पाणी बाहेर पडू शकेल. आता यात तुम्ही माती भरुन रोपे लावू शकता. बायोडिग्रेडेबल बागेसाठी हे भांडे शोभून दिसेल.

**त्वचेसाठी नैसर्गिक स्क्रब बनवा**

नारळाचे कवच आणि करवंटीच्या आतील भाग त्वचेसाठीदेखील खूप फायदेशीर ठरू शकतो. त्याचा आतील भाग वापरुन तुम्ही उत्कृष्ट नैसर्गिक स्क्रब बनवू शकता. तो मृत त्वचा काढून टाकतो आणि त्वचेला ताजेपणा देतो. त्यासाठी नारळाचे कवच चांगले वाळवा. आतील पांढरा थर काढून गुळगुळीत पावडर बनवा. ती त्वचेवर लावा आणि हळूवारपणे स्क्रब करा. यामुळे चेहरा सतेज होईल.



## कानाचे दडे काढा

सुटीच्या या काळात भटकंतीचे बेत ठरतात आणि यानिमित्ताने विमान प्रवासही होतो. मात्र विमान हवेत झेपावत असताना अनेकींना कानात दुखणे, दडे बसणे किंवा अस्वस्थतेचा त्रास होतो. ही समस्या टेकऑफ प्रमाणेच लँडिंग दरम्यानही जाणवते. त्याचे मुख्य कारण हवेच्या दाबातील बदल हे आहे. हवेच्या दाबातील बदल कानाच्या आतील भागावर परिणाम करतो. विमान वर जाते किंवा खाली येते तेव्हा वातावरणाचा दाब वेगाने बदलतो. आपल्या कानाच्या आत एक लहान युस्टाचियन ट्यूब अर्थात नळी असते. ही नळी कानाचा मधला भाग आणि घशाला जोडलेली असते. दाब संतुलित करण्यास ती मदत करते. मात्र विमानाची उंची बदलते तेव्हा बाहेरील हवेचा दाब वेगाने वाढत असला तरी कधीकधी युस्टाचियन ट्यूब योग्यरित्या कार्य करू शकत नाही. त्यामुळे कानाच्या पडद्यावर दाब पडतो आणि वेदना होतात.

करून तर पाहा

प्रवाशाला सर्दी, सायनस किंवा ॲलर्जीची समस्या असेल तर सूज येऊन युस्टाचियन ट्यूब ब्लॉक होऊ शकते. यामुळेही दाब संतुलित न झाल्यामुळे कानात तीव्र वेदना होऊ शकतात. एखाद्या व्यक्तीला आधीच कानाचा संसर्ग असेल तर विमान प्रवासादरम्यान वेदना वाढू शकतात.

मात्र हा त्रास कमी करायचा असेल तर विमान चढताना किंवा उतरताना जांभई देणे किंवा घशाची हालचाल कायम ठेवणे योग्य ठरते. या उपायाने कानदुखीपासून आराम मिळतो. च्युइंगम चघळल्याने किंवा कँडी खाल्ल्यानेही लाळेची निर्मिती होते आणि गिळण्याची क्रिया वाढते. स्वाभाविकच यामुळे कानाचा दाब कमी होतो. हे विशेषत: मुलांसाठी उपयुक्त आहे.

तुम्हालाही विमानप्रवासात कानावर ताण येत असेल तर नाक हलके दाबा आणि तोंड बंद करून नाकातून हळूहळू हवा बाहेर काढण्याचा प्रयत्न करा. यामुळे कानाच्या आतील दाब बाहेरील दाबाशी संतुलित होतो. सर्दी असेल तर प्रवास करण्यापूर्वी नाकाने वाफ घ्या. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार तुम्ही नाकात कंजेस्टंट औषधी वापरू शकता. यामुळे युस्टाचियन ट्यूब उघडते आणि दाब संतुलित होतो.

## डाएट करा, पण...

वजन कमी करण्यासाठी वेगवेगळे फंडे वापरले जातात. कधी, कोण, कोणत्या प्रकारचं डाएट सुचवेल याचा नेम नसतो. पण प्रत्येक प्रकारचं डाएट आपल्या जीवनशैलीच्या आणि आरोग्याच्या दृष्टीने योग्य असेलच असं नाही. त्यामुळे तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखालीच डाएट करायला हवं. सध्या 'वन मील अ डे' हे डाएट अनेकजणी करतात. यात दिवसभरात फक्त एकदाच जेवायचं असतं. यामुळे झटपट वजन कमी होत असलं तरी बरेच धोकेही आहेत. याबाबत जाणून घेऊ.

स्टे फिट

✽ कमी वेळेत खूप वजन कमी करणं चांगलं नसतं. कारण अशाप्रकारे कमी केलेलं वजन पटकन वाढूही शकतं. डाएट बंद केल्यावर वजन वाढायला वेळ लागत नाही.

✽ दिवसातून एक वेळ भरपूर खाल्ल्यामुळे पचनसंस्थेवर खूप ताण येतो. जास्त अन्न पचवण्यासाठी शरीराला जास्त मेहनत करावी लागते. यामुळे हृदयालाही त्रास होतो.

✽ दिवसातून एक वेळ खाल्ल्यामुळे वजन कमी होत असलं तरी काही काळानंतर अशक्तपणा येण्याची शक्यता असते. अनेकदा पोषणमूल्यांची कमतरता निर्माण होऊ शकते.


✽ एका दिवसात कमी कॅलरी खाल्ल्यामुळे शरीराच्या चयापचय क्रियेवर परिणाम होतो. ही क्रिया मंदावते. यामुळे वजन वाढू शकतं.

✽ कमी खाल्ल्यामुळे भूक लागते आणि चिडचिड होते. डोकेदुखी, नैराश्य, मूड स्विंग्ज अशा समस्याही यामुळे भेडसावतात.



## ओठांनाही कर्करोगाचा धोका

कर्करोग हा एक धोकादायक आजार असून त्याचे अनेक प्रकार आहेत. यापैकीच एक म्हणजे ओठांचा कर्करोग. तो तोंडाच्या कर्करोगाचा एक भाग आहे. तो ओठांच्या बाह्य किंवा आतील त्वचेत विकसित होतो. महिलांना याचा सर्वाधिक धोका असतो. तथापि, योग्य माहिती आणि सावधगिरी बाळगल्यास ओठांचा कर्करोग टाळता येतो.



**ओठांच्या कर्करोगाची कारणे**

आरोग्यास अपायकारक असणाऱ्या उत्तेजक पदार्थांचे अतिसेवन तसेच व्यसने आणि अयोग्य सौंदर्यप्रसाधनांच्या वापरामुळे हा धोका वाढतो. याने शरीराची रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होते. तसेच जास्त वेळ उन्हात राहिल्याने ओठांच्या त्वचेचे गंभीर नुकसान होऊ शकते. सूर्याच्या हानिकारक अतिनील किरणांच्या संपर्कात आल्याने ओठांची जळजळ आणि त्वचेला अकाली वृद्धत्व जाणवते. यामुळेही थेट कर्करोग होऊ शकतो. म्हणूनच हा धोका टाळण्यासाठी त्वचेचे संरक्षण करा आणि घराबाहेर पडताना सनस्क्रीन वापरा.

**मानवी पॅपिलोमा विषाणू**

जाणून घ्या

हा विषाणू प्रामुख्याने लैंगिक संभोगाच्या वेळी शरीरात प्रवेश करतो. तो विशेषत: तोंडाचा भाग, घसा आणि ओठांवर परिणाम करू शकतो. त्याच्या संसर्गामुळे ओठांच्या कर्करोगाचा धोका वाढतो कारण तो पेशींमध्ये असामान्य बदल घडवतो. त्यामुळेच एचपीव्ही टाळण्यासाठी सुरक्षित उपायांचे पालन करा आणि काही शंका असल्यास डॉक्टरांकडून तपासणी करून घ्या.

**पौष्टिक कमतरता**

जीवनसत्त्वे अ, क आणि ई सारख्या महत्त्वाच्या पोषक तत्त्वांच्या कमतरतेमुळे देखील ओठांचा कर्करोग होऊ शकतो. तसेच कुटुंबातील एखाद्याला तोंडाचा कर्करोग झाला असल्यासही ओठांच्या कर्करोगाचा धोका जास्त असू शकतो. जनुकांमुळे आणि अनुवांशिक कारणांमुळे हा आजार एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जाऊ शकतो.

हे सर्व लक्षात घेता ओठांवर जखम किंवा फोड बराच काळ बरा होत नसेल तर ते ओठांच्या कर्करोगाचे गंभीर लक्षण असू शकते, हे ओळखा. हे फोड वेदनारहित असतात, हळूहळू ते वाढतात आणि काही काळासाठी कडक होतात. त्यामुळेच अशी जखम दोन ते तीन आठवड्यांपेक्षा जास्त काळ बरी होत नसेल तर ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्या. कर्करोगाच्या सुरुवातीच्या टप्प्यातच उपचार मिळाले तर हा आजार पूर्णपणे बरा होतो.

स्कीन केअर

## कमाल टॉमेटो फेशियलची

एखादा कार्यक्रम असेल तर झटपट तयार व्हावं लागतं. घाईघाईत अनेकदा पार्लरची अपॉइंटमेंटही मिळत नाही. अशा वेळी तुम्हाला घरच्या घरी टॉमेटो फेशियल करता येईल. या फेशियलचे चार टप्पे आहेत. पहिल्या टप्प्यात क्लिंजिंगसाठी टॉमेटोचा गर आणि कच्चं दूध एकत्र करून मिश्रण तयार करा. आता कॉटन पॅडने हे मिश्रण चेहरा आणि मानेवर लावा. वाळल्यावर धुवून टाका. दुसऱ्या टप्प्यात स्क्रबिंगसाठी टॉमेटोचा चिरलेला अर्धा भाग घ्या. त्याला थोडी साखर लावा आणि हलक्या हातांनी चेहऱ्यावर फिरवा. आता चेहऱ्यावर थंड वाफ घ्या. यानंतर टॉमेटोच्या गरात मध आणि चंदन पावडर घालून पॅक तयार करा व चेहरा आणि मानेवर लावा. १५ मिनिटांनी धुवून टाका. यानंतर चेहऱ्याला मॉइश्चरायझर लावा.



स्मार्ट टिप्स

## असा टिकवा पनीरचा ताजेपणा

पनीरचा ताजेपणा अधिक काळ टिकवण्यासाठी प्लास्टिकच्या पिशवीत गुंडाळून ठेवा. पण पनीर खूप घट्ट किंवा सैल बांधू नये. प्लास्टिकऐवजी तुम्ही अॅल्युमिनियम फॉईलही वापरता येईल. थोडं पनीर काढल्यानंतर पुन्हा बांधताना आधीच्या फॉईलचा वापर करू नका. नव्या फॉईलमध्ये बांधून ठेवा. कधीही पनीर फ्रीजरमध्ये ठेऊ नका.



हेअर केअर

## केस छोटे आहेत?

लांब केसांची निगा कशी राखावी याबाबत बरेच सल्ले दिले जातात. पण छोट्या केसांचं काय? अनेक मुली, महिला छोट्या केसांना प्राधान्य देतात. छोट्या केसांना शाम्पू आणि कंडिशनरची जास्त गरज असते. मात्र कंडिशनरच्या अतिवापरामुळे केस गळू शकतात. तसंच जास्त शाम्पू लावल्यामुळे केस कोरडे होतात. म्हणूनच छोट्या केसांची देखभाल करताना काळजी घ्या.





# केस गळतीनंतर आता नख गळती

## बोंडगावसह ५ गावामध्ये प्रकार : गावकरी हादरले





■ **यशवंत पिंगळे, खामगाव, दि. १६ :**
शेगाव तालुक्यातील बोंडगावामध्ये ३ महिन्यापूर्वी उद्भवलेल्या केस गळतीच्या समस्येनंतर आता केस गळती रुग्णांना नखगळतिच्या वेगळ्याच समस्येला सामोरे जावे लागत आहे. ६ दिवसापासून असलेल्या या प्रकाराने गावकरी हादरले असून भीतीसदृश्य वातावरण पसरले आहे.

बोंडगावसह इतर ५ गावामधे सुद्धा नख गळती होत आहे. त्यामध्ये बोंडगाव १४, कालवड १३, कठोरा १०, मच्छिंद्रखेड ७, घुई २ अशा नागरिकांमध्ये नखे गळती होत आहे.या गंभीर प्रकाराची दखल घेत आरोग्य विभागाने तातडीने हालचाली सुरू केल्या आहेत.

बोंडगावात सध्या सुमारे १० रुग्ण नख गळतीचे असून, आजूबाजूच्या गावांमध्येही अशीच लक्षणं दिसू लागली आहेत. आज बाजू गावात देखील नख गळतीचे रुग्ण आढळल्याने या प्रकाराचा परीघ वाढत असल्याची चिन्हं आहेत.

या प्रकाराची माहिती मिळताच आरोग्य विभागाने गावात सर्वेक्षण सुरू केले. यामध्ये डॉ. प्रशांत तांगडे (साथरोग तज्ज्ञ), अनिल बनकर (वैद्यकीय अधिकारी), जितेंद्र तायडे (वैद्यकीय अधिकारी), प्रमोद इंगळे (आरोग्य सहाय्यक), श्रीमती थारकर (आरोग्य सहाय्यिका) व आशा स्वयंसेविका यांचा समावेश होता. त्वचारोग तज्ञ डॉक्टर बालाजी आद्रर यांनीही रुग्णांची तपासणी केली. गावकऱ्यांनी ही बाब शिवसेनेचे शेगाव तालुका प्रमुख यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर रामा पाटील थारकर यांनी हा गंभीर विषय केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या निदर्शनास आणून दिला असून, या संदर्भात चर्चा देखील



नख गळती बाधित रुग्णाच्या संपूर्ण शरीराची तपासणी शासन मार्फत मोफत करण्याची मागणी रामा पाटील थारकर प्रशासनास केली आहे.. त्यास वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद सुद्धा दिला असून संशोधन पूर्ण होई पर्यंत नागरिकांची भयभीत न होण्याचे आवाहन केले आहे.संपूर्ण परिस्थितीवर प्रशासन व आरोग्य यंत्रणा लक्ष ठेवून आहे आणि लवकरच तपासण्या पूर्ण करून ठोस निदान देण्यात येईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

झाली आहे. केंद्रीय मंत्री जाधव यांनी याची तात्काळ दखल घेऊन आवश्यक ती मदत व मार्गदर्शन करण्याचे आश्वासन दिले आहे.

या प्रकारामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसले तरी, प्रथमतः पाणी व पर्यावरणीय घटकांचा सखोल अभ्यास करण्याची गरज असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. नागरिकांनी घाबरून न जाता आरोग्य विभागाच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# काँग्रेसचे मुंबईत आंदोलन







ईडी कारवाईचा निषेध, पोलिसांनी आंदोलकांना घेतले ताब्यात

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :**
काँग्रेसच्या वतीने केंद्र सरकारविरोधात मुंबई आज आंदोलन करण्यात आले. मोदी सरकार ईडीचा गैरवापर करत असल्याचा आरोप यावेळी काँग्रेस नेत्यांकडून करण्यात आला.

काँग्रेस कार्यालय टिळक भवनाबाहेर आंदोलन सुरू असताना पोलिसांनी आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेतले आहे. सत्तेच्या नशेत असलेले मोदी सरकार ईडीच्या माध्यमातून काँग्रेस नेत्या सोनिया गांधी व राहुल गांधी यांच्यावर निराधार खटले लादून लोकशाहीमध्ये विरोधी पक्षांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करत आहे, हे कोणत्याही किंमतीत सहन केले जाणार नाही, असे काँग्रेस नेत्यांनी म्हटले.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या प्रमुख उपस्थितीत व प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली,काँग्रेसचे प्रमुख नेते यांनी आज मुंबई येथील टिळक भवन परिसर, इंडियाबुल्स समोर येथे आंदोलन केले. या आंदोलनाला विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार, विधान परिषदेतील काँग्रेस पक्षाचे गटनेते सतेज ऊर्फ बंटी पाटील यांच्यासह काँग्रेस पक्षाचे खासदार, आमदार व प्रमुख नेते उपस्थित होते.

दादर पोलिसांनी आंदोलनकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. रमेश चेन्निथला, हर्षवर्धन सपकाळ, यशोमती ठाकूर, विश्वजीत कदम, विजय वडेट्टीवार, यांसह काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांना पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवाई म्हणून ताब्यात घेतले.

राहुल गांधींच्या संदर्भात अत्यंत चुकीच्या पद्धतीने गुन्हे दाखल केलेले आहेत. त्याचा आम्ही निषेध करतो. मात्र, निषेध करण्यासाठी सत्याग्रहाच्या मार्गाने आम्हाला जाऊ दिले जात नाही, हे तुम्हाला दिसून येत आहे. नॅशनल हेरॉल्ड प्रकरणी योग्य ती कारवाई झाली पाहिजे, पण ती झालेली नाही. एक रुपयाचीही अफरातफर झालेली नाही. एक इंचही जमीन हललेली नाही. या प्रकरणात कुठेही मनी लॉड्रींगचा प्रकार झालेला. त्यामुळे झालेली कारवाई अयोग्य आहे, असा दावा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला.

सोनिया गांधी आणि राहुल गांधी विरोधात करण्यात आलेले आरोप हे पूर्णपणे खोटे, निराधार आणि राजकीय सूडबुद्धीने प्रेरित आहेत. मोदी सरकारच्या इशाऱ्यावर नाचणारी ईडी ही तपास संस्था न राहता सत्ताधाऱ्यांची सूड उगवणारी यंत्रणा झाली आहे. लोकशाहीत विरोधी पक्षांचा आवाज दडपण्यासाठी सरकारी संस्थांचा वापर करणे हे खूपच गंभीर आणि धोकादायक आहे. कारवायांच्या विरोधात आम्ही आंदोलन करत आहोत, असे विजय वडेट्टीवार म्हणाले.

# भाजप नेते किरीट सोमय्या पुसद पोलीस ठाण्यात

■ **महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १७ :**
पुसद शहरात बांगलादेशी नागरिक अवैधपणे राहत असून अशा नागरिकांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करावा या मागणीसाठी भाजप नेते किरीट सोमय्या यांनी पुसद शहर पोलीस ठाण्यात ठाण मांडले. सोमय्या यांनी पुसधमध्ये येताना काही पुरावे सोबत आणले.

पुसद शहरातील बांगलादेशी नागरिकांना बोगस जन्म दाखले देणारे अधिकारी, कर्मचाऱ्यांसह दोषी नागरिकांच्या विरूध्द गुन्हे दाखल करण्याचा अर्ज त्यांनी पुसद शहर पोलीस ठाण्यात दिला . पुसद शहरात ५० बोगस बांगलादेशी असून त्यांच्याकडे बोगस बांगलादेशचे जन्म प्रमाणपत्र असल्याचा दावा सोमय्या यांनी केला आहे.

पुसदमध्ये बांगलादेशी असल्याचा आरोप सोमय्या यांनी काही दिवसांपूर्वी केला होता. आज पुसद पोलीस स्टेशनला दाखल झाल्यानंतर

अवैध बांगलादेशींचा मुद्दा



त्यांनी पोलीस निरीक्षक उमेश बेसकर यांच्याशी चर्चा केली. बेसकर यांनी सोमय्या यांची बाजू ऐकून घेतली. यावेळी मुख्याधिकारी अरुण वायकोस तसेच तहसीलदार महादेव जोरवर उपस्थित होते.

सोमय्या पुसद शहरात दाखल झाल्यानंतर त्यांच्या स्वागतासाठी भाजप कार्यकर्ते मोठ्या संख्येने शहर पोलीस स्टेशनला उपस्थित होते.

## सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाचे वडेट्टीवारांकडून स्वागत

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :**
नव्या वक्फ कायद्यातील दोन कलमांना सुप्रीम कोर्टाकडून ब्रेक लावण्यात आला आहे. केंद्र सरकारला उत्तर देण्यास सात दिवसांचा वेळ देण्यात आला आहे. या प्रकरणात पुढील सुनावणी पाच मे रोजी होणार आहे. यावरून आता विविध राजकीय प्रतिक्रिया येत आहेत.

एका समुदायाच्या ध्रुवीकरणासाठी केलेले हे टार्गेट होते, हे सर्वोच्च न्यायालयाला पटलेले आहे. म्हणून त्याला स्थगिती दिली आहे, असे काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार म्हणाले. तर सुप्रीम कोर्टाने वक्फ सुधारणा विधेयकाला सुधारणा दिली नाही, असा दावा शिंदे गटाचे नेते नरेश म्हस्के यांनी केला आहे.

म्हस्के म्हणाले की, वक्फ सुधारणाला विधेयकाला स्थगिती दिलेली नाही. दोन प्रश्न जे उपस्थित झाले होते, बोर्डावरील नियुक्ती जी काही आहे, ते राज्यांचे अधिकार आहेत. केंद्र सरकारने सुप्रीम कोर्टामध्ये पुढील तारखेपर्यंत आम्ही कुठल्याची पद्धतीच्या नेमणुका करणार नाहीत असे सांगितले. कोर्टाने वक्फ सुधारणा कायद्याला स्थगिती दिलेली नाही. वक्फ बाय युझरचा जो प्रश्न होता, ज्या देशाच्या, राज्याच्या सरकारच्या ताब्यातील जमिनी आहेत, त्यावर वक्फ बोर्डाने पूर्वीच्या कायद्याप्रमाणे जो अधिकार सांगितला. त्यासंदभार्तील निर्णय आम्ही घेणार नाहीत, असेही केंद्र सरकारने कोर्टात सांगितल्याचे म्हस्के म्हणाले.

: सिनेरंग :

## झापुक झुपूक सिनेमाचा ट्रेलर रिलीज!!




लोकरंजन

बाईपण भारी देवा चित्रपटाच्या भरघोस यशानंतर जिओ स्टुडिओज आणि केदार शिंदे ही सुपरहीट जोडी २५ एप्रिल २०२५ रोजी झापुक झुपूक हा कौटुंबीक मनोरंजन करणारा सिनेमा घेऊन पुन्हा एकदा प्रेक्षकांना भेटण्यास येत आहेत.

नुकताच या सिनेमाचा धमाल ट्रेलर रितेश देशमुख ने रिलीज केला आहे. अभिनेता रितेश देशमुखचा सूरज चव्हाण खूप मोठा चाहता आहे आणि आज बिग बॉस सीजन ५ च्या यशानंतर रितेश सूरजच्या या खास क्षणी सामील झाला आहे.

दिग्दर्शक केदार शिंदे ह्यांनी बिग बॉस च्या वेळीच सूरज सोबत एक चित्रपट बनवण्याचं ठरवलं होतं आणि आता ते अमलात आणून २५ एप्रिल रोजी फिल्म रिलीज ही होतेय. सूरज चव्हाण अभिनित झापुक झुपूक ह्या सिनेमाचं ट्रेलर आनंदाची मेजवानी घेऊन आलाय.

रोमांस, ॲक्शन, ड्रामा या सर्व गोष्टींवर प्रकाशझोत टाकणारा हा चित्रपट आहे. हा ट्रेलर अनेकांचं लक्ष वेधून घेत आहे. तरुणांमध्ये या सिनेमाची क्रेज जास्त पहायला मिळते. सूरज चव्हाणची स्टाईल आणि धमकेदार डायलॉग्स अख्ख्या महाराष्ट्रात आता गाजणार आहे. ट्रेलर मध्ये दोन कमाल गाण्यांची झलक सुद्धा पहायला मिळते. त्यातील एक गाणं नक्कीच ह्या पुढे हळद गाजवणार.

त्याचसोबत सुरज आणि जुई भागवत ची छान जोडी अजून आकर्षक करते. फॅमिली एंटरटेनमेंटचा जबरदस्त तडका असलेल्या झापुक झुपूक चित्रपटाची टीम संपूर्ण महाराष्ट्राचं मनोरंजन करायला सज्ज आहे. झापुक झुपूक चित्रपटात सूरज सोबत जुई भागवत, इंद्रनील कामत, हेमंत फरांदे, पायल जाधव, दीपाली पानसरे, तसेच पुष्कराज चिरपुटकर, मिलिंद गवळी हे मुख्य भूमिकेत झळकणार आहेत.

■ ■ ■

कोकणात फोटोग्राफी करणाऱ्या फोटोग्राफरला आलेल्या गूढरम्य अनुभवाची थरारक गोष्ट छबी या चित्रपटातून उलगडणार आहे. या चित्रपटाचा अतिशय रंजक टीझर लाँच करण्यात आला असून, छबी हा चित्रपट ९ मेपासून सर्वत्र प्रदर्शित होणार आहे.

केके फिल्म्स क्रिएशन, उप्स डिजिटल एंटरटेन्मेंट यांनी छबी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. जया तलक्षी छेडा निर्माता आहेत. चित्रपटाचं लेखन आणि दिग्दर्शन अद्वैत मसूरकर यांच असून त्यांचा दिग्दर्शक म्हणून पहिलाच चित्रपट आहे. चित्रपटात ध्रुव छेडा, सृष्टी बाहेकर, अनघा अतुल, रोहित लाड, ज्ञानेश दाभणे, अपूर्वा कवडे या नव्या दमाच्या कलाकारांसह अभिनेता समीर धर्माधिकारी, अभिनेते मकरंद देशपांडे, अभिनेत्री शुभांगी गोखले, राजन भिसे, जयवंत वाडकर, संकेत मोरे, संजय कुलकर्णी, लीना पंडित असे अनुभवी कलाकार आहेत. त्यामुळे चित्रपटाची अभिनयाची बाजू खणखणीत आहे यात शंका नाही.

## छबी ९ मेपासून महाराष्ट्रात



फोटोग्राफी स्पर्धेसाठी एक तरूण फोटोग्राफर कोकणातल्या गावात फोटो काढतो. मात्र त्या फोटोमध्ये कुणीच नसतं. हे असं का झालं याचा नाट्यमय शोध छबी या चित्रपटात आहे. गूढरम्य आणि नावीन्यपूर्ण कथानक, परिणाकारक पार्श्वसंगीत या मुळे हा टीझर प्रेक्षकांना गुंतवून ठेवतो, तसंच चित्रपटाविषयी उत्सुकताही वाढवतो. आजवर चित्रपटांमधून फोटोग्राफरची, एखाद्या फोटोची गोष्ट फारशी मांडली गेलेली नाही. अशा कथानकाला गूढरम्यतेची पार्श्वभूमी असल्यानं छबी हा सध्याच्या चित्रपटांमध्ये नक्कीच वेगळा प्रयत्न ठरणार आहे.


■ ■ ■

## वध चित्रपटाचा दुसरा भाग लवकरच चित्ररसिकांच्या भेटीला!

२०२२ साली प्रेक्षकांनी पसंतीची मोहोर उमटविलेल्या 'वध' या उत्कंठापटाचा बहुप्रतिक्षित सिक्वेल- 'वध २'चे चित्रीकरण पूर्ण झाले आहे. ख्यातनाम अभिनेता संजय मिश्रा आणि प्रसिद्ध अभिनेत्री नीना गुप्ता यांचा कसदार अभिनय पुन्हा एकदा 'वध २' चित्रपटात पाहायला मिळेल- या सिक्वेलमध्ये प्रेक्षकांपर्यंत मूळ चित्रपटाचे सार पुढे नेण्याचा जोमाने प्रयत्न करण्यात आला आहे. 'वध २' चित्रपटातही आत्मनिरीक्षणात्मक स्वर, नैतिक ताण आणि भावनिक गुंतागुंत कायम असल्याचे दिसून येईल. त्याच संकल्पनेद्वारे या चित्रपटाची कथा नव्या रहस्यात कसा प्रवेश करते, हे दिसून येईल. वध २ हा चित्रपट जसपाल सिंग संधू यांनी दिग्दर्शित केला आहे आणि लव रंजन व अंकुर गर्ग यांच्या लव फिल्म्सद्वारे या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली आहे.

नीना गुप्ता यांनी मनोगत व्यक्त करताना म्हटले, इतक्या वेगळ्या आशयाची कथा सापडणे हे खरोखरच दुर्मिळ आहे. जसपाल सिंग संधू यांच्याकडे सत्य आणि ताण यांच्याकडे पाहण्याची दृष्टी आहे, ज्यामुळे ते एक उत्तम कथाकार गणले जातात. वध-२ या चित्रपटात सहभागी होत पुन्हा एकदा या प्रवासाचा भाग असल्याचा मला खूप अभिमान वाटतो, हे लक्षात घेता त्यांच्या प्रतिसादाबाबत मी उत्सुक आहे. वध- २ हा चित्रपट २०२५ साली प्रदर्शित होईल.

■ ■ ■



: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## अकोल्यात पाणी पेटले ठाकरे गटाकडून तोडफोड

■ **महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. १७ :**
वाढत्या तापमानासोबतच अकोलेकरांवर जलसंकट देखील कोसळले आहे. शहरातील विविध भागात अनेक दिवसांपासून पाणी पुरवठा होत नसल्याने नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. त्या विरोधात शिवसेना ठाकरे गटाने गुरुवारी अकोला महापालिकेवर घागर मोर्चा काढला.

शिवसैनिकांनी आक्रमक भूमिका घेत पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्या कक्षात तोडफोड केली. कार्यालयातील खुर्च्यां फेकल्या. आंदोलकांनी घागरी फोडत पाण संतप्त मलकापूर येथील नागरिकांसह ठाकरे गटाने महापालिकेवर घागर मोर्चा काढला. ठाकरे गटाचे माजी नगरसेवक मंगेश काळे यांच्या नेतृत्वात हा घागर मोर्चा काढण्यात आला. शिवसेनेच्या स्थानिक महिलांना सोबत घेत घागर डोक्यावर घेत महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागात धडक दिली होती. पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी अमोल डोईफोडे यांच्या कक्षात आंदोलनकर्ते दाखल झाले. ते कक्षात हजार नव्हते. कक्षातील खुच्यांसह इतर साहित्यांची तोडफोड करण्यात आली.

## आर्चरी खेळाडू प्रथमेश जावकार शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराने सन्मानित

■ **महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. १७ :**
जिल्ह्यातील आंतराष्ट्रीय आर्चरी खेळाडू प्रथमेश समाधान जावकार यांच्या कामगीरीची दखल घेवून महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागामार्फत सन २०२३-२४ चा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.



पुरस्कार वितरण सोहळा दि. १८ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११ वाजता शिवछत्रपती क्रीडा क्रीडापीठ (बॅडमिंटन हॉल) म्हाळुंगे-बालेवाडी, पुणे येथे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या शुभहस्ते व मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व इतर सन्माननीय मान्यवर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. पुरस्काराचे स्वरुप ३ लाख रुपये रोख, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र पुष्पगुच्छ प्रदान करुन मान्यवरांच्या शुभहस्ते प्रथमेश समाधान जावकर यांना सन्मानीत करण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी बी. बी. महानकर यांनी दिली.

# कॅलिफोर्नियात उडवले १३ किलोचे विमान




■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :**
अवघ्या काही ग्राम वजनाचे विमान आकाशात घिरट्या घालू शकते आणि हे फक्त एरोमोडेलिंगचे प्रशिक्षण घेतलेला विद्यार्थीच करू शकतो.

हाच विद्यार्थी जेव्हा १३ किलोचे विमान तयार करतो आणि त्यावर साडेचार किलोच्या वजनासह ते विमान एका रिमोटच्या साहाय्याने आकाशात उडवतो, तेव्हा ते ख?या विमानाला देखील मात देते. तशी ही कामगिरी पार पाडणे एवढे सोपे नाही, पण नागपूरच्या तरुणाने जागतिक पातळीवर ही कामगिरी पार पाडत त्याची दखल घ्यायला लावली.

एरोमॉडेलिंगच्या जागतिक स्तरावर आयोजित स्पर्धेत नागपुरच्या युवकाने दुसरा क्रमांक पटकावला. अमेरिकेतील सोसायटी ऑफ ॲटोमोटीव्ह इंजिनिअर्स, कॅलीफोर्नियात ही स्पर्धा घेण्यात आली. यात जगातील ६० देशांमधील चमू सहभागी होत्या. त्यात भारताकडून मूळ नागपूरचा असलेला व सध्या पुण्यातील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे शिकणाऱ्या महेश्वर ढोणे या विद्यार्थ्याच्या नेतृत्त्वातील चमू सहभागी होती.

माव्हेरिक इंडिया या चमूमध्ये दहा सदस्य होते आणि त्यांनी जागतिक पातळीवर या स्पर्धेत दूसरा क्रमांक पटकावला. ही स्पर्धा डिझाईन, पे लोड कॅपॅसिटी आणि फ्लाईंग एरो परफॉर्मन्सवर आधारित होती. या स्पर्धेत चमूने साडेचार किलो वजनासह विमान रिमोट कंट्रोलने उडवले. विमानाचे वजन १३ किलो होते.

नागपूरच्या महेश्वर सुनील ढोणे याने प्रकल्प संचालक, पायलट आणि मुख्य उड्डाण निरीक्षक म्हणून चमूचे नेतृत्त्व केले. २०२३ साली देखील त्याच्या नेतृत्त्वातील चमूने चेन्नई येथे ह्यसाईज ड्रोन डेव्हलपमेंट चॅलेंजह्न स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकवला होता.

त्यावेळी भारतातील ८१ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या चमू यात सहभागी झाल्या होत्या. लहानपणापासूनच एरोमॉडेलिंग स्पर्धेत महेश्वरला रुची होती. नागपूरच्या ह्यएरोविजन ग्रुपह्नचे संस्थापक डॉ. राजेश जोशी यांनी त्याला विमान तयार करण्याचे आणि ते उडवण्याचे प्राथमिक शिक्षण दिले. त्यानंतर महेश्वरची रुची वाढत गेली व त्याने आतापर्यंत सीड ड्रॉपिंग, थ्रीडी, फायटर जेट, डेल्टा, ग्लायडर, वॉक अलाँग ग्लायडर अशी अनेक प्रकारची विमाने तयार केली आहेत. त्याच्या आईवडिलांनी देखील त्याचा हा छंद त्याला लागणाऱ्या प्रत्येक वस्तु पुरवून बळकट केला. आता तो जागतिक पातळीवर यश मिळवून आला आहे.